घटक १

# १

# हक्क अर्थ, व्याख्या, हक्काचे सिद्धांत नागरी, राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक व मानवी हक्क

**घटक रचना**

१.१. उदिष्टीये

१.२. हक्काच्या व्याख्या

१.३. हक्काची वैशिष्ट्ये

१.४. हक्काचे वर्गीकरण

१.५. हक्क संरक्षित ठेवण्याच्या पद्धती

१.६. मानवी हक्क

१.७. मानवी हक्क सिद्धांत

१.८. सारांश

१.९. आपण काय शिकलो ?

१.१०. संदर्भ सूची

## १.१ उद्दिष्टे

समाजात राहणाऱ्या व्यक्तीला आपला सर्वांगीण विकास घडवून, चांगले जीवन जगण्यासाठी त्याला आपल्यामध्ये असलेल्या गुणांचा विकास करण्यासाठी पोषक परिस्थितीची आवश्यकता असते. हक्क हे अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करत असतात. हक्क हे व्यक्तिगत हिताचे साधन नसून सामाजिक कल्याणाचे ते एक माध्यम असते. व्यक्तीच्या जीविताचे आणि वित्ताचे संरक्षण होणे मानवी विकासासाठी अतावश्यक असते. व्यक्ती आणि समाजाच्या परस्पर संबंधातून हक्कांची निर्मिती होत असते. व्यक्तीने समाजाचा घटक या नात्याने स्वविकासाठी हक्कांची निर्मिती केलेली असते. लोकशाही राष्ट्रात हक्काचे महत्व अनन्यसाधारण असते. त्याला नागरी हक्काबरोबरच काही राजकीय हक्क सुद्धा प्राप्त होत असतात. व्यक्ती राजकीय प्रक्रियेत त्याला प्राप्त झालेल्या राजकीय हक्कामुळे सहभागी होऊ शकते. हक्काचे मानवी जीवनातील असणारे महत्व लक्षात घेऊन हक्क या संकल्पनेची वोळख व्हावी यासाठी हक्क या संकल्पनेच्या विविध विचारवंतानी केलेल्या व्याख्यांसह हक्काचा अर्थ प्रस्तुत प्रकरणात स्पष्ट करण्यात आलेला आहे. हक्क हे विविध प्रकारचे असतात. हक्कांच्या प्रकारांची मांडणी तसेच हक्काचा उपभोग प्रत्येकास घेता यावा यासाठी हक्काना संरक्षण आवश्यक असते, हे हक्क कशा प्रकारे सरांक्षित राहू शकतात हे देखील प्रस्तुत प्रकरणात मांडलेले आहे. याबरोबरच

munotes.in

हक्कांचे विविध सिद्धांत स्पष्ट करून समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानव या नात्याने स्वाभाविकपणे प्राप्त होत असलेल्या, तसेच मानवाच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग असलेल्या मानवी हक्काची पार्श्वभूमी आणि त्यांचे महत्व प्रस्तुत प्रकरणात मांडलेले आहे

**हक्क (Rights)**

व्यक्तीला आपल्या गुणांचा विकास करण्यासाठी वैचारिक विकासासाठी, तसेच अधिकाधिक चांगले जीवन जगण्यासाठी हक्क आवश्यक असतात. "व्यक्तीला स्वत:चा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी अत्यावश्यक अशी सामाजिक परिस्थिती निर्माण करणाऱ्या घटकांना हक्क असे म्हणतात" अशी प्रो. लास्की यांनी हक्कांची व्याख्या केली आहे व्यक्तीला तिच्या विकासासाठी आवश्यक ते हक्क प्राप्त करून देणे आणि इतरांनी ते हक्क हिरावून घेऊ नयेत यासाठी योग्य ती दक्षता घेणे, अशी दुहेरी जबाबदारी राज्याची असते. नागरिकांना केवळ हक्क देऊन चालत नाहीत, तर त्या हक्कांवर प्रसंगी अतिक्रमण झाल्यास अशा अतिक्रमणांना प्रतिबंध करण्याची कायदेशीर तरतूदही करणे आवश्यक असते. प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आणि गुण वेगवेगळे असतात. आपल्या व्यक्तित्वाचा आणि गुणांचा स्वत:च्या इच्छेनुसार विकास घडवून आणण्याची संधी व्यक्तीला मिळाली पाहिजे. तशी परिस्थिती निर्माण करणे हे आधुनिक लोकशाही राज्याचे कर्तव्य ठरते.

हक्क हे नैसर्गिक असतात, अशी कल्पना काही विचारवंतांनी मांडली. परंतु हक्क आपोआप प्राप्त होत नाहीत. हक्कांना समाजाची मान्यता मिळावी लागते आणि राज्याकडून ते अंमलात आणले जावे लागतात तरच त्यांचा लाभ व्यक्तीला होऊ शकतो. म्हणून नागरिकांना प्राप्त होणाऱ्या हक्कांचे स्वरूप सर्वत्र सारखे नसते. उदाहरणार्थ, मोफत शिक्षणाची सोय हा काही सधन देशांत नागरिकांचा हक्क आहे, पण आर्थिक दृष्ट्या अप्रगत देशांना हा हक्क देणे परवडत नाही. प्रत्येकाला उपजीविकेचे साधन देण्याचा हक्क काही देशांतील नागरिकांना असतो. अशा देशांत नोकरी-व्यवसाय मिळू न शकलेल्या लोकांना बेकारी भत्ता दिला जातो. पण सर्वच देशांना अशा प्रकारचा हक्क देणे परवडणारे नसते. माणसाला चांगले जीवन जगण्यासाठी आणि स्वत:चा नैतिक आणि भौतिक विकास घडवून आणण्यासाठी अत्यावश्यक असे जे हक्क असतात ते मूलभूत हक्क' म्हणून ओळखले जातात. लोकशाही देशांत अशा मूलभूत हक्कांचा समावेश राज्यघटनेमध्ये केलेला असतो व त्यांच्या संरक्षणाची योग्य तरतूद केलेली असते. कारण मानवी हक्कांची शाश्वती हे लोकशाहीचे प्राणतत्त्वच होय भारताच्या राज्यघटनेतही मूलभूत हक्क देण्यात आलेले आहेत आणि त्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक त्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

ॲरिस्टॉटल म्हणतो की, राज्य मनुष्याच्या सुरक्षिततेसाठी निर्माण होते व मनुष्याच्या कल्याणाकरिता ते टिकून राहते. मनुष्याचे कल्याण साधावयाचे असेल तर त्यासाठी अशा प्रकारची परिस्थिती निर्माण केली पाहिजे की ज्यात त्याची सर्वांगीण उन्नती होऊ शकेल तसेच ते असेही म्हणतात की, उत्तम प्रकारे जीवन व्यतीत करावयाचे असेल तर तशा प्रकारची परिस्थिती निर्माण करणे आवश्यक असते ज्यात असे जीवन जगणे शक्य होईल.त्यामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाठी त्याला त्यासाठी काही साधने उपलब्ध करून दिली जाहिजेत ही साधने म्हणजे हक्क होत हक्क हे फक्त व्यक्तिगत हिताचेच साधन नसून सामाजिक कल्याणाचे ते एक माध्यम आहे. बोसांकी, म्हणतात, 'हक्कामुळे व्यक्तिगत

कल्याण तर होतेच; परंतु ज्या सामाजिक समूहाचा आपण एक भाग आहोत त्या सामाजिक समूहाचे हित देखील हक्कातून साधल्या जाते. अरिस्टॉटलच्या भाषेत सांगावयाचे तर, हेच सामूहिक हित जीवन असते. असे सुखी जीवन प्राप्त झाले नाही तर व्यक्तीचे कल्याण होऊ शकणार नाही. लास्की म्हणतात, त्याप्रमाणे हक्क हे समाजजीवनाच्या अशा अवस्था आहेत की, ज्याशिवाय कोणतीही व्यक्ती आपला सर्वांगीण विकास साधू शकत नाही' हक्क मानवी जीवनात इतके महत्त्वपूर्ण असले तरी राज्य जोपर्यंत हक्कास मान्यता देत नाही तोपर्यंत हक्कास काही अर्थ नसतो. मनुष्याचे जीवन खऱ्या अर्थाने विकसित करावयाचे असेल, तर हक्क ही एक मूलभूत गरज आहे. ज्यास राज्याकडून मान्यता मिळालेली असते.

## १.२ हक्काच्या व्याख्या:

हक्काचे स्वरूप पाहता हकाच्या विभिन्न लेखकांनी वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या दिसून येतात. **लास्की** यांची मते, हक्क या सामाजिक जीवनाच्या त्या अवस्था आहेत ज्याशिवाय कोणतीही व्यक्ती आपली सवागीण प्रगती घडवू शकत नाही.

**हॉलं** यांच्या मते, हक्क म्हणजे सामाजिक शक्तीच्या आधारावर एका व्यक्तीची दुसऱ्या व्यक्तीच्या वर्तणुकीवर प्रभाव निर्माण करण्याची पात्रता होय'.

**बोसांके** हक्काची व्याख्या करताना म्हणतात ", हक्क अशा मागण्या आहेत की ज्यास समाज मान्यता देतो आणि राज्य त्याना प्रत्यक्षात आणते".

**ग्रीन** यांच्या मते नैतिक प्राणी या दृष्टिकोनातून मनुष्याच्या व्यवसायपूर्तीसाठी ज्या शक्ती अस्तित्वात असतात त्यांना हक्क असे म्हणतात.

**ऑस्टिन** यांच्या मते " एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीकडून विशेष प्रकारे कार्य क्षमतेस हक्क असे म्हणतात".

वरील व्याख्यांवरून असे दिसून येते की, हक्कांचा उदय हा व्यक्तीच्या हितासाठीच झालेला असल्याचे सर्व विचारवंत मान्य करतात. फक्त ऑस्टिनचा सर्वकषवादी दृष्टिकोन सोडल्यास हक्काबद्दलची नैतिक कल्पनाच सर्वांनी मान्य आहे. अर्थात हक्क हे आवश्यक असले तरी प्रत्येक राज्य हे हक्क कशा प्रकार लोकांना उपलब्ध करून देते यावरच त्या राज्याचे स्वरूप अवलंबून असते.

## १.३ हक्कांची वैशिष्ट्ये:

हक्काचे मानव जीवनातील महत्व लक्षात घेता हक्काचे पुढील काही वैशिष्ट्ये सांगता येतील.

**१) हक्क समाजातच निर्माण होतात:**

समाजाच्या बाहेर हक्क अस्तित्वात राहू शकत नाहीत. समाजाबाहेर हक्कांची कल्पना करणेही व्यर्थ आहे. निर्जन अरण्यात एकलकोंड्या अवस्थेत हक्क या कल्पनेस काहीही अर्थ उरत नाही कारण त्याच्या स्वार्थाआड तेथे कोणीही येऊ शकत नाही. जेव्हा माणूस सामाजिक समूहात राहतो त्या वेळी त्याच्या स्वातंत्र्यावर इतरांकडून आक्रमण होण्याची शक्यता असते. याचवेळी

खऱ्या अर्थाने हक्कांची आवश्यकता भासते. समूहजीवन नसेल तर त्यामुळे हक्कांची आवश्यकताच उरणार नाही म्हणून हक्क हे केवळ समाजातच अस्तित्वात येतात.

**२) हक्क हे स्वाभाविक असतात:**

राज्य हक्कांची निर्मिती करत नाही, राज्य केवळ हक्कांना मान्यता देते व त्यामुळे नागरिकांना असे हक्क उपभोगावयास मिळतात. उदा जीवन जगण्याचा अधिकार अत्यंत स्वाभाविक असा अधिकार आहे. राज्याने त्यास निर्माण केले नाही. त्यास मान्यता दिली आहे व त्यास वैधानिक मान्यताही दिली आहे.

**३) हक्क व कर्तव्ये एकमेकांशी संबंधित असतात**:

हक्क कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू समजल्या जातात. कर्तव्यपालनाशिवाय हक्काच्या तरतुदीस काही अर्थ नसतो. सामाजिक तडजोडीसाठी व प्रत्येकाच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी हक्कांची तरतूद केलेली असते, परंतु असे असले तरी प्रत्येकाचे स्वातंत्र्य अबाधित राखले जाणे आवश्यक असल्यामुळे हक्काबरोबर कर्तव्याचेही पालन केले पाहिजे. सामूहिक जीवनात तुमचा हक्क हे माझे कर्तव्य ठरते अंधारातून सायकल चालविताना सायकलचा दिवा लावणे माझे कर्तव्य आहे त्यामुळे तुमचा सुरक्षितपणे घालण्याचा हक्क अबाधित राहतो. म्हणून हक्क एकमेकांशी निगडित आहेत.

**४) हक्क म्हणजे विशेषाधिकार नाही:**

विशेषाधिकार एका किंवा थोड्यांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे ते संकुचित वाटतात. पण हक्क व्यापक अर्थाने समाजाचे हित साधण्याचा प्रयत्न करत असतात. एखाद्या व्यक्तीकडून हक्काची मागणी होत असताना त्या हकांची मागणी ती व्यक्ती फक्त स्वता करिताच करत नाही तर तो हक्क इतर सर्वांकरिता मागत आहे. संपूर्ण समाजाचे नैतिक कल्याण त्यातून साधले जात असते. हक्क व्यक्तिगत हिताप्रमाणेच सामाजिक हित साधण्याचा प्रयत्न करतात म्हणून हक्काचे स्वरूप हे कल्याणकारी असते असे म्हणतात. समाजाचे हित ज्यामध्ये आहे असेच हक्क प्रदान करण्यात येतात. चोरी करण्याचा किंवा आत्महत्या करण्याचा हक्क कोणालाही प्राप्त होऊ शकत नाही.

**५) हक्क स्थीर नसतात:**

मनुष्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हक्कांची निर्मिती झालेली असते.त्यामुळे त्या विशिष्ट गरजा संपल्या की हक्कांचे स्वरूपच नष्ट होऊन जाते. समजा, काही काळानंतर धर्माचे अस्तित्व नष्टच झाले तर धार्मिक अधिकारास काहीही महत्त्व राहणार नाही. मनुष्याच्या गरजा सतत बदलत राहतात व त्यानुसार हक्कांतही आपोआप बदल होत जातात. म्हणून हक्क स्थिर स्वरूपाचे नसतात.

**६) हक्क हे निश्चित स्वरूपाचे असतात:**

कोणत्याही समाजात दिलेल्या हक्कांना निश्चित असे स्वरूप असते. प्रत्येक जण वेगवेगळा हक्क मागू लागला म्हणून ते हक्क त्यांना मिळत नाहीत. तसे होऊ लागले तर हक्कांना काहीच अर्थ उरणार नाही, अशा हक्कांची यादी जितक्या व्यक्ती तितके हक्क इतकी होईल. कोणत्याही देशात लोकांना जे हक्क दिले जातात, त्यांचे निश्चित व विवक्षित असे स्वरूप असते.

## १.४ हक्काचे वर्गीकरण

हक्कांचे विभाजन प्रामुख्याने दोन भागांत करण्यात येते. १ (नैतिक हक्क) Moral Rights) व वैधानिक हक्क) Legal Rights), वैधानिक हक्कांचे पुन्हा दोन भागांत विभाजन करता येईल. २ (नागरी हक्क) Civil Rights) २) राजकीय हक्क) Political (Rights).

**१) नैतिक हक्क** :

नैतिक हक्कांचा संबंध मनुष्याच्या नैतिक जागृतीशी येतो. नैतिक हक्क त्याच हक्कांना म्हणता येईल की, जे समाजाच्या सामुदायिक, नैतिक व्यवहारावर आधारलेले आहेत. प्रत्येक शिक्षकाचा हा हक्क आहे की, विद्याथ्र्यांनी त्यास योग्य तो मान वावा. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याचा एक हक्क आहे की, शिक्षकाने त्याच्याकडे पालकाप्रमाणे लक्ष द्यावे, परंतु नैतिक हक्कांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, सरकारचे पाठबळ त्याच्या पाठीमागे नसते. एखादा नैतिक हक्क सुरक्षित राहिला नाही तर राज्य कोणतीही कारवाई करू शकत नाही. एखादे वेळी एखाद्या नैतिक हक्काची उपयुक्तता व समाजाचा फार मोठा पाठिंबा लक्षात घेता नैतिक हक्कास राज्य वैधानिक स्वरूप देते ही गोष्ट वेगळी.

**२) वैधानिक हक्क** :

वैधानिक हक्क राज्याकडून मान्यता पावलेले हक्क असतात. राज्याचे पाठबळ त्या पाठीमागे असते वैधानिक हक्कांचा भंग झाला तर सरकारविरुद्ध किंवा एखाद्या नागरिकाविरुद्ध न्यायालयात जाता येते. वैधानिक हक्क हे सर्वांना समान रौतीने दिले जातात. त्यात जात, धर्म, वर्ण इत्यादीबाबत भेदाभेद करण्यात येत नाही. उदा. राम्य नागरिकांना भाषण स्वातंत्र्याचा अधिकार देते. हा अधिकार देताना राज्य हेही कटाक्षाने पाहते की या हक्कामुळे इतरांच्या हक्कांवर आक्रमण न होता त्या व्यक्तीचा विचार व्यक्त करण्याचा अधिकार मात्र सुरक्षित राहावा. वैधानिक हक्कांचे पुन्हा दोन भागांत विभाजन करता येते. १) नागरिक हक्क आणि २) राजकीय हक्क

**३) नागरी हक्क :**

मानवी जीवनाच्या मूलभूत गरजा पूर्ण करणारे जे हक्क असतात त्यांना नागरी हक्क असे म्हणतात. दुसऱ्या भाषेत असे म्हणता येईल की सुखी, सामाजिक, सन्मानपूर्वक जीवन

व्यतीत करण्यासाठी ज्या आवश्यक अवस्था असतात त्यांना नागरी एक असे म्हणतात. नागरिकाचा मानसिक, नैतिक व सामाजिक विकास याहक्कांद्वारेच होत असतो. आधुनिक राज्यात प्रत्येक राज्यघटनेने या हक्कांचा समावेश केला आहे व ते हक्क जर नष्ट होत असतील तर त्याविरुद्ध उपाययोजनाही केली आहे. या हक्का सविस्तर विचार होईलच एवढे मात्र खरे की, नागरी हक्कांशिवाय व्यक्तीला सर्वांगीण विकास करता येणार नाही. उदा शिक्षणाचा हक्क नसेल तर बौद्धिक विकास होणार नाही मालमत्तेचा अधिकार नसेल तर त्याला स्वतःचा आर्थिक विकास करता येणार नाही इत्यादी.

४) **राजकीय हक्क :**

राज्याच्या दैनंदिन व्यवहारात भाग घेता यावा म्हणून जे ह निर्माण करण्यात येतात त्यांना राजकीय हक्क असे म्हणतात नागरी हक्क जसे वैयक्तिकदृष्ट्या बापरता येतात, तसे राजकीय हक्कांचे नसते. राजकीय हक्क नागरिक म्हणूनच वा यात येतात. राज्याच्या दैनंदिन कारभारात भाग घेण्यासाठी प्रामुख्याने या हक्कांची योजना केलेली असते. राजकीय हक्कांमुळेच लोकशाही प्रत्यक्षात उतरविणे शक्य झाले आहे आजचा काळ हा लोकशाहीचा काळ आहे. लोकशाहीत लोकच सार्वभौम असतात. सर्वसत्ता त्यांच्या हाती केंद्रित झालेली असते. ही सत्ता वापरावयाची असेल तर राजकीय हक्क लोकांना देणे जरूरी आहे. त्याशिवाय राज्यकारभारात लोकांना भाग घेता येणार नाही. उदा निवडणुकीस उभे राहण्याचा अधिकार लोकांना दिल्याशिवाय त्यांना सरकार चालविता येणार नाही.

**नागरी हक्क) Civil Rights) :**

आधुनिक काळात नागरिकांचे अनेक नागरी हक्क राज्याने मान्य केले आहेत ते हक्क व्यक्तीच्या जीवनाच्या मूलभूत गरजा पूर्ण करणारे असतात. काही ठळक नागरी हक्कांचे वर्णन खालीलप्रमाणे करता येईल.

१) **जीवन जगण्याचा हक्क :**

कोणत्याही मनुष्याच्या जीवनात सर्वात जास्त महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे जिवंत राहणे ही होय ती सर्वात प्राथमिक व मूलभूत गरज असल्यामुळे जीवन जगण्याचा अधिकारही तितकाच आवश्यक व मूलभूत असा नागरी हक्क बनला आहे. जगातील सर्वच घटनांनी हा हक्क निर्विवादपणे मान्य केला आहे. बा हक्काचा अर्थ आपणास तीन भागांत सांगता येईल. पहिले असे की कोणत्याही व्यक्तीस इतर व्यक्तीचे प्राणहरण करण्याचा अधिकार नाही. मनुष्याच्या समूहप्रिय वृत्तीतून समाज निर्माण झाला व व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने व्यक्ती व्यक्तीतीत संघर्ष अटळ झाले. हे संघर्ष अजूनही कायम आहेत; परंतु या संघर्षातून इतर व्यक्तीस ठार मारण्याचा अधिकार कोणत्याही व्यक्तीस पोहचत नाही असे जर ती व्यक्ती करू लागली तर सरकार त्या व्यक्तीस शिक्षा करते. उदा. महात्मा गांधीचा खून केल्याबद्दल नथुराम गोडसेस फाशीची शिक्षा झाली होती आजच्या सर्वच राज्यांना व्यक्तिगत सुरक्षेचे उपाय योजिले

आहेत. दुसरे असे की कोणत्याही व्यक्तीस आत्महत्या करण्याचा अधिकार नसतो याचे कारण असे की प्रत्येक व्यक्तीचा विकास करण्याचे कार्य राज्यास करावयाचे असते. आत्महत्येमुळे राज्याच्या या कार्यात बाधा उत्पन्न होऊ शकते प्रत्येक व्यक्ती समाजास कोणत्या ना कोणत्या पद्धतीने उपयोगी असते समजा, एखाद्या डॉक्टरने आत्महत्या केली तर त्यापासून मिळणाऱ्या फायद्यास समाज वंचित होईल. याशिवाय लोकशाहीत प्रत्येक व्यक्ती समाजाचा मौ असतो हा घटक नष्ट होणे लोकशाहीच्या हिताचे नाही. आत्महत्या म्हणजे समाजाचे एकप्रकारेच आहे. रिची असे म्हणतो की, ज्या लोकांना आपले जीवन भार त्यांच्यात देखील समाजसेवेची क्षमता असते. तिसरे असे की, जीवन अधिकार निरंकुश स्वरूपाचा असू शकत नाही. त्यावरही काही मर्यादा आहेत. राज्याने कीस सुरक्षिततेची हमी दिली आहे; परंतु जेव्हा राष्ट्राचेच अस्तित्व धोक्यात येते. तीने राष्ट्रासाठी आपले जीवित समर्पित करण्याची तयारी ठेवली पाहिजे. राष्ट्राचे व अखंडत्व टिकवून ठेवण्यासाठी प्रसंगी प्राणाचीही आहूती देण्याचा प्रयत्न केला " बऱ्याच लेखकांनी हे मान्य केले आहे; परंतु काही लेखकांच्या मते अशा प्रकारे जीवनापासून वंचित करण्याचा अधिकार राज्यास नाही टॅफ्ट तर असे म्हणतो की, जो समाज जीवनास एवढे महत्त्व देतो, त्याने ते इतक्या तत्परतेने परत घेऊ नये " जीवन जगण्याच्या हक्कावर पडणारे दुसरे नियंत्रण म्हणजे कायद्याचे होय कायद्याचा भंग करून व्यक्ती जीवन जगू शकत नाही. त्यामुळे इतरांचे जीवन धोक्यात येण्याचा संभव असतो आणि समाजात गोंधळ, बेबंदशाही निर्माण होण्याचा धोका असतो.

**२) काम करण्याचा हक्क:**

जीवन जगण्याचा अधिकार काम करण्याच्या हक्कामुळे पूर्णतेस जाऊन पोहोचतो. व्यक्तीस काम करण्याचा अधिकार नसेल तर त्याला आपल्या उपजीविकेचे साधन उपलब्ध करणे कठीण जाईल व त्याच्या जीवन जगण्याच्या अधिकारास त्यामुळे अर्थ उरणार नाही. प्रत्येक व्यक्तीस आपल्या श्रमावर जगण्याचा अधिकार आहे; परंतु श्रम करण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य राज्य करीत असते. सुदृढ व सक्षम व्यक्तींना काम करण्याचा अधिकार मिळवून देणे हे प्रत्येक राज्याचे कर्तव्यच आहे आजचे राज्य हे लोककल्याणकारी राज्य मानले जाते. लोककल्याणकारी राज्यात तर सरकारकडून नागरिकांच्या फार मोठ्या अपेक्षा असतात. जास्तीत जास्त लोकांचे सुख व कल्याण साधण्यासाठी त्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध होणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट असते. राज्याने हे कार्य केले नाही तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासातील राज्य हीच एक मोठी घोड ठरते असे म्हणता येईल. त्यामुळे प्रत्येक राज्याने आपल्या नागरिकांना काम करण्याचा हक्क उपलब्ध करून दिला आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की प्रत्येक व्यक्तीस आपल्या मनाप्रमाणे काम मिळेल. ज्या व्यक्तीची जी पात्रता असेल त्याचप्रमाणे त्या व्यक्तीस काम मिळू शकते. उदा. एखाद्या कामगारास डॉक्टरचे काम कधीच मिळू शकणार नाही काम करण्याच्या हक्काचा दुसरा अर्थ असाही आहे की कामगारास त्याच्या कामाचा पूर्ण मोबदला मिळाला पाहिजे. त्याच्या जीवनाच्या ज्या काही प्राथमिक व अत्यावश्यक

गरजा आहेत त्या कामाच्या मोबदल्यातून भागल्या पाहिजेत. उदा अन्न, वस्त्र, निवारा इत्यादी कामगारांच्या कामाचे तासही निश्चित झाले पाहिजेत आता ते प्रत्येक देशातून होतही आहेत औद्योगिक राज्यक्रांतीच्या काळात कामाचे तास निश्चित नसल्यामुळे कामगार हा यंत्राचाच एक निजीव भाग बनून गेला होता. हे

आपणास माहीतच आहे. अतिश्रमामुळे थकवा, अकार्यक्षमता च निराशा निर्माण होते. जर त्यास विचार करावयास वेळ नसेल तर तो उत्तम नागरिक बनू शकणार नाही अ तर म्हणतो की उत्तम नागरिक उत्तम राज्य निर्माण करतात. भारतात अजून हा अधिकार मूलभूत मानला गेला नाही त्यामुळे बेकारी भयंकर प्रमाणात वाढत आहे. बऱ्याच देशात अशी दयनीय स्थिती आहे. चीन व रशिया या देशांनी प्रत्येक नागरिकास काम करण्याचा हक्क खऱ्या अर्थाने मिळवून दिला आहे. चीन ब रशियात बेकार मनुष्य शोधूनही सापडावयाचा नाही इतर देशांपुढे काम करण्याच्या हक्काच्या बाबतीत दोन पर्याय आहेत. पहिला असा की प्रत्येक नागरिकास कामाची हमी सरकारने दिली पाहिजे व दुसरे असे की हे अशक्य असेल तर जोपर्यंत नागरिक बेकार राहतो तोपर्यंत त्याच्या उदरनिर्वाहासाठी न्यूनतम आवश्यक वेतनाची व्यवस्था केली पाहिजे. इतकेच नव्हे तर कामगार, सरकारी व दिन सरकारी नोकर यांना योग्य वेळशीर वेतन दिले जाते किंवा नाही हेही राज्याने कटाक्षाने पाहिले पाहिजे. एकंदरीत केवळ व्यक्तीस जिवंत ठेवण्यासाठीच नाही तर राष्ट्र जिवंत राहण्यासाठी प्रत्येक व्यक्तीस काम करण्याचा हक्क प्राप्त झाला पाहिजे.

### ३) शिक्षणाचा हक्क :

शिक्षणाचा हक्क आधुनिक युगात तर अत्यंत आवश्यक हक्क मानला गेला आहे. पूर्वीच्या काळात राज्याची संपूर्ण सूत्रे राजाच्या हाती असत. लोकांचा राज्यकारभाराशी फारसा संबंध येत नसे; परंतु आता लोकशाहीचा अवलंब बव्हंशी राष्ट्रांनी केला आहे. त्यामुळे शासनाचा मध्यबिंदू आता जनताच आहे. लोकांना जर राज्यकारभार कसा करावा याचे अजिबात ज्ञान नसेल किंवा लोक संपूर्णपणे अशिक्षित असतील तर राज्यकारभार चालेल कसा? बैलगाडी चालविणारास ज्या खेडेगावास जावयाचे आहे तेथील रस्ता माहीत असला पाहिजे. त्याचप्रमाणे लोकशाहीच्या यशस्वितेसाठी लोकांना शिक्षण प्राप्त होणे अत्यंत आवश्यक असते.

शिक्षणाचा हक्क म्हणजे राज्याने नागरिकास सुशिक्षित करण्यासाठी संपर्ण व्यवस्था केल्या पाहिजेत. शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण बौद्धिक विकास होतो व्यक्तीच्या नैतिक विकासाचेही ते एक साधन आहे नागरिकत्वाच्या प्रशिक्षणात शिक्षणाचे महत्त्व कधीही नाकारता येणार नाही. लोककल्याणाची दृष्टी शिक्षणातून विकसित होऊ शकते व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हे एक महत्त्वपूर्ण असे प्रभावी माध्यम आहे. नागरिकत्वाच्या कार्यासाठी शिक्षण व्यक्तीस परिपूर्ण पद्धतीने तयार करते. लास्की असे म्हणतो की, “जे विचार निर्माण करतात व आत्मसात करतात, अंतिमदृष्ट्या सत्ता त्यांच्याच हाती जाते".

munotes.in

अशिक्षित व्यक्ती राज्यकारभाराचे संपूर्ण ज्ञान सहजासहजी प्राप्त करून घेऊ शकत नाही त्यास राज्यव्यवहार कदाचित कळणारही नाही व देशाचे हित कशात आहे हेही तो समजू शकणार नाही. लोकशाहीचे धनी किंवा मालक हे लोक आहेत म्हणून लोकांना सुशिक्षित केले तर लोकशाही चांगल्या प्रकारे सांभाळली जाऊ शकेल. शिक्षणाने नागरिकांस केवळ हक्कांचीच जाणीव होते असे नाही तर अंतर्मुख होऊन तो आपल्या कर्तव्याचाही विचार करू लागतो. म्हणूनच लास्की म्हणतो की, "कर्तव्याच्या सुयोग्य पालनासाठी आवश्यक बाबतीत राज्याने करू नये. अर्थ मिळावे नागरिकांचा कल आयड, इत्यादींचा विचार करून पाहिजे. दुसरे असे की प्रत्येक नागरिकास सक्तीने एका विशिष्ट राज्याने शिक्षण दिलेच पाहिजे त्यातून उत्तम नागरिक निर्माण होऊ शकतील. प्रत्येक राज्य दृष्टीने विचार करीत आहे ही सुदैवाची गोष्ट म्हटली पाहिजे.

**४) मालमत्तेचा हक्क :**

व्यक्तीस मिळालेल्या सर्व नागरी अधिकारात मालमत्तेय्या अधिकारासारखा दुसरा कोणताही वादग्रस्त अधिकार नसेल. मालमत्तेचा मोठा जीवनावर तसेच संपूर्ण मानवी संस्कृतीच्या इतिहासावर झाला आहे. आजच्या जे अनेक राजकीय बाद निर्माण झाले) साम्राज्यवाद, साम्यवाद (त्यामागे मालमत्ता कारण असे म्हणता येते. या हक्काचे समर्थन कसे केले जाते नंतर त्या हक्कावर कशी टीका केली जाते हे पाहू.

अनेकांनी मालमत्तेचे समर्थन केले आहे. पहिले असे की संचय करणे प्राणिमात्रात असे आढळून येते. मुंग्या खाद्यसंचय करतात तर कुत्रादेखील तोंडातील पदार्थ काढून घ्यायचा प्रयत्न केल्यास रौद्र स्वरूप धारण करतो चित्रांचा किंवा खेळण्यांचा संग्रह करतात तीच प्रवृत्ती मालमत्तेच्या संचवाच्या दिसून येते. यातूनच मालमत्ता ही संस्था निर्माण झाली. म्हणून राज्यास मालमत्ता करता येणार नाही. फार झाले तर तिचे नियंत्रण करता येईल. दुसरे असे मालमत्ता स्वकर्तृत्वाचे असते. बुद्धिमान मेहनती माणसे संपत्ती कमावतात, संपत्ती कमावणे प्रत्येकाला शक्य होणार नाही म्हणून कर्तृत्व व बद्धिमत्तेचे फळ असते ते नष्ट ठरणार नाही याकरिता मालमत्तेचा हक्क सुरक्षित ठेवला तिसरे असे असल्यामुळे भविष्याची हमी प्राप्त वृद्धापकाळी मालमत्तेचा आधार असेल निश्चितपणे आयुष्य येते. उपासमारीच्या संकटापासून मनुष्य वाचू शकतो. चौथे मालमत्ता असल्यामुळे व्यक्तीस मोकळा वेळ मिळू शकतो या वेळेचा उपयोग घडणीकडे देशाच्या हिताकडे व्यक्ती शकते. वरील सर्व बाबींचा असे दिसून येते मालमत्ता ही एक अत्यंत आवश्यक संस्था आहे. निरुपयोगी कालाच्या ओघात केव्हाच नष्ट झाली असती.

मालमत्तेस विरोध करणारे विचारवंत असे म्हणतात की, मालमत्ता ही एक समाजहितास अपायकारक असणारी संस्था आहे. ती नष्टच केली पाहिजे त्याचे पहिले कारण असे दारूण आर्थिक विषमता निर्माण करते व समाजाच्या सर्वच रोगांचे मूळ मालमत्तेमुळे श्रीमंत जास्त श्रीमंत गरीब हे अति गरीब जातात. मालमत्तेचा हक्क मान्य समाजात मालमत्ता नाकारण्यासारखेच आहे. वास्तविक समाज है एक कुटुंबच आहे त्यातील सर्वच गोष्टीवर सर्वाचा

munotes.in

समान अधिकार प्रस्थापित झाला पाहिजे. दुसरे असे को संपत्तीमुळे समाजात एक मोठा चैनी, सुखविलासी व आळशी असा एक वर्ग निर्माण होतो. त्याच्या खुशालचेंडू प्रवृत्तीमुळे त्याची शक्ती राष्ट्राच्या उभारणीस कामी येत नाही. ती वाया जाते. सामाजिक बांडगुळे निर्माण करण्याचे कार्य मालमत्ता करीत असते. एकंदरीत मालमता असावी की नसावी हा प्रश्न जरी वादग्रस्त असला तरी लास्की म्हणतो त्याप्रमाणे ती संपूर्णपणे नष्ट करु नये. जी मालमत्ता श्रमाचे फळ नसते ती नष्ट करावयास हरकत नाही. रशिया चीनसारख्या देशात घटनेने मालमत्तेचा हक्क लोकांना दिला असला

तरी सामाजिक न्याय व सामूहिक कल्याण या तत्त्वानुसार त्यावर आवश्यक ती बंधने टाकण्यात आली आहे. आजही प्रगतिशील देशात श्रीमंतावर जास्त कर लादून व इतर मार्गांनी हा हक्क मर्यादित करण्यात आला आहे भारतीय घटनेच्या ३१ व्या कलमात हा हक्क दिला आहे. त्यात दुरुस्त्याही झाल्या आहेत.

**५) भाषा व मुद्रणस्वातंत्र्याचा अधिकार :**

भाषण व मुद्रणस्वातंत्र्याचा हक्क हो लोकशाहीची मूलभूत गरज आहे. लोकशाही त्यातूनच उभी राहते, टिकून राहते. प्रा. बरी म्हणतो त्याप्रमाणे मानसिक व नैतिक उन्नतीसाठी ही एक सर्वोच्च अवस्था आहे. कोणत्याही समाजाची प्रगती हक्काशिवाय होऊ शकत नाही. भाषणाच्या व मुद्रणाच्या आधारेच आपण आपले विचार व्यक्त करू शकतो. या अधिकारातून व्यक्तीला स्वतःचे संरक्षणदेखील करता येते. हा अधिकार प्रामुख्याने अन्यायाविरुद्ध वापरला जातो. दडपशाहीविरुद्ध वापरता जातो. ही दडपशाही व्यक्तीची असो की सरकारची असो व्यक्तिगत अथवा सरकारच्या रागाची पर्वा न करता आपल्या मनातील विचार मांडण्याचे हे स्वातंत्र्य आहे. व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठीदेखील आपले विचार मांडण्याचा हक्क अत्यंत आवश्यक आहे. आपले ज्ञान व अनुभव यांना विस्तृत कक्षा प्राप्त करून देण्याचे कार्य हा अधिकार करीत असतो. त्याचप्रमाणे लोकांच्या तक्रारीबद्दल सरकारला सतत जागे ठेवण्यासाठी हा अधिकार वापरणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. निवडणुकीच्या काळात भाषणे व वृत्तपत्रांच्या साह्याने सरकारवर टीका होते व सरकारला चुकीच्या मार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न सर्वसामान्य काळात याच हक्काद्वारे केला जातो. या हक्कावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवणे म्हणजे लोकशाहीच्या भावनेवरच प्रहार करण्यासारखे आहे. विचारांना दडपणे म्हणजे सत्य दडपण्यासारखेच आहे. अनेक विचारांच्या संघर्षातूनच सत्य पुढे येत असते. मॅक आयव्हर म्हणतो की, विचार दडपून टाकण्यासाठी राज्याने शक्तीचा प्रयोग कधीही करू नये, विचार फक्त दुसऱ्या प्रभावी व श्रेष्ठ विचारानेच दडपले जाऊ शकतात; परंतु याचा अर्थ असा नाही की, अधिकार नागरिकांना अनिर्बंधपणे वापरता येतो. सामाजिक शांतता व इतरांच्या हक्कांचे संरक्षण यास जर भाषण व मुद्रण स्वातंत्र्यामुळे बाधा येत असेल तर सरकार त्यावर मर्यादा टाकते. सामाजिक विद्रोह माजविणे, घटना उलथून टाकणे किंवा जातीय बैमनस्य निर्माण होईल अशी वक्तव्ये किंवा लिखाण करणे या प्रकारास सरकार प्रतिबंध होतो.

राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात तर या हक्कांवर जास्त मर्यादा पडतात व ते आवश्यक आहे. राष्ट्रीय सार्वभीमत्वास तडे जाऊन राष्ट्रीय ऐक्य जर युद्ध अथवा आणीबाणीच्या काळात धोक्यात येत असेल तर त्याचा प्रतिबंध करीत असते. सास्कीच्या मते युद्धकाळातदेखील सरकारने या हक्कावर मर्यादा आणू नयेत. सरकारने या काळातही अनुतेचे मत घेतल्याशिवाय पावले टाकू नयेत.

६) **सघ व सभास्वातंत्र्य :** मनुष्य हा समूहप्रिय प्राणी आहे. या वृत्तीतून प्रथम समाजाची निर्मिती झाली; परंतु मनुष्यजीवनाच्या विविध अशा असंख्य गरजा आहे. त्या पूर्ण करण्यासाठी विविध असे संघ अस्तित्वात येतात व व्यक्तिमत्त्व पूर्णपणे विकसित करण्याचा प्रयत्न करतात असे संघ स्थापन करण्याचा प्रत्येक व्यक्तीला अधिकार आहे. गर्क व मेटलैंड म्हणतात त्याप्रमाणे संघ हे. मनुष्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीतूनच निर्माण झाले आहेत. अनेकसत्तावादी तर राज्यासच एक संघ मानतात. राज्यही मनुष्याच्या राजकीय गरजेतूनच निर्माण झाले आहे हे विसरता येत नाही. जीवनाच्या अशा कितीतरी विविध गरजा आहेत की ज्या मनुष्य एकटा पूर्ण करू शकत नाही; त्यास इतरांचे साह्य घ्यावेच लागते. याच कारणानुसार अनेक व्यक्ती एकत्र येऊन संघाची स्थापना करतात. समाजाच्या हिताच्या दृष्टीने तो आपले विचार या संघाद्वारा व्यक्त करू शकतो अर्थात संघ स्वातंत्र्य हे अमर्याद स्वरुपाचे असू शकत नाही. राज्य ही एक सर्वमान्य अशी सार्वभौम संघटना असते. अशा आवश्यक संघटनेस उलथून टाकण्याचे कार्य जर एखादा संघ करीत असेल, तर संघाचे अस्तित्वच नष्ट करण्याचा अधिकार सरकारला असू शकतो. एखादा संघ राज्याच्या अस्तित्वास जर धोकादायक ठरत असेल तर त्याचे समूळ उच्चाटन करण्याचा अधिकार सरकारला असतो.

संघस्वातंत्र्याप्रमाणेच सभास्वातंत्र्यही महत्त्वपूर्ण असते. सभास्वातंत्र्य हे एका अर्थाने भाषण व विचारस्वातंत्र्यच आहे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या मनातील विचार व्यक्त करण्याचा अधिकार असतो; परंतु या विचारास सभासंमेलनाच्या स्वरूपात मांडले तर त्यास मोठे सामाजिक वळ प्राप्त होते. सरकारदेखील अशा विचाराकडे लक्ष देते अर्थात, यावरही बंधने पडतातच. एखादी सभा जर सामाजिक आरोग्याचा नाश करणारी असेल तर अशी सभा चेकायदेशीर ठरवण्याचा अधिकार सरकारला आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय आणीबाणी किंवा युद्धाच्या काळात जर राष्ट्राच्या सार्वभौमत्वास व अखंडत्वास बाधा आणणारे वक्तव्य कोणी करीत असेल तर सरकार त्यास शिक्षा करू शकते. चीन व पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले त्या काळात अनेक लोकांना अंतर्गत सुरक्षा कायद्याखाली अटक करण्यात आली होती. लोकशाहीच्या यशासाठी हा अधिकार अत्यंत आवश्यक आहे; परंतु लोकशाही टिकून राहण्यासाठी व राष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी या हक्कावर काही बंधनेही टाकण्यात आली

७) **धार्मिक हक्क :**

प्राचीन कालापासून आजपर्यंत व्यक्तीचे संपूर्ण जीवन धर्माने व्यापून कले होते. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत धार्मिक रीतीरिवाजांचा फार मोठा पगडा मनुष्यजीवनावर आजही दिसून येतोच प्राचीन काळात तर धर्म हेच जीवन होते. आजही धर्माचे बऱ्याच प्रमाणात दिसून येते. धर्म हा

आध्यात्मिक उन्नतीचे साधन आहे. मानसिक शांतीचे ते एक माध्यम आहे. धर्मामुळे आणि त्याच्या आचरणामुळे मनुष्यात आत्मबळ निर्माण होते. म्हणूनच अनेक राष्ट्रांनी हा हक्क व्यक्तीचा महत्वपूर्ण नागरी हक्क म्हणूनच मान्य केला आहे.

धार्मिक हक्काचा अर्थ असा की, प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या इच्छेप्रमाणे अवलंब किंवा धर्माचे आचरण करण्याचा अधिकार आहे. त्यात कोणीही हस्तक्षेप क शकत नाही. भारतीय घटनेतील २५ व्या कलमात प्रत्येकाला हा हक्क देण्यात आला आहे. हिंदू, शिख, मुसलमान इत्यादी ठोक आपापल्या रीतीरिवाजाप्रमाणे धर्माचे आचरण करु शकतात. त्यांना कोणीही प्रतिबंध करू शकत नाही, परंतु धार्मिक हक्क संपूर्ण निरंकुश आहे असे नाही. या हक्कावरही काही बंधने टाकण्यात आली आहेत. पहिले असे की, धर्माच्या संबंधातच राज्यास कोणतेही आर्थिक किंवा राजकीय स्वरूपाचे कायदे पास करता येतात. त्यावर कोणीही बंधन आणू शकत नाही. सामाजिक कल्याणासाठी असे कायदे पास करण्याचा अधिकार राज्यास पोहोचतो. दुसरे असे की, जे धार्मिक हक्क आहेत त्याचा वैयक्तिक क्षेत्रात पूर्णपणे वापर प्रत्येक व्यक्तीला करता येतो; परंतु सार्वजनिक क्षेत्रात जर इतरांच्या भावना त्यामुळे दुखावल्या जात असतील तर तसा वापर करता येत नाही. तिसरे असे की सार्वजनिक संस्था व शिक्षणसंस्थांमधून एखाद्या धर्माचा प्रचार करणे किंवा एखाद्या धर्माचा अपप्रचार करणे हे योग्य नसते.

भारताची राज्यघटना धर्मातीत राज्य प्रस्थापित करते. सर्वधर्म घटनेच्या दृष्टिकोनातून समान आहेत. नागरिकांच्या कोणत्याही धर्माबद्दल राज्यास काहीही कर्तव्य नाही. सर्वधर्मसमानता हे भारतीय घटनेचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे भारतात खऱ्या अर्थाने लोकांना धार्मिक हक्क प्राप्त झाला असे म्हणतात. जगातील काही राज्यांनी धर्मासच आधार मानले आहे. उदा. १९५८ ची पाकिस्तानी राज्यघटना 'ईश्वरास स्मरून' या शब्दाने सुरु होते. त्याउलट रशिया, चीनसारख्या देशांनी सुरुवातीस धर्माचे समूळ उच्चाटन केले होते आताही धर्मास त्या देशात मुळी स्थान नाही. सरकारने धार्मिक हक्क थोडे शिथिल केले आहेत एवढेच धर्माधिष्ठित राज्यात व धर्महीन राज्यात लोकांचे धार्मिक हक्क कितपत सुरक्षित राहू शकतात हा वादाचा प्रश्न होऊ शकेल.

८) **कौटुंबिक हक्क :**

मनुष्य जातीच्या अस्तित्वासाठी कुटुंबाचा हक्क आवश्यक आहे यात शंका नाही सुसंस्कृत व संघटितरीत्या मानवाचे अस्तित्व त्यातून टिकून आहे. कुटुंबाचा हक्क इतका प्राथमिक व आवश्यक आहे की कोणत्याही काळात, कोणत्याही देशात व कोणत्याही सरकारला हा हक्क कधीच नष्ट करता आला नाही. कुटुंबसंस्था जर निरुपयोगी ठरली असती तर हा हक्कही केव्हाच नष्ट झाला असता त्याची उपयुक्तता केव्हाही नाकारणे अशक्य आहे.

कुटुंबाचा हक्क म्हणजे व्यक्तीस प्राप्त झालेला एक मूलभूत हक्क असून विवाह, कुटुब आजही दिसून येतोच. प्राचीन काळात तर धर्म हेच जीवन होते. आजही धर्माचे बऱ्याच प्रमाणात दिसून

येते. धर्म हा आध्यात्मिक उन्नतीचे साधन आहे. मानसिक शांतीचे ते एक माध्यम आहे. धर्मामुळे आणि त्याच्या आचरणामुळे मनुष्यात आत्मबळ निर्माण होते. म्हणूनच अनेक राष्ट्रांनी हा हक्क व्यक्तीचा महत्वपूर्ण नागरी हक्क म्हणूनच मान्य केला आहे.

धार्मिक हक्काचा अर्थ असा की, प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या इच्छेप्रमाणे अवलंब किंवा धर्माचे आचरण करण्याचा अधिकार आहे. त्यात कोणीही हस्तक्षेप क शकत नाही भारतीय घटनेतील २५ व्या कलमात प्रत्येकाला हा हक्क देण्यात आला आहे. हिंदू, शिख, मुसलमान इत्यादी ठोक आपापल्या रीतीरिवाजाप्रमाणे धर्माचे आचरण क शकतात त्यांना कोणीही प्रतिबंध करू शकत नाही, परंतु धार्मिक हक्क संपूर्ण निरंकुश आहे असे नाही. या हक्कावरही

काही बंधने टाकण्यात आली आहेत. पहिले असे की, धर्माच्या संबंधातच राज्यास कोणतेही आर्थिक किंवा राजकीय स्वरूपाचे कायदे पास करता येतात. त्यावर कोणीही बंधन आणू शकत नाही. सामाजिक कल्याणासाठी असे कायदे पास करण्याचा अधिकार राज्यास पोहोचतो. दुसरे असे की, जे धार्मिक हक्क आहेत त्याचा वैयक्तिक क्षेत्रात पूर्णपणे वापर प्रत्येक व्यक्तीला करता येतो; परंतु सार्वजनिक क्षेत्रात जर इतरांच्या भावना त्यामुळे दुखावल्या जात असतील तर तसा वापर करता येत नाही. तिसरे असे की सार्वजनिक संस्था व शिक्षणसंस्थांमधून एखाद्या धर्माचा प्रचार करणे किंवा एखाद्या धर्माचा अपप्रचार करणे हे योग्य नसते..

भारताची राज्यघटना धर्मातीत राज्य प्रस्थापित करते. सर्वधर्म घटनेच्या दृष्टिकोनातून समान आहेत. नागरिकांच्या कोणत्याही धर्माबद्दल राज्यास काहीही कर्तव्य नाही. सर्वधर्मसमानता हे भारतीय घटनेचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे भारतात खऱ्या अर्थाने लोकांना धार्मिक हक्क प्राप्त झाला असे म्हणतात. जगातील काही राज्यांनी धर्मासच आधार मानले आहे. उदा. १९५८ ची पाकिस्तानी राज्यघटना 'ईश्वरास स्मरून' या शब्दाने सुरु होते. त्याउलट रशिया, चीनसारख्या देशांनी सुरुवातीस धर्माचे समूळ उच्चाटन केले होते. आताही धर्मास त्या देशात मुळी स्थान नाही. सरकारने धार्मिक हक्क थोडे शिथिल केले आहेत एवढेच धर्माधिष्ठित राज्यात व धर्महीन राज्यात लोकांचे धार्मिक हक्क कितपत सुरक्षित राहू शकतात हा वादाचा प्रश्न होऊ शकेल.

९) **कुटुंबाचा हक्क :** मनुष्य जातीच्या अस्तित्वासाठी कुटुंबाचा हक्क आवश्यक आहे यात शंका नाही. सुसंस्कृत व संघटितरीत्या मानवाचे अस्तित्व त्यातून टिकून आहे कुटुंबाचा हक्क इतका प्राथमिक व आवश्यक आहे की कोणत्याही काळात, कोणत्याही देशात व कोणत्याही सरकारला हा हक्क कधीच नष्ट करता आला नाही कुटुंबसंस्था जर निरुपयोगी ठरली असती तर हा हक्कही केव्हाच नष्ट झाला असता त्याची उपयुक्तता केव्हाही नाकारणे अशक्य आहे.

कुटुंबाचा हक्क म्हणजे व्यक्तीस प्राप्त झालेला एक मूलभूत हक्क असून विवाह, कुटुब या बाबतीत त्यास त्या दृष्टीने महत्त्वपूर्ण हक्क प्राप्त झाले आहेत. प्रत्येक व्यक्ती आपल विवाह मुलांची संख्या बशशुद्धता या बाबतीत निर्णय सण्याचा अधिकार आहे, परंतु कित्येकदा सामाजिक व राज्याचे हित लक्षात घेऊन हा अधिकार आपरावा लागतो असे म्हणता येईल.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात स्टुलिन व हिटलर यांनी आपापल्या देशात विस्तारित कुटुंबास प्रोत्साहन दिले होते. ज्या वीस जास्त मु विधा सरकारी गौरवही करण्यात येत असे; परंतु जगाची लोकसंख्या फार झपाटयाने वाढत असल्यामुळे अनेक देशांनी आता हा हक्क मर्यादित करण्याचा प्रयत्न केला आहे. नपान, भारत या देशांनी हा प्रयत्न केला आहे. केवळ कुटुंबाच्या संख्येवरच नके तर कुटुंबाच्या इतर बाबतीतही बंधने टाकण्याचा प्रयत्न राज्य करू शकते. उदा. हिंदू कोड बिलानुसार लग्न आणि घटस्फोट यासंबंधी काही नियंत्रण आणली आहेत. त्याचप्रमाणे पति-पत्नी व मुले व मातापिता यांच्यावरही काही बंधने टाकली आहेत. मुस्लिम कुटुंबाच्या बाबतीत मात्र सरकारने तसे कोणतेही कायदे पास केले नाहीत कारण असे करणे हा धार्मिक हस्तक्षेप मानला जातो. भारतासारख्या धर्मातीत राज्याने सर्वच कुटुंबांसाठी समान कायदा पास करण्यात वास्तविक कोणतीच अडचण नसावी. कोणत्याही राज्याने तात्पुरत्या लग्नसंबंधास परवानगी दिलेली नाही भारतात द्विभार्या प्रतिबंधक कायदा पास करून एकाच पुरुषाने अनेक स्त्रियांशी विवाह करणे कायदाबाह्य मानले आहे. अर्थात, यातून एखादी विशिष्ट जमात सुटणे शक्य आहे. लग्न व घटस्फोटाच्या संदर्भात प्रत्येक देशाने आपापले कायदे संमत केले आहेत कुटुंबाच्या हक्काचे संक्षेपीकरण केलेले असो की हा अधिकार विस्तत केलेला असो, हा अधिकार राज्यास कधीही अमान्य करता आला नाही हे मात्र निश्चित आहे. मनुष्याच्या समूहप्रिय नैसर्गिक प्रवृत्तीतून निर्माण झालेली कुटुंबसंस्था नष्ट होणे शक्य नाही.

### १०) समानतेचा हक्क :

पूर्वीच्या काळात समानतेचा हक्क मुळीच अस्तित्वात नव्हता. राजेशाही हा राज्यप्रकारच विषमतेचे प्रतीक म्हणून त्यांचे समर्थन करीत होता. आज लोकशाहीचा अवलंब प्रत्येक राष्ट्राने केला आहे. समता हा लोकशाहीचा पाया आहे. म्हणून प्रत्येकास समतेचा अधिकार मागण्याचा हक्क आहे नैसर्गिक विषमता ही तर कोणासही नष्ट करता येणार नाही; परंतु मानवनिर्मित कृत्रिम विषमता नष्ट करून समताधिष्ठित समान तेव्हाच निर्माण होईल जेव्हा प्रत्येकास समानतेचा हक्क प्राप्त झाला आहे.

समतेच्या हक्काचा थोडक्यात अर्थ असा की, कोणत्याही धर्म, जात, वंशाच्या वा बतीच्या आधारावर राज्याने भेदाभेद करू नये सर्वांना सर्व बाबतीत समान लेखावे. विषमता राज्याने निर्माण केलेली असो की व्यक्तीने, ती नष्ट करण्याचा प्रयत्न सरकारकडूनच झाला पाहिजे. सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रत्येकास हक्क आहे. पूर्वी काही कांना समाजात विशेष हक्क असत. त्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा उच्च प्रकारचा होता. इतरांना अतिशय कनिष्ठ स्थान समाजात लाभलेले असे आजच्या सरकारने ही विषमता करण्याचा प्रयत्न केला आहे अस्पृश्याचे कायद्याव्दारे निर्मूलन करणे, पदव्या) राव (दुर, नवाब इ (.रद्द करणे, बिगारी कायदेशीर ठरविणे इत्यादी गोष्टी हे दर्शवितात. मात्र

सामाजिक समतेचा हक्क समाजातील सर्वच लोकांस प्राप्त झाला आहे असे ठामपणे आजही म्हणता येत नाही. लोकशाही उत्तम प्रकारे टिकून राहावयाची असेल तर समताधिष्ठित समाज निर्माण झाला पाहिजे भारतीय घटनेने समतेस आपल्या कलमात महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे कायद्यासमोर सर्वच नागरिकांना समान लेखण्यात आले आहे. तसेच जात, वंश, धर्म, भाषा, प्रांत किंवा स्त्री-पुरुष या आधारावर कोणत्याही व्यक्तीव्यक्तीत भेदाभेद के नाही.

सामाजिक समतेप्रमाणेच आर्थिक समता व राजकीय समता असल्याचाही प्रत्येक नागरिकास हक्क आहे. त्याचा नंतर स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल. सुप्रसिद्ध आंग्ल लेखक डायसीने समतेची कल्पना आपल्या 'कायद्याचे अधिराज्य' या विचारात मांडली आहे. कायद्याचे अधिराज्य म्हणजे कायद्यापुढे समानता. एकच कायदा समाजातील सर्वच व्यक्तीना लागू होतो व हे राज्य व्यक्तीचे नसून कायद्याचे आहे, कायद्यापुढे कोणीही श्रेष्ठ नाही व कनिष्ठ नाही. अर्थात, कायद्याचे अधिराज्य ही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी स्वतंत्र न्यायालयाची आवश्यकता असते ही गोष्ट वेगळी. एकंदरीत समतेचा अधिकार प्रत्येक नागरिकास जगातील बहुसंख्य घटनांनी दिला आहे; परंतु समता कित्येकदा कायद्याने निर्माण होऊ शकत नाही. संघटित व जागरूक लोकतच ही गोष्ट साध्य करू शकते.

**११) स्वातंत्र्य व मुक्त संचाराचा हक्क:** व्यक्तीस केवळ जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त होणे उपयोगी नाही. त्यास जीवन जगताना स्वातंत्र्य असले पाहिजे तरच त्याच्या जीवन जगण्याच्या अधिकारास काही तरी अर्थ प्राप्त होऊ शकतो. पशूप्रमाणे मनुष्यास केवळ जगाववाचे नसते तर त्यास उत्तम प्रकारे जगावयाचे असते असे उत्तम जीवन जगण्यासाठी त्यास स्वातंत्र्य प्राप्त झाले पाहिजे. स्वातंत्र्याचा अधिकार जर व्यक्तीस नसेल तर त्याचा सर्वांगीण विकास रोखला जाईल.

व्यक्तीस मुक्त संचाराचा अधिकार प्राप्त झाला पाहिजे जवळ जवळ सर्वच देशांतील घटनांनी हा अधिकार लोकांना दिला आहे. या हक्काचा अर्थ असा की, व्यक्तीच्या हालचालींवर व संचार स्वातंत्र्यावर एखाद्या व्यक्तीने किंवा सरकारने दुष्ट अशी नियंत्रण ठेवू नयेत भारतीय घटनेने तर संचारस्वातंत्र्य हा मूलभूत हक्क म्हणून मान्य केला आहे. अर्थात, स्वातंत्र्याचा किंवा मुक्त संचाराचा हक्क हा अनिर्बंध हक्क असू शकत नाही. खरे स्वातत्र्य हे मर्यादित स्वातंत्र्यातच विकास पावते. त्या दृष्टीने या हक्कावरही काही मर्यादा पडतात. युद्धाच्या काळात किंवा आणीबाणीच्या काळात संचारस्वातंत्र्यावर व इतर हक्कांवर अनेक प्रकारचे निर्बंध आणू शकते अशा काळात सरकारच्या हातात अनेक सत्ता निर्माण होतात राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे योग्य असले तरी शांततेच्या काळात मात्र अशी बंधने नागरिकांवर असत नाहीत शांततेच्या काळात बेकायदा पद्धतीने सरकार जर व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्रमण करीत असेल तर व्यक्ती हेबियस कॉर्पसचा अर्ज करून स्वातंत्र्यावर आलेले आक्रमण थोपवू शकते. जगातील सर्वच लोकशाहीप्रेमी राष्ट्रांनी हा हक्क मान्य केला आहे.

munotes.in

**कराराचा हक्क :** या हक्कानुसार प्रत्येक नागरिकामयाबरकरार किया समझौता करण्याचा हक्क आहे. करारामध्ये दोन किया एकत्र येण्यामध्ये आर्थिक, सामाजिक किंवा व्यापारी असतो. प्रत्येक करार करण्याचा हक्क आहे. प्रत्येक प्रगतिशील राष्ट्राने आजह अधिकार मान्य आहे. अमेरिकन व भारतीय घटनेत हा हक्क स्पष्टपणे मोडण्या अधिकारही बंधनविरहित नाही कोणतेही राज्य गुलामाच्या व्यापारावा करार यासंबंधीचा करार अथवा ज्यात सामूहिक अहित आहे. असा करार मान्य करणार नाही ज्या करारामुळे राज्याचे अस्तित्वच धोक्यात येईल अशा कोणत्याही कराराम राज्य मान्यता देणार नाही भारतीय घटनेतील २४ व्या कलमान्वये १४ वर्षाखालील मुलामुलीग कोणत्याही अथजड कारखान्यात किंवा खाणीत कामास लावता येणार नाही, अशा रीतीने या हक्कावर काही बंधने टाकण्यात आली आहेत काही ठळक नागरी हक्कांचा विचार वरीलप्रमाणे केल्यानंतर राजकीय हक्कांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

### राजकीय हक्क (Political Rights)

राजकीय हक्कांना पूर्वीच्या काळात महत्त्व नव्हते. याचे महत्त्वाचे कारण असे की, संपूर्ण राजकीय सत्ता एका व्यक्तीच्या राजाच्या हाती केंद्रित झालेली असे आज राज्याची सार्वभौमसत्ता जनतेकडेच आहे. लोकच राज्यकारभाराची दिशा ठरवितात लोकशाहीच्या या विशिष्ट प्रकारामुळे राज्यसत्ता लोकांच्या हाती आली; परंतु ती सत्ता वापरण्याकरिता ज्या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या त्या म्हणजेच राजकीय अधिकार, राजकीय अधिकारांच्या माध्यमातून लोक सत्तेचा वापर करतात राजकीय हक्क नसते तर लोकांच्या सहभागी होण्यास काहीच अर्थ राहिला नसता. एकूण लोकांना राज्यकारभारात भाग घेता यावा म्हणून ज्या सोयी किंवा अवस्था असतात त्यांना राजकीय हक्क असे म्हणतात. काही ठराविक राजकीय हक्कांचे विवेचन खालीलप्रमाणे करता येईल.

**१) मतदानाचा अधिकार)**

Right to Vote): लोकशाहीत राज्यकारभार नागरिकच बालवितात. सरकारची निर्मितीही तेच करतात; परंतु सरकारची निर्मिती करावयाची असेल तर तो अधिकार प्रत्यक्षात उतरला पाहिजे. त्यासाठी लोकांना मतदानाचा अधिकार देणे जरूरी आहे. त्याशिवाय सरकार अस्तित्वात येऊ शकणार नाही. प्रत्येक लोकशाही राष्ट्राने तसेच साम्यवादी राष्ट्रांनीसुद्धा आपल्या नागरिकांना हा अधिकार दिला आहे.

हा हक्क सर्वांना समान पद्धतीने देण्यात येतो अधिकार देताना वंश, भाषा, प्रांत, वर्ण, जात किंवा स्त्री-पुरुष या आधारावर व्यक्तीव्यक्तीत भेदाभेद करण्यात येत नाहीत. हा अधिकार सर्वांना समान पद्धतीने देण्यात येतो याचा अर्थ असा नाही की हा हक्क सर्वांनाच देण्यात येतो. त्यातून काही लोक गाळले जातात. परकीय लोक, दिवाळखोर, विशिष्ट गुन्हेगार आणि १८ वर्षांखालील स्त्री-पुरुष यांना हा अधिकार देण्यात आला नाही. मानसिक विकृती असलेल्या लोकांनाही हा अधिकार देण्यात येत नाही इंग्लंडमध्ये तर १९२८ पर्यंत स्त्रियांना मतदानाचा हक्क नव्हता.

**२) निवडणुकीत उभा राहण्याचा अधिकार** :

अब्राहम लिंकन असे म्हणती की. लोकशाही हे लोकांकडून चालविलेले सरकार आहे. लोकांना निवडून येण्याचा अधिकार दिला सूत्रे लोकांच्या हाती येणार नाहीत व पर्यायाने लोकशाही टिकू नाही तर राज्यकारभाराची शकणार नाही म्हणून लोकशाही लोकांकडूनच राबविली जाण्यासाठी निवडणुकीस उ राहण्याचा अधिकार लोकांना दिला जातो. जगातील सर्वच लोकशाही राष्ट्रांनी हा अधिकार लोकांना दिला आहे. अधिकार लोकांना देत असताना कोणत्याही बाबतीत व्यक्तीव्यक्ती भेदाभेद करण्यात येत नाही. वर्ण, जात, भाषा, प्रांत, लिंग यांचा विचार न करता सर्वांना समान पद्धतीने हा अधिकार देण्यात येतो. अर्थात, वरीलप्रमाणेच समानतेचा अर्थ असा नाही की सर्वच नागरिकांना हा अधिकार देण्यात येतो. मानसिक विकृती असलेले, परकीय दिवाळखोर, विशिष्ट गुन्हा केलेले आणि ज्यांचे वय २५ च्यावर आहे अशाच स्त्री-पुरुषांना हा अधिकार देण्यात येतो, मतदानाच्या अधिकारास पूरक असा निवडून येण्याचा अधिकार आहे.

**३) सरकारी नोकरी प्राप्त करण्याचा हक्क :**

प्रत्येक नागरिकास सरकारी पदप्राप्तीचा हक्क आहे. नागरी हक्कातील काम करण्याच्या हक्कांशी हा हक्क मिळताजुळता आहे. नोकरप्राप्तीचे दोन उद्देश असतात. एकतर नोकरी हे उदरनिर्वाहाचे साधन आहे. त्यातूनच जीवन जगण्याच्या हक्कास संरक्षण मिळते. दुसरे असे की, नोकरी करून व्यक्ती समाजाची व पर्यायाने एक प्रकारे देशाची सेवाच करीत असते.

हा अधिकार सर्वांना समान रीतीने देण्यात आला आहे. वंश, भाषा, प्रांत, लिंग, जात, वर्ण इत्यादी आधारांवर भेदाभेद करण्यात येत नाहीत. भारतीय घटनेतील सोळाव्या कलमानुसार राज्यातील नोकरीच्या संदर्भात सर्वांना समान संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. कोणताही भेदाभेद कोणत्याही आधारावर करण्यात आला नाही. गरीब व्यक्तीही देशाच्या सर्वोच्चपदी पोहोचू शकते ही लोकशाहीची मौल्यवान देणगी म्हटली पाहिजे कार्यकारी न्यायविषयक किंवा कायदेविषयक कोणत्याही श्रेष्ठपदावर आपल्या योग्यतेप्रमाणे पोहोचण्याचा हक्क प्रत्येक व्यक्तीला आहे. योग्यतेच्या निकषावरच सर्व नेमणुका केल्या जातात. भारतात असे दिसून येते की, निरनिराळ्या पदांचा काही भाग मागासलेल्या वर्गांसाठी राखून ठेवला आहे. सकृतदर्शनी येथे भेदाभेद केला आहे असे दिसून येते; परंतु हजारो वर्षापासून ज्यांना मागासलेच ठेवण्यात आले त्यांना सामाजिक समान पातळीवर आणण्यासाठी विशिष्ट काळापर्यंत या सवलती देणे आवश्यकच होते. त्यातून विषमता निर्माण झाली असे म्हणता येणार नाही आपल्या सामाजिक दोषांमुळेच ते मागासले राहिले हे कोणीही नाकबूल करीत नाही.

सरकारी नोकरी करण्याचा प्रत्येकास हक्क असला तरी तो हक्क वाढत्या प्रचंड बेकारीमुळे सर्वांनाच प्राप्त होईल असे नाही. त्यासाठी काही उपाययोजना करणे जरूरी आहे उदा. एका घरात एकाच व्यक्तीने पुरुषाने अथवा स्त्रीने नोकरी करावी व इतरांना मोकराचा म्हणजेच समाधानाने जगण्याची संधी उपलब्ध करून यावी. ज्यांना नोकरीची आवश्यकता नाही त्यांनी स्वतःच नोकरी न करण्याचे ठरवावे इत्यादी तरच नोकरीच्या हक्कास काही तरी अर्थ राहील हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे.

**४) सरकारवर टीका करण्याचा हक्क** :

लोकशाहीत सरकार लोकांनीच निवडून दिलेले असत तर त्यावर टीका का करावी हा प्रश्न निर्माण होतो. निवडून दिलेले सरकार नेहमीच जनतेच्या मतांचे प्रतिनिधित्व करील याची खात्री नसते. सरकार जर चुकीच्या किया भ्रष्ट मार्गाने जात असेल तर त्यावर टीकेचे आसूड ओढून त्यास योग्य रस्त्यावर आणण्याचे काम टीकेनेच होऊ शकते. त्यानुसार सरकार लोकाभिमुख बनून कार्य करू लागते. सरकारनेही जास्तीत जास्त विधायक टीकेस जास्तीत जास्त वाव दिला पाहिजे. लोकशाही हे एकच सरकार असे आहे की जे टीकेस जास्तीत जास्त वाव देते. लोकांच्या टीकेमुळे अनेकदा शक्तिशाली अशा सरकारचेही पतन झाले आहे. सरकार टीकेमुळे जबाबदारीच्या भावनेने वर्तन करते. अर्थात, राजकीय स्वार्थासाठी किंवा स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी सरकारवर टीका करणे हा अपराध मानला गेला पाहिजे, सरकारवर टीका अनेक मार्गांनी करता येते .सभा, व्यासपीठे यावर भाषणांच्या साहाय्याने सरकारवर टीका करता येते तसेच परिसंवाद, व्यंगचित्रे व वाचकांचे विचार या स्तंभातून सरकारवर टीका केली जाते .रिचर्ड निक्सनवर हिएटनाम प्रकरणात टीका करून जॅक अंडरसन हा निर्भय स्तंभलेखक असाच मध्यंतरी बराच गाजला होता.

लोकशाही उत्तम प्रकारे टिकवायची असेल तर सरकारच्या कृतीकडे सतर्क दृष्टीने पाहिले पाहिजे की सरकारवर टीका करण्याचा हक्क फक्त लोकशाहीप्रधान देशातच शक्य असतो इतर देशात तो प्रत्यक्षात येऊ शकत नाही.

**५) दाद मागण्याचा अधिकार :**

प्रत्येक नागरिकास सरकारकडे दाद मागण्याचा अधिकार आहे .दाद मागण्याची दोन कारणे असू शकतात .पहिले असे की एखाद्या व्यक्तीवर अन्याय झाला असेल तर त्याच्या निराकरणासाठी व दुसरे म्हणजे व्यक्तीच्या किंवा समूहाच्या काही तक्रारी असतील तर त्या दूर करण्यासाठी दाद मागितली जाते.

प्रत्येक नागरिकास व्यक्तिगतरीत्या किंवा सामूहिकरीत्या दाद मागण्याचा अधिकार आहे .लोकशाहीत कायदेनिर्माते किंवा प्रशासक लोकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत मराठवाडा विकास आंदोलनाच्या काळात विद्यार्थ्यांनी शासनाकडे अर्जाद्वारे अशी निवेदन दिली होती .लोकांच्या खऱ्या तक्रारींकडे शासनाने दुर्लक्ष करून चालत नाही, नाही तर त्यातून शासनाला खाली खेचणारी क्रांती होऊ शकते कोणत्याही सरकारने जनतेच्या उचित मागण्यांकडे दुर्लक्ष केले तर त्याचे विपरीत परिणाम होतात .

## १.५ हक्क संरक्षित ठेवण्याच्या पद्धती Safeguards of Rights :

आतापर्यंत हक्कासंबंधी विविध प्रकारचे विवेचन केले .हक्कांचे महत्त्व केवळ मानून उपयोगाचे नाही .हक्क संरक्षित झाले पाहिजेत .त्यांना संरक्षण मिळेल तरच त्यांच्या उपभोगाची काहीतरी हमी देता येईल .हक्क संरक्षित ठेवण्यासाठी खालील घटक उपयुक्त ठरतात .

**१) लोकांची राजकीय जागृती** :

लोक राजकीयदृष्ट्या सतर्क व जागरूक असले पाहिजेत .स्वातंत्र्य अबाधित ठेवावयाचे असेल तर नागरिक सतत जागरूक असला पाहिजे .सरकार कोणत्या प्रकारे कार्य करीत आहे याची सतत जाणीव नागरिकांनी ठेवली पाहिजे नागरिकांच्या हक्कांवर सरकारकडून आक्रमण होत असेल तर त्याला विरोध करण्याचे धाडस नागरिकांनी दाखविले पाहिजे भातात २४ वी घटनादुरुस्ती झाल्यावर त्यामुळे मूलभूत हक्कांवर गदा येत आहे म्हणून देशाच्या अनेक भागात लोकांनी विरोध दर्शविला होता ..भाषणांतून व वृत्तपत्रांतून टीकाही झाली होती नागरिकांत जर राजकीय जागृती नसेल, तर सरकारची हुकूमशाही निर्माण होऊन नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य पूर्णपणे धोक्यात येईल.

**२) घटनेत नमुदीकरण :**

हक्कांचे महत्त्व केवळ ओळखून चालत नाही हक्कांना प्रतिष्ठा व सुरक्षितता प्राप्त करून देण्यासाठी हक्क घटनेत नमूद केले पाहिजे हक्क हे घटनेत सांगितले तर सरकार त्यावर सहजासहजी आक्रमण करू शकत नाही व ते हक्क नष्ट करू शकत नाही हक्क सुरक्षित राखण्याची नैतिक व वैधानिक जबाबदारी यावेळी सरकारवर पडते. जगातील सर्वच देशांनी या तत्त्वाचा आता स्वीकार केला आहे. अमेरिकन राज्यघटनेत बिल ऑफ राईटस् आहे तर भारतीय घटनेत 'मूलभूत हक्क' हा स्वतंत्र अध्यायच आहे. लोकशाहीवादी देशांनी तर या हक्कांचे स्पष्टीकरण घटनेत केलेच आहे. पण साम्यवादी राष्ट्रांनीसुद्धा आपल्या घटनेत मूलभूत हक्कांचे स्पष्टीकरण केले आहे. उदा. चीन व रशीयाची राज्यघटना सरकारकडून जर हक्कभंग झाला तर त्याविरुद्ध दाद मागता येते. उदा. संस्थानिकांची तनखेबंदी झाल्यावर कलम ३१ चा आधार घेऊन नरेशांनी सर्वोच्च न्यायालयाकडे अपील केले होते.

**३) स्वतंत्र न्यायालये :**

ज्या देशात लिखित राज्यघटना नसते तेथे लोकांचे हक्क संरक्षित ठेवण्याचे कार्य न्यायालये करतात लिखित घटना ज्या देशात आहे त्या देशातदेखील न्यायालयाचे महत्त्व फार आहे. न्यायालये जर स्वतंत्र असतील तर न्यायाधीश लोकांचे मूलभूत हक्कांचे संरक्षण करू शकतात. स्वतंत्र न्यायालयाचा अर्थ असा की, न्यायाधीशांनी न्याय देताना कार्यकारी मंडळ वा कायदेमंडळ यांच्या दडपणाखाली न येता निःस्पृहपणे व निर्भयपणे न्यायदान केले पाहिजे. भारतात अमेरिकेत व अर्थातच इंग्लंडमध्ये स्वतंत्र न्यायालयाची निर्मिती करण्यात यश आलेले आहे. बँकेच्या राष्ट्रीयीकरणाविरुद्ध, तनखेबंदीविरुद्ध भारतीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हेच दर्शविते की, स्वतंत्र न्यायालये व्यक्तिगत हक्क रक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहेत.

**३) लोकशाही राज्यपद्धती :**

ज्या देशात हुकूमशाही असते तेथे लोकांचे हक्क ही एक भ्रामक कल्पना ठरते. कारण हुकूमशहा किंवा राज्याच्या मर्जीवरच लोकांचे हक्क अवलंबून असतात. फक्त लोकशाही हाच एक राज्यप्रकार आहे की, ज्यात लोकांच्या हक्कांचे सरक्षण होऊ शकते. म्हणून हक्कांच्या

munotes.in

संरक्षणासाठी लोकशाही या राज्यपद्धतीचा अवलंब राष्ट्रांनी देखील सहिष्णुता आणि मातृभाव कायम र पाने केवळ पक्षाचा व पंथाचा संकुचित विचार न करताप जनहिताया विचार केला तरच हक्क हे संरक्षित राखले जाऊ शकतात. एकंद इतर कोणत्याही राज्यप्रकारापेक्षा सुरक्षित राहतात हे मात्र निश्चित :

**५) विशेषाधिकार नष्ट झाले पाहिजेत :**

समाजातील व्यक्तींच्या हक्कायो संरक्षण व्हावयाचे असेल तर समाजातील विशेषाधिकार नष्ट झाले पाहिजेत. एखाया गटाम या व्यक्तीस काही खास अधिकार असतील तर त्यामुळे इतरांच्या हक्कांवर आक्रमण होते. व हक्कांचा उपभोग घेता येत नाही. खास अधिकार उपभोगणारांचा सामाजिक दर्जा वाढत जातो व इतरास समाजात दुय्यम स्थान प्राप्त होते. अशा परिस्थितीत लोकांना हक्क देऊनही विशेष उपयोग होत नाही. पूर्वी आपल्या देशात विशिष्ट वर्गास विशिष्ट असे हक्क प्राप्त झाले होते. नव्या काळात ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. उदा. खास पदव्या समतेचा भाग म्हणून नष्ट करण्यात आल्या आहेत. बिगारी व देवदासीची पद्धत घटनेच्या कलमानुसारच नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विशेष हक्क नष्ट झाले म्हणजे हक्कांचा उपयोग सर्वच व्यक्तींना समप्रमाणात घेता येतो.

**६) सरकारचे नि:पक्षपाती धोरण :**

नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण होण्यासाठी सरकारचे धोरण व क्रिया निःपक्षपातीपणाच्या असल्या पाहिजेत. राज्याने कोणतीही अशी कृती करू नये की ज्यामुळे एखाद्या विशिष्ट गटाचा फायदा होईल किंवा विशिष्ट गटाचे नुकसान होईल. पूर्वीच्या काळी राजाश्रय एखाद्या धर्माला लाभत असे. त्यामुळे त्या विशिष्ट धर्मास व लोकांस श्रेष्ठ दर्जा प्राप्त होईल व बाकीच्या लोकांचा विनाकारण छळ होत असे असे असेल तर लोकांचे हक्क खऱ्या अर्थाने संरक्षिले जाणार नाहीत. अर्थात, सरकारचे निःपक्षपाती धोरण हा कठीण असा एक आदर्श आहे; परंतु तो प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. आज लोकशाहीत तर या गोष्टीस फार मोठे महत्त्व आहे. बहुमतवाला पक्ष सत्ता हातात घेतो बि सत्ता विशिष्ट पक्षाच्या हातात असल्यामुळे आपली सत्ता तो टिकविण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी सत्तेचा वापर तो निःस्पृहपणे करीलच याची खात्री नसते. आपल्या पक्षाचे हित पाहण्यासाठी तो सत्तेचा वापर करतो. अर्थात, यामुळे अल्पसंख्याकांवर गदा येण्याची भीती असते. म्हणून सरकारचे धोरण निःपक्षपातीपणाचे असेल तर नागरिकांचे हक्क उत्तम प्रकारे संरक्षिले जाऊ शकतात.

**७) जागतिक शांततेचे वातावरण :**

लोकांचे हक्क चांगल्या प्रकारे संरक्षित होण्यासाठी जागतिक शांततेचे वातावरणही आवश्यक असते. एखाद्या देशाच्या आजूबाजूस युद्धाच्या ज्याला उफाळत असतील, तर त्या देशातही युद्धाची लागण होण्याची शक्यता असते. युद्धाचा काळ हा कोणत्याही देशास लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात आणू शकतो. युध्दकाळात वीर शासनाची व त्वरित निर्णयासाठी एकतंत्री पद्धतीची आवश्यकता असल्यामुळे हुकूमशाहीचा उदय होण्याची मोठी शक्यता त्या ठिकाणी

असते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात युरोपात हुकूमशाहीचा उदय किती वेगाने झाला हे लक्षात घेतले म्हणजे बरोल गोष्टीची सत्यता लक्षात येते. असे हुकूमशहा लोकांच्या हक्कांना संरक्षण देत नाही. उलट हक्कांची पायमल्ली ते राजरोस करतात. हिटलरने ज्यू लोकांवर केलेले अनन्वित अत्याचार जगप्रसिद्धच आहेत. भारतीय घटनेतसुद्धा राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात काही विशिष्ट हक्क रद्दबातल ठरविण्यात येतात. म्हणून जागतिक शांततेच्या वातावरणात हक्क उत्कृष्ट प्रकारे संरक्षिले जाऊ शकतात.

वरील बाबींचा विचार करताना हेही लक्षात ठेवले पाहिजे हक्कांसाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची मानसिक तयारी लोकांनी ठेवली पाहिजे स्वित्झर्लंड, इंग्लंड येथील लोकांच्या मनाच्या घडणीतच ते चैतन्य साठविलेले आहे. लोकांची स्वातंत्र्यप्रिय वृत्ती हेच हक्कांचे खरे संरक्षक कवचकुंडल होऊ शकते. डि.टॉकव्हिल म्हणतो त्याप्रमाणे काही राष्ट्रे अशी आहेत. की कोणत्याही संकटातून व अडचणीतून त्यांनी अविश्रांतपणे स्वातंत्र्याचा पाठपुरावा केला.

## १.६ मानवी हक्क:

माणूस जन्मताच काही हक्क घेऊन येतो. त्यामुळे मानवी हक्क ही मानवाला नीसर्गता प्राप्त होत असतात असे म्हटले जाते. मानवी हक्क हे आपले जीवन हे सुखाने व आनंददायी जगण्याच्या आपल्या नैतिक मागणीप्रती हे हक्क नैतिक हमी देण्याचे काम करतात. मानवी हक्कांची संकल्पना ग्रीक व रोमन विचारवंत तसेच ख्रिस्ती तत्वानात आणि टॉमस अक्वायनससारख्या विधिज्ञांच्या तसेच सतराव्या शतकात आंतरराष्ट्रीय कायद्याचा जनक म्हणून ओळखला गेलेल्या ह्यूगो ग्रोशिअस ह्याच्या व मिल्टन आणि लॉक ह्या विचारवंतांच्या लेखनातूनही ती मांडली गेली. इंग्लंडमध्ये १२१५ मध्ये मॅग्ना कार्टा संमत झाल्यापासून राज्यसत्तेच्या अधिकारावर बंधने असावीत, असा विचार पुढे येऊ लागला. १६२८ च्या पिटिशन ऑफ राइट्स व १६८९ मधील अधिकारांची सनद बिल ऑफ राइट्स ह्यांतून त्यास आणखी स्पष्टपणा लाभला. अमेरिकन स्वातंत्र्य (१७७६) आणि अमेरिकेतील मूलभूत स्वातंत्र्याचा जाहीरनामा (१७९१) ह्यांतही मानवी हक्कांचे रक्षण हाच प्रमुख हेतू होता. फ्रान्सची राज्यक्रांती आणि त्यानंतर व्यक्ति स्वातंत्र्याचा व नागरिकांच्या हक्कांचा जाहीरनामा (१७८९), हाही एक महत्त्वाचा टप्पा होता. इंग्लंडमध्ये राजाच्या सत्तेला पूर्णपणे काबूत आणून प्रातिनिधिक संस्थेचे (संसदेचे) सार्वभौमत्व प्रस्थापित झाले, हा लोकशाहीचा विजय होता. त्या सार्वभौमत्वाचा परिपाक म्हणजे कायद्याचे अधिराज्य' स्थापन होणे हा होय. फ्रान्समधील क्रांतीच्या मागे मानवी हक्कांचीच प्रेरणा होती. अमेरिकन स्वातंत्र्याची व संविधानाचीही तीच प्रेरणा होती. भारताच्या संविधानात अंतर्भूत झालेल्या मूलभूत अधिकारांचीही तीच प्रेरणा होय. रशियन संविधानातही आर्थिक आणि सामाजिक शोषणापासून व्यक्तीची मुक्तता करण्याचे वचन समाविष्ट आहे परंतु त्यात शासनाच्या आत्यंतिक नियंत्रणापासून व्यक्तीची मुक्तता करण्याची तरतूद नाही. रशियन संविधानात विशेष भर व्यक्तीच्या सामाजिक व आर्थिक हक्कांवर देण्यात आला आहे. सामाजिक व आर्थिक हक्क नसले, तर केवळ राजकीय स्वातंत्र्याला अर्थ उरत नाही, हे खरेच आहे. परंतु ही दोन्ही प्रकारची स्वातंत्र्ये एकमेकांना पूरक आहेत. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या संविधानांत व्यक्तीचे स्वातंत्र्य राजकीय सत्ताधाऱ्यांपासून सुरक्षित

ठेवण्याची योजना होती, तर सोव्हिएट रशियाच्या १९३६ च्या संविधानात ही स्वातंत्र्ये उपभोगण्यासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध करण्यावर भर होता परंतु ह्या सुविधा जरी उपलब्ध झाल्या, तरी राजकीय सत्ताधाऱ्यांच्या सत्तेवर मर्यादा घातल्याशिवाय त्यांना प्रत्यक्षात फारसा अर्थ नाही. आंतरराष्ट्रीय संबंधांत जरी प्रत्येक राष्ट्राचे सार्वभौमत्व मान्य करण्यात येते, तरी अशा सार्वभौमत्वाला मानवी हक्कांच्या मर्यादा असाव्यात, हेही मान्य करण्यात आले आहे. एखाद्या राष्ट्राने आपल्या नागरिकांना कसे वागवावे, हा जरी त्या राष्ट्राचा अंतर्गत प्रश्न असला, तरी ते राष्ट्र जर मानवी हक्कांची पायमल्ली करत असेल, तर इतर राष्ट्रे हस्तक्षेप करून ती थांबवू शकतात. ह्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे १८२७ मध्ये इंग्लंड, फ्रान्स व रशिया ह्यांनी ग्रीक लोकांच्या छळाविरुद्ध केलेला ऑटोमन साम्राज्याविरुद्धचा हस्तक्षेप, ह्याचा परिणाम म्हणून ग्रीसला १८३० मध्ये स्वातंत्र्य मिळाले. यूरोपियन राष्ट्रांन ख्रिस्ती लोकांची कत्तल थांबवण्यासाठी सिरियामध्ये १८६० मध्ये हस्तक्षेप केला. ज्यू लोकांच्या संरक्षणार्थ यूरोपियन राष्ट्रांनी एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी व विसाव्या शतकाच्या सुरुवातीला शिष्टाई केली. नुकतीच अमेरिकेने ज्यूंच्या रक्षणाकरता सोव्हिएट युनियनकडे रदबदली केली. अशा हस्तक्षेपात नेहमी धोका असतो. कारण हस्तक्षेप करणाऱ्या राष्ट्राला आपला हस्तक्षेप न्याय्य आहे असेच वाटते. त्यामुळे मानवतावादी हस्तक्षेपाला आंतरराष्ट्रीय कायद्याने अधिकृतपणे मान्यता दिली नाही. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेने बळाचा एकतर्फी उपयोग करण्यावर बंदी घातल्यामुळे मानवतावादी हस्तक्षेपाच्या वैधतेबद्दल जास्तच संशय निर्माण झाला आहे. मानवतावादी हस्तक्षेप शेवटी राजकीय हेतूने मर्यादित होतो, हा अनेक ठिकाणचा अनुभव आहे. १९७१ मध्ये ज्या वेळी पाकिस्तानने त्या वेळच्या पूर्व पाकिस्तानच्या (व नंतरच्या बांगला देशाच्या) लोकांची कत्तल केली, त्यावेळी जगाचे लक्ष त्याकडे वेधण्याचा निष्फळ प्रयत्न केला. शेवटी भारत-पाकिस्तान युद्धानंतरच तो प्रश्न निकालात निघाला. मानवी क्कांच्या रक्षणार्थ आंतरराष्ट्रीय करारांचा उपयोग नेहमीच करण्यात आला आहे. धार्मिक अल्पसंख्यांकांच्या रक्षणार्थ केलेला असा सर्वांत प्राचीन करार म्हणजे वेस्टफिलियाचा शांतता करार (१६४८) होय. ह्या कराराने जर्मनीत रोमन कॅथलिक व प्रॉटेस्टंट पंथाच्या लोकांना समान वागणूक देण्याचे मान्य झाले. ह्याच काळात अनेक कॅथलिक सरकारांनी कॅथलिकांच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या तरतुदी करारांमध्ये समाविष्ट केल्या. एकोणिसाव्या शतकात गुलामी नष्ट करणारे करार करण्यात आले. १९२६ मध्ये राष्ट्रसंघाच्या आमसभेने आंतरराष्ट्रीय गुलामगिरी करार केला. ह्या करारान्वये प्रत्येक सही करणाऱ्या राष्ट्राने गुलामगिरीची प्रथा संपूर्णपणे नष्ट करण्याची जबाबदारी पतकरली. एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या भागात युद्धाबाबत तसेच युद्धात जखमी झालेल्यांबाबतचे नियम तयार करण्यात आले. ह्या नियमांचा हेतू क्रूरतेला आळा घालण्याचा होता. ह्यांची सुरुवात १८६४ मध्येच झाली होती पण १९२५ ते १९२९ व दुसऱ्या महायुद्धानंतरच्या चार जिनीव्हा कन्व्हेन्शन्सची त्यात मोलाची भर पडली. दुसऱ्या महायुद्धानंतर विजेत्या राष्ट्रांनी (इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स आणि रशिया) जर्मन लोकांनी त्यांच्या ताब्यातल्या प्रदेशातील नागरी जनतेविरुद्धचे जे गुन्हे केले होते, त्यांच्या चौकशीसाठी एक विशेष न्यायालय स्थापन केले. हे न्यायालय न्यूरेबर्ग येथे १९४५ ते १९४६ ह्या काळात कार्यरत होते व त्याने दोषी व्यक्तींना शिक्षा दिल्या, ह्या न्यायालयाने ज्या तत्त्वांच्या आधारे आपले निर्णय दिले, ती तत्त्वे संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने नंतर स्वीकारली. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेमध्येच मानवी हक्कांना प्राधान्य देण्यात आले

munotes.in

आहे. कलम १३ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य ह्यांच्या रक्षणासाठी सूचना करायच्या आहेत. ह्याशिवाय कलम १, ५५, ५६, ६२, ६८ व ७६ ह्यांतही मानवी हक्कांचा निर्देश आहे. कलम ५५ प्रमाणे राहणीचे मान वाढवणे, सर्वांना रोजगार मिळवून देणे, सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणणे ही संयुक्त राष्ट्रांची उद्दिष्टे आहेत. त्यानुसार १० डिसेंबर १९४८ मध्ये मानवी हक्कांचा जाहीरनामा काढण्यात आला. प्रत्येक व्यक्तीला काही मानवी हक्क आहेत व त्यांचा संकोच करण्याचा अधिकार सार्वभौम सत्तेलाही नाही, हा विचार ह्या करारामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता पावला.

मानवी हक्कांच्या जाहीरमान्यामध्ये एकंदर ३० कलमे आहेत. उदारमतवादी तत्त्वज्ञानाने नागरी व नैसर्गिक हक्कांची संकल्पना दिली, तर मार्क्सवादी तत्त्वज्ञानातून आर्थिक न्यायाची संकल्पना साकार झाली. आर्थिक शोषणापासून व्यक्तीची सुटका झाल्याशिवाय त्याच्या राजकीय स्वातंत्र्याला अर्थ नाही आणि राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय आर्थिक शोषणाला खराखुरा प्रतिबंध करता येत नाही, ह्या दोन्ही विचारांचे मिश्रम ह्या जाहीरनाम्यात आहे. मानवी हक्कांच्या रक्षणार्थ जे अनेक ठराव करण्यात आले आहेत, त्यांचा हेतू व्यक्तीला आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची क्षमता देण्याचा आहे. उदा., राजकीय व नागरी हक्काबाबतचा आंतरराष्ट्रीय ठराव, मानवी हक्कांच्या पायमल्लीबाबतच्या तक्रारींची निःपक्षपणे चौकशी करून निर्णय देणारी समिती इ. ठरावांनी स्थापन केली आहे. तसेच

आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांच्या ठरावात आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांची पूर्ती कतरावयास लागणाऱ्या तरतुदी व यंत्रणा आहेत. ह्या ठरावास किमान ३५ राष्ट्रांनी अनुमती द्यायला हवी. ती अद्याप आलेली नसल्यामुळे ह्या ठरावाच्या कार्यवाहीस अजून आरंभ झालेला नाही. गुलामगिरी, वेठबिगार, वर्णभेद ह्यांसारख्या व्यवहारांवर बंदी घालणारे ठरावही संमत झाले आहेत. जातिसंहारासारख्या दुष्ट चालींवरही बंदी घालण्यात आला आहे व त्यांवर कडक शिक्षा सांगण्यात आल्या आहेत. मानवी हक्कांच्या रक्षणार्थ काही प्रादेशिक स्वरूपाचे करारही अस्तित्वात आहेत. त्यांपैकी सर्वांत महत्त्वाचा करार म्हणजे यूरोपीय मानवी व मूलभूत स्वातंत्र्याच्या रक्षणाचा करार हे होत. ह्या करारांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

(१) जागतिक मानवी हक्क जाहीरनाम्यात दिलेल्या हक्कांच्या रक्षणासाठी व त्यांच्यावरील आक्रमणांच्या विरुद्ध परिणामकारक उपाय करणे.

(२) मानवी हक्क आयोगाची नेमणूक करणे. कुठलाही नागरिक त्यांच्या शासनाविरुद्ध ह्या आयोगाकडे तक्रार करू शकतो. आयोग त्यावर चौकशी करून आपला अहवाल प्रसिद्ध करतो.या आयोगाची नेमणूक १९५५ मध्ये झाली. ह्या कराराने मानवी हक्कांबाबतच्या तक्रारींची सोडवणूक करण्याकरता न्यायालयाची स्थापना केली आहे. हे न्यायालय यूरोपियन मानवी हक्क न्यायालय ह्या नावाने ओळखले जाते.

संयुक्त राष्ट्रांमार्फत दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदावर आधारित वर्णविद्वेषाविरुद्ध खंबीरपणे पाऊले टाकली गेली आहेत. प्रत्यक्ष वर्णभेद जरी नष्ट झाला नसला, तरी त्याबाबतचे जागतिक लोकमत जास्त प्रभावी बनले आहे, ह्यात शंका नाही. मानवी हक्कांबाबतच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नाला आंतरराष्ट्रीय राजकारणामुळे काही प्रमाणात खीळ बसते हे खरे कारण शेवटी राष्ट्रहिताच्या कसोटीवरच राष्ट्रे

आंतरराष्ट्रीय सभांतून मतदान करतात आणि काही वेळेला तथाकथित राष्ट्रहित मानवी हक्कांकडे दुर्लक्षही करायला लावते. हे मान्य करूनसुद्धा मानवी हक्कांचे तत्त्वज्ञान प्रगती करत आहे, ही वस्तुस्थिती समाधान देणारी आहे. भारताच्या संविधानात व्यक्तीचे मूलभूत हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी यंत्रणा उभी करण्यात आली आहे. भारताचे आंतरराष्ट्रीय धोरणही मानवी हक्कांच्या तत्त्वज्ञानाशी सुसंगत असेच आहे. भारतीय संविधानाने समाजातले दुबळे घटक, स्त्रिया व अल्पसंख्य ह्यांच्याबाबत विशेष जबाबदारी शासनावर टाकली आहे. मानवी हक्कांची खरीखुरी कार्यवाही करायची तर दारिद्र्य, अज्ञान, विषमता ह्यांचे उच्चाटन झाले पाहिजे. अविकसित देशांच्या विकासाकरिता कुटुंब नियोजन, शिक्षण, जमीन सुधारणा, वैद्यकीय मदत ह्यांसारख्या कार्यक्रमांना अग्रक्रम असायला हवा. अशा कार्यक्रमांना आज जागतिक बँक आणि जागतिक आरोग्य संघटना ह्यांसारख्या संस्थांकडून भरपूर उत्तेजन मिळाले आहे. नजिकच्या भविष्यात ह्या देशांच्या विकासाला सक्रिय सहाय्य इतर श्रीमंत आणि विकसित राष्ट्रे देतील, तरच मानवी हक्कांचे तत्त्वज्ञान खऱ्याअर्थाने साकार होईल.

## नैसर्गिक मानवी हक्क सिद्धांत

नैसर्गिक मानवी सिद्धांत मानवी हक्कांचे समाजपूर्ण अवस्थेत अस्ति मान्य करतो. मानवी हक्क बाजूचे व समाजाच्या विरोधात असले तरी मानवी हक्कांचे अस्तित्व स्वतंत्र असते. या नैसर्गिक हक्क सिद्धांत प्राधान्य देतो.

साधारणतः नैसर्गिक हक्क सिद्धांतात पुढील तीन तत्त्व प्रमुख मानली जातात.

**अ) मानवी हक्कांना मान्यता**

मानवी जरी स्वयंभू त्याची जाणीव मानवी हे समाजव्यवस्थेतून जसे बाहेर काढले जात त्याप्रमाणेच ते समाजाकडून व्यक्तींना प्रदानही जात नाहीत. मानवी हक्क हे स्वाभाविकरीत्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग असल्याने राज्य त्यास संमत यादृष्टीने मानवी भावनांमधून नैसर्गिक हक्क आकाराला येतात व त्यास संमती मिळते.

**ब) अध्ये, स्वाभाविक नैसर्गिक स्वरूप**

मानवी हस्तांतरित होत नाहीत अर्थाने अध्ये ते स्वभावाचा अविभाज्य भाग असल्याने त्यांना स्वाभाविक मानले जाते. संदर्भात जॉकीज असे विधान केले की, 'मनुष्य नैसर्गिकदृष्ट्या हक्क करतात, कारण स्वयंपूर्ण, स्वतःचा मालक स्वतःच्या क्रियेचा असतो. स्वतःच धारण केलेल्या हक्कांचा आदरही करू शकतो.'

**क) समानतेचे तत्त्व**

सर्व मानव समान आहेत हा मानवी हक्कांचा पायाभूत हक्क सिद्धांताचाही पाया आहे. कोणत्याही भेदावरून हक्कांत केला जाऊ नये हा यामागील मूलभूत विचार आहे. म्हणूनच बर्नार्ड यासंदर्भात म्हणतात की, 'मानवी हे असे त्याच्या सगुणांच्या वैशिष्ट्यांमुळे प्राप्त झाले आहेत. मानवात निश्चितपणे व सार्वभौमिकपणे मानवता आहे, वास्तवता आहे.'

**i) कायदेशीर सिद्धांत:**

हक्क निर्मिती आहे म्हणून हक्क कायदेशीर हक्क सिद्धांताचे जेरेमी बेंथॉम दृष्टीने हक्कांची मांडणी केली. कायदेशीर हक्क

मानवी हक्क आणि भारत :

सिद्धांतानुसार मानवी हक्कांच्या केवळ मान्यतेपेक्षा त्यांच्या अंमलबजावणीचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. लोकशाही शासनव्यवस्था असणाऱ्या देशांमध्ये सुद्धा हक्काच्या अंमलबजावणीशिवाय खऱ्या अर्थाने हक्क ही संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकत नाही. यादृष्टीने कायदेशीर हक्क सिद्धांतसुद्धा हक्कांची निर्मिती व अंमलबजावणी ही कायद्यामार्फत झाली पाहिजे या तत्त्वाचा आग्रह धरतो.

**ii) हक्कांचा ऐतिहासिक सिद्धांत:**

ऐतिहासिक प्रक्रियेतून हक्कांची निर्मिती झाली हे ऐतिहासिक हक्क सिद्धांताचे महत्त्वाचे सूत्र आहे. प्रथा म्हणजे प्राचीन कायदा हा या सिद्धांताचा आधार आहे. रिश्टे डी. जी यासंदर्भात असे मत मांडतात की, लोक त्यांना जे अधिकार पाहिजे, अशी अपेक्षा करतात, ते त्यांच्या अनेक वर्षांपासून परिपाटात जीवनात होते म्हणूनच असतात. या पद्धतीने ऐतिहासिक प्रक्रियेतून आकाराला आलेल्या हक्कात रस्त्याचा हक्क, दिवाबत्तीचा हक्क, स्वच्छ हवेचा हक्क, यासारख्या हक्कांचा समावेश होतो. ब्रिटनमधील नागरिकांना जे अधिकार मिळाले आहेत त्यातील बहुतांश अधिकार हे अशा ऐतिहासिक प्रक्रियेतूनच आले आहेत. संकेत व प्रथांमधून ते विकसित झाले आहेत.

हक्कांच्या या ऐतिहासिक सिद्धांतावर काही मर्यादाही येतात. हक्कांचा उगम हा प्रथांमधून किंवा ऐतिहासिक प्रक्रियेतून झाला हे ऐतिहासिक हक्क सिद्धांताचे विधान अर्धसत्य मानावे लागेल. गुलामगिरी, अस्पृश्यता यासारख्या अमानुष प्रथा या ऐतिहासिक प्रक्रियेचाच एक भाग होत्या. म्हणून त्यांना हक्कांचा दर्जा देणे चुकीचे ठरेल. त्यामुळे सर्व हक्कांची मूळ प्रथेत शोधण्याची ऐतिहासिक ह सिद्धांताची खोड मान्य होण्यासारखी नाही.

**iii) हक्काचा सामाजिक कल्याण सिद्धांत :**

हक्काचा सामाजिक कल्याण सिद्धांत मांडणारे सिद्धांतकर्ते असे मानतात की, कायदा, प्रथा आणि नैसर्गिक अधिकार हे सामाजिक स्वहितवादाच्या किंवा उपयुक्तवादाच्या अटीत गुरफटलेले आहेत. त्यांच्या मते आनंद किंवा सुखभावना हा सामाजिक मोजमापाचा आधार असला पाहिजे व त्या आधारानेच सामाजिक कल्याणासंबंधीच्या हक्काचा निर्णय घेतला गेला पाहिजे. म्हणजेच सामाजिक कल्याणाची उपयोगिता कारणांच्या आणि अनुभवांच्या आधारे निर्धारित झाली पाहिजे. यादृष्टीने हक्काचा सामाजिक कल्याण सिद्धांत अनेक मानवी हक्कांच्या विकासात महत्वाची भूमिका पार पाडतो, परंतु या सिद्धांतावर काही मर्यादाही स्पष्टपणे दिसतात. रोनाल्ड ड्वॅरकिन यांनी या सिद्धांताची मर्यादा स्पष्ट करताना असे म्हटले होते की, हक्काचा सामाजिक कल्याण सिद्धांत हा समाजाने कोणते सामाजिक ध्येय सा करावे यावर भर देतो. तो व्यक्तींच्या हक्कांवर भर देत नाही. सामाजिक कल्यान सिद्धांताची दुसरी

मर्यादा म्हणजे या सिद्धांताद्वारे सामान्य सामूहिक ध्येयाचा पाठलाग करण्यासाठी जे उपाय सांगण्यात आले आहेत त्यातून व्यक्तींच्या हक्कांचे उल्लंघन होण्याची शक्यताच अधिक आहे.

**iv) हक्कांचा आदर्शवादी सिद्धांत:**

हक्कांचा आदर्शवादी सिद्धांत हा हक्कांचा व्यक्तिमत्व सिद्धांत या नावानेही ओळखला जातो. या सिद्धांतात साधारणतः 'मानवाचा आत्मविकास' या संकल्पनेवर मुख्य भर देण्यात येतो. त्यामुळेच आदर्शवादी सिद्धांतकर्ते मानवाचा सर्वश्रेष्ठ हक्क म्हणून व्यक्तिमत्वाच्या हक्कास प्रस्तुत करतात. या हक्कास ते निरंकुशताही बहाल करतात. इतर सर्व हक्कांची निर्मिती याच हक्कातून झाल्याचेही ते मानतात. या सिद्धांताच्या स्पष्टीकरणासाठी असे म्हटले जाते की, 'मला जीवन जगण्याचा हक्क आहे तो माझ्यातील क्षमतेचा संपूर्ण विकास व्हावा यासाठी त्यामुळेच समाज मला जीवन संपविण्याचा किंवा आत्महत्या करण्याचा हक्क बहाल करीत नाही हक्कांच्या आदर्शवादी सिद्धांतातही अभ्यासकांना काही मर्यादा दिसतात. त्यातील पहिली मर्यादा म्हणजे व्यक्तिमत्व ही आत्मनिष्ठ कल्पना असून त्यासाठी वस्तुनिष्ठ मापदंड लावणे कठीण असते. दुसरा आक्षेप असा घेतला जातो की, 'सामाजिक चांगुलपणा व वैयक्तिक चांगुलपणा यात संघर्ष उद्भवला तर हा सिद्धांत वैयक्तिक चांगुलपणा मान्य करण्याचा आग्रह धरतो. ही बाब एकंदरीत सामाजिक कल्याणाच्या विरोधात जाणारी वाटते.

**v) हक्कांचा मार्क्सवादी सिद्धांत:**

हक्कांची मार्क्सवादी मीमांसा ही हक्क संकल्पनेचा अभ्यास करताना महत्त्वाची मानली जाते. मार्क्सवादी सिद्धांतकर्त्यांच्या मते ज्या समाजात भांडलशहांकडे उत्पादन साधनांच्या मालकीचा एकाधिकार असतो तो समाज केवळ 'मध्यमवर्गीय मोहजाल' असते कायदा, न्याय, लोकशाही, स्वातंत्र्य, नैतिकता, यांसारख्या कल्पना या मोठ्या प्रमाणात काल्पनिक स्तरावरच चर्चिल्या जातात वास्तवतः त्या भौतिक परिस्थिती आणि लोकांच्या सामाजिक वस्तुस्थितीतून निर्धारित होत असतात. मानवी जीवनाच्या या भौतिक परिस्थितीत बदल झाला की, या कल्पनांच्या आशयातही बदल होत असतात. मार्क्सवादी हक्क सिद्धांतात हक्कांची अंमलबजावणी ही राज्याने व समाजाने आपली कर्तव्य पूर्ण केली तरच होऊ शकते यावर विश्वास दिसतो. त्यासाठी ते व्यक्ती तिच्या क्षमतेचा पूर्णपणे वापर करते का? स्वतःच्या गरजा पूर्ण करते का? यासंबंधीच्या कार्यक्षमतांना प्राधान्य देते. यादृष्टीने साम्यवादी समाजरचना मानवी हक्कांच्या अंमलबजावणीसाठी आदर्श व्यवस्था असल्याचे ते सांगतात ज्या व्यवस्थेचे सार 'प्रत्येकाकडून त्याच्या कुवतीप्रमाणे व प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे या तत्त्वात आहे. मार्क्सवादी व्यवहारात मात्र मानवी हक्कांची सार्वत्रिकरीत्या गळचेपी करतात हा अनुभव आहे.

**मानवी हक्क आधुनिक दृष्टिकोन :**

आधुनिक काळात मानवी हक्क संकल्पनेकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहिले जाते. प्रामुख्याने जेरोमी जे शेस्टँक यांची मांडणी यासंदर्भात महत्त्वाची मानली जाते. त्यांनी आधुनिक दृष्टिकोनातून मानवी हक्कांचे मांडलेले काही प्रमुख पैलू पुढीलप्रमाणे मांडता येतील.

**i) नैसर्गिक हक्कांवर आधारित मानवी हक्क:**

नैसर्गिक हक्क सिद्धांताच्या माध्यमातून आधुनिक दृष्टीने मानवी हक्कांचे विश्लेषण करणारे तत्ववेत्ते प्रामुख्याने यासाठी गुणवत्तात्मक नैसर्गिक हक्क' ही संकल्पना मांडतात दुसऱ्या महायुद्धानंतर नैसर्गिक हक्क सिद्धांताचे यादृष्टीने पुनरुज्जीवन करण्यात आले. इमॅन्युअल कांत यांनी त्यांच्या पायाभूत सिद्धांतात नीतीशास्त्राला हक्कांच्यासंदर्भात महत्त्व दिले होते. त्यानंतरच्या काळात नैतिक तत्त्वज्ञान सिद्धांतकारांनी या सिद्धांताची मोठ्या प्रमाणात मांडणी व पाठपुरावा केला. यादृष्टीने आधुनिक हक्काचे समर्थक सहमती व्यक्त करतात की, फक्त प्रत्यक्षवादी कायदेशीर व्यवस्था ही मूल्यांच्या कार्याद्वारे परिणामकारक कायदेशीर व्यवस्था म्हणून कार्य करू शकते. आधुनिक दृष्टिकोनातून मानवी हक्कांची मांडणी करणारे काम पाहिजे' यापेक्षा 'काम आहे' या तत्त्वाला अधिक प्राधान्य देताना दिसतात.

**ii) उपयोगिता मूल्यांवर आधारित हक्क:**

उपयुक्ततावाद ही आधुनिक राजकीय विश्लेषणातील महत्त्वाची कल्पना होय. जेरेमी बेंथॉम यांनी दुःख आणि आनंद या दोन प्रेरणांना मानवी जीवनातील मध्यवर्ती प्रेरणा मानून त्याआधारे प्रत्येक बाबीचे मूल्यमापन करण्याचे तंत्र विकसित त्यांनी प्रामुख्याने कायद्याच्या अंमलबजावणी व अनुसरण्यामागील उपयुक्त तत्त्वाचा अभ्यास मांडला मानवी हक्कांनाही उपयोगितेच्या तत्त्वात उपयोगिता या मानवी हक्कांचे मूल्य समजून त्याद्वारे मानवी हक्कांचे विश्लेष केले पाहिजे हा यामागे मुख्य विचार आहे. उपयोगितेच्या आधारे मानवी विश्लेषण करणारे 'समानता, सुखासीनता, स्वातंत्र्य, मानसन्मान, प्रतिष्ठा, यासार मानवी मूल्यांचा मानवी वर्तनाशी संबंध असून ज्या मूल्यांमध्ये उपयोगिता त्याच मूल्यांचे हक्कांमध्ये रूपांतर होते, ' असे सूत्र मांडतात. एकंदरीत मान हक्काचा मूलाधार हा त्या मूल्यांची उपयोगिताच असला पाहिजे, हा उपयोगितावादी दृष्टिकोनाचा आग्रह आहे.

**iii) न्यायावर आधारित हक्क:**

जॉन रॉल्स यांनी यादृष्टीने प्रामुख्याने महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांच्या मते 'मानवी हक्क म्हणजे न्यायाचा शेवट होय.' म्हणून मानवी हक्कांच्या आकलनात न्यायाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. यादृष्टीने न्यायाचा विचार प्रस्तुत करताना जॉन रॉल्स असे म्हणतात की, 'सामाजिक संस्थांचा सद्गुण म्हणजे न्याय होय' न्याय तत्त्वावर स्वातंत्र्य, समता ही मूल्य ज्याप्रमाणे उभी राहतात त्याप्रमाणेच मानवी हक्कांचा आशय ही न्याय तत्वाशिवाय खऱ्या अर्थाने सजीव होऊ शकत नाही ही यामगील विचारधारा आहे.

**iv) प्रतिष्ठेवर आधारित हक्कः**

प्रतिष्ठा हे मूल्य मानवी वर्तनाला प्रभावित करण्याची क्षमता बाळगून असते. दैनंदिन व्यवहारातही व्यक्तींनी इतर व्यक्तींशी व्यवहार करताना आपली व दुसऱ्याची प्रतिष्ठा जपणे अत्यावश्यक असते. यादृष्टीने मानवी संबंध व मानवी हक्क यांचे नियमन करण्यात प्रतिष्ठा हा घटक महत्त्वाची भूमिका पार पाडते हे या सिद्धांताचे मध्यवर्ती सूत्र आहे. ज्या मानवी हक्कांचे

नियमन प्रतिष्ठेच्या माध्यमातून होते, त्यात प्रामुख्याने स्वातंत्र्य, समता, स्वायत्तता यासारख्या मूलभूत हक्कांचा समावेश होतो. कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असतात' हे मूल्य या प्रतिष्ठेवर आधारित हक्क संकल्पनेच्या मुळाशी आहे या दृष्टिकोनाच्या समर्थकांच्या मते प्रतिष्ठा या मूल्याचे रक्षण म्हणजे मानवी हक्कांचे रक्षण करणे होय.

**समानतेवर आधारित हक्क:**

समानतेवर आधारित हक्क दृष्टीकोन हा समानतेला मानवी हक्कांचा अंगभूत घटक मानतो. समतेच्या कल्पनेशिवाय हक्कांचा विचार पूर्णत्वास जाऊ शकत नाही, अशी मांडणी ते करतात. अगदी प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंतच्या मानवी संघर्षाचे कारण समानतेची मागणीच होती हे सोदाहरण ते सांगतात समातेर आधारित न्याय्य हक्क सर्वसामान्यपणे सर्व लोकांना एकाच वर्गात समाविष्ट करण्याचा आग्रह धरतात. मानवी हक्क जाहीरनामा व विविध राष्ट्रांच्या राज्य घटनेतही समानतेवर आधारित मानवी हक्कांचीच मांडणी करण्यात आली आहे. समानतेचा मानवीहक्क आज जवळजवळ सर्व राष्ट्रांनी स्वीकारला असला तरी विविध सुविधांचा व संसाधनांचा वापर पाहता अशा पद्धतीची समानता प्रत्यक्षात येण्यास अजूनही बराच पल्ला गाठावा लागणार आहे.

एकंदरीत मानवी हक्क ही संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात असली तरी आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवी हक्कांची जाणीव संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकारानेच अधिक तीव्र झाल्याचे स्पष्ट होते. हिटलरने ज्यूंची घडवून आणलेली कत्तल, दोन महायुद्धांमध्ये जागतिक समुदायाने अनुभवलेला भयकारी अमानुष विध्वंस, फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी केलेली चार स्वातंत्र्यांची घोषणा, यासारख्या असंख्य घटकांनी मानवी हक्काप्रती अधिक उत्तरदायी होण्याची भावना जागतिक मानवी समुदायात विकसित होत गेली ती आजही विकसित होत आहे. मानवी हक्क संकल्पनेचा अर्थ, स्वरूप, विकास व वर्गीकरण यादृष्टीने अभ्यासणे प्रत्येकासाठी आवश्यक ठरते. याशिवाय १९५५ च्या कायद्यान्वये नागरिकत्वाबाबत चौकशी समिती इत्यादीच्याही तरतुदी करण्यात आल्या आहेत.

## समारोप:

हक्क हे व्यक्तिगत हिताचेच साधन नसून सामाजिक कल्याणाचे ते एक माध्यम आहे. मानवी हक्क हे मूलभूत हक्कांप्रमाणे अत्यंत महत्वाचे, पवित्र, सनातन व अलौकिक स्वरूपाचे असतात. मानवी हक्क हे सर्व नागरिकांसाठी व्यक्ती म्हणून स्वाभाविक स्वरूपाचे असतात. प्राचीन काळी मानवी हक्कांच्या संकल्पनेची जाणीव जनतेत नव्हती व कायदेशीर दृष्टीने विचार करता मानवाला तसे कोणतेच हक्क सरकारतर्फे दिले गेले नव्हते. मानवी हक्कांची दुसऱ्या महायुध्दानंतर तीव्रतेने जाणीव झाली. जर्मनीतील नझिने ज्युंची केलेली निघृण हत्या अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकीवर टाकलेले अणुबाँब यात अनेक निरपराध व्यक्तींचा बळी गेला. या घटनेनंतर संपूर्ण जगातील नेते अंतर्मुख झाले व परिणामत: १९४८ साली 'मानवी हक्काच्या सार्वभौमिक जाहीरनामा प्रसिद्ध झाला य मानवी हक्कांच्या रक्षणाच्यादृष्टीने पहिले पाऊल टाकले. मानवी हक्कांचे ऐतिहासिक समालोचन पाहता मानवी हक्कांचे विशेष कायदे व नियम, मानवी हक्कांचा उदय, विकास तसेच डॉ. उमेश चन्द्र यांनी

प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील मानवी हक्काच्या परिस्थितीवर चर्चा केली. तसेच मानवी हक्काच्या अध्ययनाच्या दोन दृष्टिकोनावर सविस्तर चर्चा केली. सर्वसाधारणपणे या घटकात आपण मानवी हक्कांचा अर्थ, ऐतिहासिक विकास व त्याबाबतच्या संध्दांतिक दृष्टिकोनावर स्पष्टीकरण दिलेले आहे

### १.९. आपण काय शिकलो ?

१) हक्क म्हणजे काय ?

२) राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्कामध्ये काय फरक आहे ?

३) नैसर्गिक हाकाचे प्राकार कोणते ?

४) जगण्याचा हक्क म्हणजे काय ?

५) शिक्षणाचा हक्क म्हणजे काय ?

६) स्वातंत्र्याचा हक्क म्हणजे काय ?

७) हक्काची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

८) मानवी हक्क म्हणजे काय ?

९) समतेचा हक्क स्पष्ट करा.

१०) हक्काच्या मर्यादा स्पष्ट करा.

११) हक्क संरक्षित ठेवण्याच्या पद्धती स्पष्ट करा ?

१२) हक्कच्या मार्गातील अडथळे कोणते ?

१३) घटनात्मक हक्क आणि नैसर्गिक हक्क यातील फरक स्पष्ट करा.

१४) मानवाच्या सर्वांगीण विकासातील हक्काचे महत्व स्पष्ट करा.

१५) राजकीय हक्कामध्ये कोणकोणत्या हकांचा समावेश होतो ?

१६) हक्काची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

१७) नागरी हकांमध्ये कोणकोणत्या हक्कांचा समावेश होतो ?

१८) हक्काचा ऐतिहासिक सिद्धान स्पष्ट करा.

१९) हक्कांचा मार्क्सवादी सिद्धांत स्पष्ट करा.

## संदर्भ सूची:

१) ज. रा. शिंदे, राजकीय संकल्पना सिद्धांत आणि संकल्पना २) डॉ.भा.ल.भोले, राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण ३) डॉ.शैलेन्द्र देवळाणकर, राज्यशास्त्रातील मुलभूत संकल्पना ४) प्रा.सुधाकर कुलकर्णी, राजकीय सिद्धांत, अरुणा प्रकाशन, लातूर ५) डॉ.श्रीराम ऐरण कर, राजकीय सिद्धांत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर ६) प्रा.अशोक नाईकवाडे, राज्य व राजकीय व्यवस्था, विद्या बुक्स पब्लिकेशन.औरंगाबाद ७) प्रा.किसन चोपडे, राजकीय सिद्धांताची तत्वे, विद्या बुक्स

munotes.in

पब्लिकेशन.औरंगाबाद ८) डॉ.भगवान लोखंडे, मानवी हक्क आणि भारत, दुर्वा एजन्सी, पुणे, २०१८ ९) भा.ल.भोळे, राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण, पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपूर १०) कुलकर्णी पी.के., मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१३ ११) डॉ.वा.भा.पाटील, राजकीय सिद्धांत, प्रशांत पब्लिकेशन १२) डॉ.मंगेश कडू, राजकीय सिद्धांत, हिमालया पब्लिशिंग हाउस, १३) प्रा.अशोक चौसाळकर, द युनिक अकादमी, पुणे

१४) Allan Gewirth, "Why There Are Human Rights", (१९८५)

१५) Douglas Husak, "Why There Are No Human Rights", (१९८४)

१६) John O'Manique, "Universal and Inalienable Human Rights: A Search for Foundations", (१९९०)

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

घटक २

# २

# समता (Equality)

**घटक रचना**


२.० घटकांची उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.३ समतेवर आधारित स्पर्धा (contestations on equality)

२.४ उपचाराची समता विरुद्ध समान म्हणून उपचार
(equality of treatment vs treatment as equals)

२.५ संसाधनांची समानता आणि परिणती (Equality of resources and outcome)

२.६ सारांश

२.७ संदर्भ सूची


## २.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर

१) 'समता या संकल्पनेचा/संज्ञेचा अर्थ सांगता येईल

२) 'समता या संकल्पनेये विभिन्न प्रकार स्पष्ट करता येतील. त्या आधारे समतेचे स्वरूप स्पष्ट करता येईल.

३) व्यक्तीला आपल्या गुण आणि क्षमतांचे कौशल्य दाखविण्यासाठी स्पर्धेमध्ये उतरावे लागते. ही स्पर्धा समतेवर आधारित व्हावी यासाठी समाज व राज्याची काय भूमिका असावी याचे स्पष्टीकरण करता येईल.

४) समाजातील अन्यायकारक विषमता दूर करण्यासाठी काही वैधानिक उपचार केले जातात. या उपचार पद्धतीतून जी विषमतेची वागणूक दिली जाते त्यातून समतेच्या उपचारासंदर्भात प्रश्न निर्माण होतात. त्या प्रश्नांचे सादरीकरण करता येईल.

५) संसाधनांची समानता प्रस्थापित करणाऱ्या विविध पद्धती आहे, समता प्रस्थापित करण्यात या पद्धतींची भूमिका व तीच्या मर्यादा मयादा स्पष्ट करता येईल.

## २.१) प्रस्तावना

समता लोकशाही व्यवस्थेतील महत्वाचे आधारभूत तत्व आहे. समतेचे तत्व प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेले दिसते. प्राचीन ग्रीक नगर राज्यातही समतेचे तत्व ज्ञात होते. वर्ग- जात, वंश, लिंग, भाषा अशी कोणतीही भेद रेखा न मानता बुद्ध महावीर यांनी अध्यात्माची दारे सर्वांसाठी समान रीतीने खुली आहेत असे सांगून प्राचीन भारतात अध्यात्माच्या बाबतीतच नव्हे तर काही अंशी समाज क्रांती घडवून आणली होती. देशात गुलाम सोडून नगर राज्यातील सर्व नागरिक समान आहेत, असे तत्व मान्य व प्रस्थापित झाले होते. यावरून प्राचीन काळात समतेच्या तत्त्वाचा विचार मान्य जरी केलेला दिसत असला तरी त्याची व्याप्ती ही मर्यादित होती हे मान्य करावे लागते. समता ही संकल्पना आधुनिक व व्यापक अर्थाने राज्यशास्त्रात आली ती १८ व्या शतकापासून. अमेरिकन राज्यक्रांतीनंतर अमेरिकेतील नागरिकांनी १७७६ साली काढलेल्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात ' समता' या तत्त्वाला मान्यता दिली. तसेच १७८९ मध्ये फ्रान्समधील क्रांतिकारकांनी मानवी हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यात ' सर्व माणसे जन्मतः स्वतंत्र व समान असतात' असे घोषित केले होते. या दोन्ही क्रांतीचे पडसाद जगभर उमटले. त्यातून समतेच्या हक्कासाठी संघर्षाला सर्वत्र चालना मिळाली.

## 2.2 विषय विवेचन

**समता या संकल्पनेचा अर्थ व व्याख्या:-**

समता ही संकल्पना स्वातंत्र्य या संकल्पने प्रमाणेच आशयाच्या बाबतीत संदिग्ध आहे. राज्यातील सर्व लोक कोणताही प्रकारचा भेदभाव न करता विधी नियमाच्या दृष्टीने समान असणे याला आपण समता असे म्हणतो. विधी नियमांच्या बाबतीत समते बरोबरच सामाजिक, आर्थिक, नागरी व राजकीय या सर्वच क्षेत्रात समता आपल्याला अपेक्षित असते. त्यामुळे समता या संकल्पनेकडे पाहण्याचा भिन्नभिन्न दृष्टीकोन तयार होतो. मार्क्सवादी आर्थिक समतेवर अधिक जोर देतात तर, आंबेडकरवादी सामाजिक समतेवर आणि उदारमतवादी नागरी व राजकीय समतेवर अधिक जोर देतात. अनेकांचा समस्येकडे पाहण्याचा दृष्टिकोन भावनिक व सामाजिक वास्तवापासून लांब जाणारा असतो. " माणसे निसर्गतः समान असतात, ती समाज म्हणुन जन्माला आलेली असतात" अशी विधाने अशा दृष्टीकोनाचे द्योतक असतात. यातून समतेच्या अर्थाचे काहीच स्पष्टीकरण मिळत नाही. उलट अर्थ विपर्यास होण्याची मोठी शक्यता असते कारण समाजामध्ये वस्तुस्थिती जेव्हा आपण पाहतो तेव्हा, निसर्गतः माणसे शारीरिक बौद्धिक क्षमतांच्या दृष्टीने कमालीची विषम असतात. 'सर्वांभूती परमेश्वर' किंवा सर्व माणसे एकाच ईश्वराची लेकरं आहेत, अशा युक्तिवादातून अध्यात्माची दरवाजे भलेही समानतेने सर्वांसाठी खुली आहेत असे म्हणता येईल. पण वास्तवत: असा युक्तिवाद मांडणाऱ्या समाजातच आपल्याला जाती, वंश, लिंग या आधारावर भेदभाव केला जातो, नव्हे अन्याय

अत्याचाराची शास्त्रे रचली जातात. त्यामुळे अशा भाबड्या व भावविवश विवेचनातून समता या संकल्पनेचा संमती बद्दलचा खराखुरा आशय व्यक्त होत नाही.

समता या संकल्पनेच्या अनेक विचारवंतांनी व्याख्या केलेल्या आहेत. या व्याख्यातून स्पष्ट होणारा समतेचा अर्थ समजून घेण्यापूर्वी आपण हे लक्षात घेतले पाहीजे की आधुनिक लोकशाही राजकीय व्यवस्थेत आणि आधुनिक समाज जीवनात समतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हीच बाब लक्षात घेऊन भारतीय संविधानाने आपल्या नागरिकांना मूलभूत हक्क देताना प्राधान्याने समतेच्या हक्काचा विचार केला आहे. भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत ' दर्जा आणि संधीची समानता' असा उल्लेख आहे. माणसामाणसातील कृत्रिम भेद निर्माण करणाऱ्या सर्व विशेष अधिकारांचे समाज जीवनातून उच्चाटन झाले पाहिजे आसमती चा पहिला अर्थ असतो. तसेच प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तित्वाचा विकास करण्यासाठी समान संधी उपलब्ध असेल. धर्म, जात, लिंग, भाषा, प्रदेश, वंश असे कोणतेही कारण व्यक्तीच्या विकासाच्या आड येणार नाही. समाजात श्रीमंत-गरीब यातील आर्थिक विषमता, स्त्री-पुरुष अशी लैंगिक विषमता उच्च-निच्च जातीतील सामाजिक विषमता एका मर्यादेपेक्षा जास्त असल्यास समतेला मारक ठरते. समाजातील विषमता समाजातील कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासाच्या आड येणार नाही, प्रत्येक व्यक्तीला व्यक्तित्वाचा विकासाची समान संधी उपलब्ध असेल, हा समतेचा दुसरा अर्थ आहे.

विषमतेच्या विषवृक्षाला प्रत्येक समाजात धर्म, संस्कृती, समाज परंपरा, चालीरीती, इ. द्वारे खतपाणी घातले जाते. त्यामुळे हजारो वर्ष ही अन्यायकारक विषमता समाजात मूळ धरून असते, नव्हे तिचे उदात्तीकरण केले जाते. त्यामुळे अशी विषमता एकाएकी नष्ट होऊन सर्वांना व्यक्तित्व विकासाची समान संधी निर्माण होईल, अशी परिस्थिती सहज निर्माण होणार नाही. त्यासाठी समाज प्रबोधना बरोबर समाजात अशा अन्यायकारक विषमतेला बळी ठरलेल्या वंचित, दुर्बल वर्गाला कायद्याचे संरक्षण देण्याबरोबरच या वर्गाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काही संविधानिक- वैधानिक उपायोजना करणे आवश्यक असते. उदा. भारतात दिले जाणारे आरक्षण, अमेरिकेत कृष्णवर्णीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी असलेली Affirmative Action, अशा उपाययोजनांमुळे हजारो वर्षे विषमता प्रधान व्यवस्थेचा बळी ठरलेला वंचित- दुर्बल घटक मुख्य प्रवाहात येण्यास मदत होते. तात्पर्य याने स्वातंत्र्य व न्याय या तत्वांची योग्य ती सांगड घालून समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हा समतेचा तिसरा अर्थ आहे.

**व्याख्या:**

समतेचा अर्थ अधिक सखोल व सूक्ष्मपणे समजून घेण्यासाठी यासंबंधीच्या काही विचारवंतांचे व्याख्या लक्षात घेणे आवश्यक आहे.

१) **लास्की** :- यांच्या मते " समता ही मूलतः समतलन प्रक्रिया (Leveling process) असते." पुढे ते म्हणतात की, समता म्हणजे "कोणत्याही व्यक्तिला समाजात असे स्थान दिले जाणार नाही की जेणेकरून ती आपल्या शेजाऱ्यावर कुरघोडी करू शकेल आणि त्याला आपले नागरिकत्वाचे अधिकार नाकारतील."

लास्कीच्या या व्याख्याचा अर्थ असा की, समता ही समाजात समतलनाची प्रक्रिया असते आणि ती अखंड चालणारी न संपणारी प्रक्रिया असते. कारण कोणत्याही समाजात कधीही एकसारखेपणा नसतो. म्हणजेच समता म्हणजे एकसारखेपणा आनने नव्हे किंवा भिन्नत्वाचा अभाव असणे नव्हे. किंबहुना समाजातील भिन्नता समाजाला सौंदर्य प्रदान करते. पण समता म्हणजे वरकरणी व्यक्तीव्यक्तीत प्रत्येक बाबतीत भिन्नता असली तरी विकास प्रक्रियेत भाग घेण्याची सर्वांना समान संधी उपलब्ध असने, विधिनियमांची समानता असणे अपेक्षित असते.

२) **बार्कर** यांच्या मते "समतेचे तत्व म्हणजे विकासाच्या ज्या संधी आणि अधिकाराची मला हमी देण्यात आली आहे, त्याच प्रकारच्या संधी आणि अधिकारांची हमी इतरांनाही द्यायला हवी. आणि इतरांनी ज्याची हमी देण्यात आली आहे ते मलाही प्राप्त व्हायला हवे." बार्करच्या समतेच्या व्याख्येचा अर्थ असा आहे की, राज्यद्वारे कायद्याची जी प्रस्थापित व्यवस्था आहे ति सवसाधारणपणे सर्वांना समान पद्धतीने राबवली जाईल. प्रत्येकाला आपल्या क्षमतेप्रमाणे आणि पात्रतेप्रमाणे आपला विकास करण्याची संधी उपलब्ध असेल.

३) **राफेल** यांच्या मते, "प्रत्येक व्यक्तिला आपल्या मूलभूत गरजांच समान समाधान करण्याचा अधिकार आणि आपल्या क्षमतांचा विकास आणि वापर करण्याची समान संधी असणे म्हणजे समता होय".

४) **ब्रायन टर्नर** यांनी समतेच्या तत्वात चार घटकांचा समावेश केलेला आहे, -

i) सर्वांसाठी मूलभूत समता
ii) समान संधी
iii) विकासासाठी सर्वांना समान परिस्थितीची उपलब्धता
iv) फलश्रुतीची समानता

**विचारवंतांच्या वरील व्याख्या व त्याचा अर्थ लहात घेतल्यास समता महणजे काय? तर -**

i) समाजजीवनात सर्व व्यक्तिंना आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची पर्याप्त संधी उपलब्ध असेल.

ii) कोणत्याही व्यक्ती वा गटाला जन्मसिद्ध विशेषाधिकार असणार नाहीत

iii) अधिकारांचे सर्व नागरिकांना समान वाटप झालेले असते.

iv) अधिकारपद प्राप्त करण्याची संधी प्रत्येकाला आपल्या क्षमता व पात्रतेनुसार सारख्या प्रमाणात उपलब्ध असते.

समता म्हणजे एकसारखेपणा नव्हे, समाजातील प्रत्येक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीपासून भिन्न असते. परंतु ही - भिन्नता समतच्या तत्वाला मारक असु शकत नाही. समाजातला भिन्नता असते म्हणजे भेदभाव असणारच, समतेचा अर्थ एवढाच की हा भेदभाव विवेकनिष्ठ आधारावर केले गेले असले पाहिजेत. एकेकाळी वंश, लिंग, जात या आधारावर व्यक्तीव्यक्तीत भेदभाव केला जात असे, परंतु हा भेदभाव विवेकनिष्ठ नव्हता. पुराण धर्मशास्त्र, रूढी, परंपरा या आधारे हा भेदभाव केला जात होता.अशा

भेदभावातून अन्यायकारक विषमता निर्माण झाली. सध्याच्या काळात वंश, लिंग, जात या आधारावर भेदभाव केला जातो. त्याला कायदयाचे अधिष्ठान असते. उदा. मागासवर्गासाठी राखीव जात महिलांना विशेष सवलती, इत्यादी. परंतु या भेदभावाला विवेक निष्ठेचा आधार असल्यामुळे यातून अन्यायकारक विषमता निर्माण होत नाही, उलट अन्यायकारक विषमता निर्माण होऊ नये यासाठीच्या या उपाययोजना मानल्या जातात. म्हणजेच प्रभावातून समतेला जर बाधा येऊ नये असे वाटत असेल तर सर्वप्रथम त्या वेद भावांसाठी विवेकनिष्ठ आधार कोणते आहेत यावर समाजात एकमत असले पाहिजे, आणि त्या आधारावर करायच्या भेदभावाचे वाजवी प्रमाण किती असावे याबद्दल ही एक वाक्यता असली पाहिजे. त्यामुळे या आधारावर आणि विशिष्ट मर्यादेमध्ये केला जाणारा भेदभाव समतेला मारक न ठरता पोषक ठरेल.

**समतेचे प्रकार:-**

समतेचे पुढील प्रकार सांगता येईल.

१) **नैसर्गिक समता:-**

अगदी प्राचीन काळापासून नैसर्गिक समतेच्या प्रकारची राजकीय विश्लेषणाच्या अनुषंगाने चर्चा सुरू आहे. सर्व व्यक्ती निसर्गतः समान असतात. माणूस म्हणून व्यक्ती जेव्हा जन्माला येतो तेव्हा समाजातील वंश, लिंग, वर्ण, जात, भाषा, संस्कृती या आधारावर त्याला उच्च नीच समजणे चुकीचे. जरी व्यक्ती जन्मताना विभिन्न पात्रता, क्षमता, गुणवत्ता, वर्ण असे गुण घेऊन येतो. तरी, त्या आधारावर कोणत्याही व्यक्तीला एक दुसऱ्यापासून उच्च निच्च, श्रेष्ठ-कनिष्ठ समजणे हे नैसर्गिक कायद्याच्या विरुद्ध आहे. त्यामुळे जन्मतः प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा, अस्तित्व समान असते. जॉन लॉक यांनी निसर्गावस्थेचे वर्णन करताना माणसांचा नैसर्गिक निरागसपणा अधोरेखित करून प्रत्येक व्यक्ती निसर्गतः जन्माने समान व स्वतंत्र असतात असे म्हटलेले आहे. रुसो, कार्ल मार्क्स, डॉ. आंबेडकर इत्यादी अशा जगभरातील थोर विचारवंतांनी निसर्गाने माणसाला समान म्हणून जन्माला घातले हा नैसर्गिक समतेचा आदर्श शिरोधार्य मानलेला दिसून येतो.

२) **वैधानिक किंवा कायद्याची समानता:-**

राज्याच्या कायद्याच्या दृष्टीने सर्व माणसे समान आहेत. कायद्याचे संरक्षण मिळविण्यास ती सारखीच पात्र आहे असा वैधानिक किंवा कायद्याच्या समतेचा अर्थ आहे. समान संधी, समान सोयी, समान अधिकार आणि समान न्याय सर्वांना सारख्याच रीतीने उपलब्ध करून देणे हे राज्याचे कार्य असते व विधी नियमाद्वारे ते केले जाणे अपेक्षित असते. कायदा सर्वांसाठी सारखा असणे, तो सर्वांसाठी सारख्या पद्धतीने अमलात येणे आणि सर्वांसाठी तो सारख्या पद्धतीने लागू होणे हे कायद्याच्या समानतेचे गमक आहे.

परंतु कायद्याची समान एकदा लागू झाल्याबरोबर सर्वांना या संपत्तीचा लाभ सारख्या पद्धतीने घेता येईल असे नाही. कायद्याचा भंग झाला किंवा कुणाचा समानतेचा हक्क डावलल्या गेल्यास त्याला न्यायालयात दात मागण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. तरी पण आर्थिक दृष्ट्या संपन्न

लोकांना, यांच्या प्रभुत्व शाली जातीची मिरासदारी शासन प्रशासनात आहे अशांना अधिकाराचा लाभ जसा घेता येतो तसा लाभ गरीब- वंचित शोषित समाजातील लोकांना प्राप्त करून घेणे फार कठीण आहे. अर्थात ही बाब न्यायालयीन क्षेत्रात होत असलेल्या सुधारणांद्वारे किंवा ' ॲट्रॉसिटी ॲक्ट' सारखे कायदे करून दूर केली जाऊ शकते.

### ३) राजकीय समता:-

लोकशाही व्यवस्थेत राजकीय समता प्रस्थापित असणे ही पूर्वअट मानली जाते. मतदानाचा हक्क, निवडणूक लढविण्याचा हक्क, सरकारवर टीका करण्याचा हक्क आणि विशिष्ट प्रश्नावर लोकमत घडवण्यासाठी राजकीय संघटना स्थापन करण्याचा हक्क राज्यातील सर्व नागरिकांना सारखेच उपलब्ध असणे आणि निर्वेधपणे उपभोगता येणे याचा अर्थ राजकीय समता असा होतो. ' एक व्यक्ती, एक मत आणि एक मत एक मूल्य' हे राजकीय समतेचेच लक्षण आहे. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार असणे, पदाची पात्रता धारण करणाऱ्या प्रत्येकाला त्या पदावर जाण्याचा हक्क असणे, प्रतिनिधित्व करण्याची समान संधी उपलब्ध असणे राजकीय समस्येत अपेक्षित असते. राजकीय समता प्रस्थापित करण्यासाठी जोडीला विधी नियमाची समानता सुद्धा प्रस्थापित होणे अपेक्षित असते. कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असणे, सर्वांना कायद्याचे समान संरक्षण प्राप्त होणे आणि कायद्याचे उल्लंघन झाल्यास स्थापित कायद्यानुसार सर्वांना सारखी शिक्षा केली जाणे या सगळ्या गोष्टींचा अंतर्भाव राजकीय समजत होतो.

### ४) सामाजिक समता -

सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा, मान, सन्मान वंश, वर्ण जात, लिंग या आधार न ठरता गुण - पात्रता, योग्यता या आधारावर ठरणे म्हणजे सामाजिक समता होय. हजारो वर्षाच्या रूढी, प्रथा, परंपरा या आधारावर समाजातील विशिष्ट वर्णाला विशेष दर्जा: जन्मतःच मिळत असतो. अशा समाजात सामाजिक समता निर्माण होण्याची शक्यता नसते. जन्म तत्वाच्या आधारावर कोणाला खास हक्क, पावित्र्य श्रेष्ठत्व न देता सर्वांना विकासाची समान संधी असावी हे सामाजिक समतेच्या तत्वाचे खास तत्व असते. जातिभेद, स्त्रि-पुरुष विषमता, सांस्कृतिक भेदभाव वांशिक भेदभाव संपुष्टात येऊन समान पातळीवर येणे गरजेचे आहे. दिर्घकाळ समाजातील ज्या घटकांना जन्मसिद्ध भेदभावामुळे उपेक्षित, शोषित राहणे भाग पडले अशा वर्गाला इतरांच्या बरोबरीत आणण्यासाठी जात, धर्म, लिंग, वंश या जन्मसिद्ध आधारावर विशेष संरक्षण देण्यासाठी आरक्षण किंवा इतर सवलतीच्या उपाययोजना करणे हे सामाजिक समतेच्या विरोधात जाणारे नसते. उलट सामाजिक समता निर्माण होण्याच्या दिशेने सकारात्मक पाऊल असते. अशाप्रकारचा बचावात्मक भेदभाव केवळ उपेक्षित दुर्बल वर्गाच्याच कल्याणाचा नव्हे तर संपूर्ण समाजाच्या स्वास्थ्यासाठी आणि विकासासाठी उपयुक्त ठरू शकते

## ५) आर्थिक समता :

आर्थिक समता ही वरील सर्व समतेच्या प्रकारांना आधारभूत असणारी बाब आहे. समाजात जर टोकाची आर्थिक विषमता असेल तर वैधानिक, नैसर्गिक सामाजिक, राजकीय समता यांना काहीच अर्थ उरत नाही, हक्काचा संबंध 'पर्याप्त संधीची उपलब्धता' याच्याशी दिसतो, आणि समाजात टोकाची आर्थिक विषयता असेल तर आर्थिकदृष्ट्या कमकूवत वर्गातील पात्र व गुणवत्ताधारक व्यक्ताला योग्य संधी न मिळाल्यामुळे विकासापासून वंचित राहतील म्हणजेच हक्कांपासून वंचित राहतील.

आर्थिक समता प्रस्थापित करण्याचे सामान्यतः दोन मार्ग सांगितले जातात, एक शास्त्रशुद्ध समाजवादाचा म्हणजेच मार्क्सवादाचा. दुसरा, लोकशाही समाजवादाचा. भांडवलशाही अर्थव्यवस्था मुक्त व अनिर्बंध स्पर्धेचे समर्थन करते. या स्पर्धेत जे मागे पडतात त्याच्याविषयी भांडवलशाही राज्यसंस्था अत्यंत निष्ठुर व उदासिन असते. निर्धन व गरीब लोकांसोबत निष्ठुरतेने वागणारी भांडवलशाही रक्तरंजित क्रांती केल्याशिवाय नष्ट होऊ शकत नाही, असे मार्क्सवादाचे म्हणणे आहे, या विचाराच्या आधारावर जगात अनेक ठिकाणी समाजवादी राजवटी प्रस्थापित झाल्या. अशा साम्यवादी राजवटींनी लोकशाही मूल्ये पायदळी तुडवल्या मुळे आज त्यांची फरफट झाली असली तरी, आर्थिक समतेसाठी समाजवादाशिवाय तरणोपाय नाही ही गोष्ट स्पष्ट आहे. त्यासाठी लोकशाही मूल्यांच्या आधारे समाजवाद स्थापित करण्याचा मार्ग सांगितला जातो. राज्यातील संपत्ती आणि उत्पादनाची सर्व साधने आर्थिक समता निर्माण व्हावी म्हणून नियंत्रीत करावी. उत्पन्न व मालमत्ता मिळविण्याबाबत व्यक्ती-व्यक्तीत विशाल खायी निर्माण होऊ नये यासाठी राज्याने लोकशाही मार्गाने वेगवेगळे विधिनियम तयार करावे. करयोजना जमीन मालकी हक्काची मर्यादा, वित्त संस्थांवर सरकारी नियंत्रण, यासोबतच उचित रोजगाराच्या संधी प्रत्येक मुला मुलींना योग्यतेनुसार शिक्षणाची संधी, आरोग्य, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, रस्ते, अन्नधान्याचे वितरण इत्यादी बाबतीत निवडून दिलेल्या सरकारने पुढाकार घेऊन आर्थिक विषमता नष्ट करावी. असा लोकशाही समाजवादाचा मार्ग आर्थिक समता प्रस्थापित करण्यास प्रभावी असला तरी भांडवलदार, कारखानदार, नौकशाहा व राजकारणी यांच्या अभद्र युतीमुळे आर्थिक समता स्थापित करण्याचा मार्ग अधिक कठिण होतो.

## ६) आंतरराष्ट्रीय समता:-

जगातील राष्ट्रे अनेक राष्ट्रीय एकमेकांपेक्षा भिन्न असतात. भौगोलिक, आर्थिक लोकसंख्या लष्करी, तंत्रज्ञान, मनुष्य बळ अशा अनेक बाबतीत त्यांच्यात केवळ तफावत असते असे नाही तर, तर याच कारणाने त्यांची ताकद ही कमी-अधिक असते. परंतु आंतरराष्ट्रीय समतेचे तत्त्व असे सांगते की, सर्व राष्ट्रांना सारखीच वागणूक दिली जायला पाहिजे. आंतरराष्ट्रीय कायद्यात त्या दृष्टीने अनेक तरतुदी केल्या आहेत. जागतिक संघटनेची लहान व मोठ्या राष्ट्रांचा दर्जा सन्मान मानला जातो. जागतिक पातळीवर आपली

भूमिका मांडण्याचा सर्व राष्ट्रांना समान अधिकार देण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय समानतेला जसा राजकीय संदर्भ आहे तसाच मानवतावादी संदर्भही आहे. आंतरराष्ट्रीय संघटनेने आपल्या जागतिक मानवी हक्काच्या जाहीरनाम्यात जगातील सर्व माणसांची प्रतिष्ठा व दर्जा समान मानून जागतिक जाहीरनाम्यात सांगितल्या गेलेल्या मानवी हक्काची अंमलबजावणी जगातील सर्व देशांनी आपापल्या पद्धतीनुसार करावी असे आवाहन केले आहे. जगातून गुलामगिरी, वेट बिगारी, बाल मजुरी अनारोग्य, आर्थिक सामाजिक विषमता शोषण यासारख्या समस्या नष्ट करून जगातील सर्व व्यक्ती सन्मानाचे, आरोग्यसंपन्न सुखी समृद्ध जीवन जगण्याची व्यवस्था करणे म्हणजे आंतरराष्ट्रीय समानता होय.

## 2.3 समानतेवर स्पर्धा (Contestations on Equality)

समता म्हणजे विविधतेचा अभाव नव्हे. समाजात विचारांची, गुणांची, प्रवृत्तीची आणि कला अविष्काराची विविधता आवश्यक असते. त्यातून समाजाची प्रगती होत असते. विकासाकरिता काही गोष्टींची आवश्यकता असते. प्रत्येकाने आपल्या प्रयत्नाने आपल्या क्षमतांचा वापर करून अशा गोष्टी प्राप्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण यासाठी व्यक्तिगत प्रयत्न आणि कौशल्याशिवाय खुल्या सामाजिक वातावरणाची आवश्यकता असते. समाजातील स्पर्धाही बंदिस्त स्वरूपाची असेल तर व्यक्तिगत प्रयत्नांना मर्यादा पडतात. स्पर्धेचा बंदिस्तपणा आर्थिक-सामाजिक विषमतेमुळे, संसाधनांचे केंद्रीकरण झाल्यामुळे होत असते. उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेत खुल्या स्पर्धेवर अधिक भर दिला जातो. त्यातून खाजगी मालकी ला आणि अनिर्बंध आर्थिक स्वातंत्र्याला प्राधान्य दिले जात असल्यामुळे आर्थिक विषमतेला खतपाणी मिळते. अनिर्बंध आर्थिक स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वार्थी धनदांडगे प्रचंड धनसंचय स्वतःकडे करतात. अशा व्यक्तींचा अमर्याद धनसंचय समतेसाठी मारक ठरतो. मुक्त स्पर्धेचे आर्थिक धोरण निरंकुश अर्थव्यवस्थेवर आधारित असल्यामुळे “ विषमता वाढवण्यासाठी समान संधी” हे तिचे मुख्य सूत्र असते. जे मुळात विषम आहे त्यांना समान समजून, त्यांना आपल्या व्यक्तिगत विकासासाठी खुल्या स्पर्धेत सहभागी व्हा, असे सांगितले तर खुल्या आणि मुक्त स्पर्धेचा देखावा जरूर तयार होईल, परंतु त्यातून व्यक्तिमत्व विकासाच्या ऐवजी अन्यायकारक विषमता निर्माण होईल. अशा प्रकारची मुक्त स्पर्धा मूठभर लोकांचे विशेषाधिकार कायम ठेवेल. दुर्बल वंचित वर्गाला स्पर्धेच्या बाहेर ढकलून देईल. अशा प्रकारच्या मुक्त स्पर्धेतून केवळ विषमता निर्माण होत नाही तर, जुलूम, अत्याचार व शोषण करणारी व्यवस्था जन्माला येते.

साम्यवादी राजवटीत नेमके याच्या उलट घडते. साम्यवादी व्यवस्थेत लोकांच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन उत्पादनाचे अग्रक्रम ठरवले जातात. खाजगी मालकी नष्ट करून सार्वजनिक मालकी प्रस्थापित केली जाते. आर्थिक समता निर्माण करून मुक्त स्पर्धा संपुष्टात आणली जाते. परंतु सर्व उत्पादन साधने सार्वजनिक मालकीची करण्याचा परिणाम आर्थिक तसेच राजकीय सत्ता हुकूमशाही राजवटीच्या हाती केंद्रित होते. त्यामुळे लोक स्वातंत्र्य तर गमावून बसतातच पण त्याचबरोबर समता ही प्रस्थापित होत नाही. भा. ल. भोळे म्हणतात त्याप्रमाणे “ स्वातंत्र्य विरहित समता ही मालकाने

गुलामांना दिलेली समता ठरते. त्या समतेचा अर्थ " सारखेच दास्य" असा होतो. समता मागण्यासाठी व मिळविण्यासाठी स्वातंत्र्य असावेच लागते. कोणाच्या तरी कृपेतून मिळालेली समता ही असून नसल्यासारखीच असते."

१९९० पूर्वीच्या रशियात तसेच सध्याच्या चीन आणि उत्तर कोरिया इत्यादी देशात साम्यवादाच्या नावाखाली हुकूमशाही निर्माण होऊन समतेच्या कल्पनेशी सर्वस्वी विरोधी कार्य करीत आहे. जन सत्तेचे प्रतीक होण्याऐवजी ती राज्य सत्तेची प्रतीके बनली आहेत.

भांडवल प्रधान उदारमतवादी लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्य प्राधान्याने मान्य करून व्यक्तीच्या क्षमता, गुण, पात्रतांना वाव किंवा संधी देण्यासाठी मुक्त स्पर्धेचे समर्थन केले. ज्या देशात सामाजिक व आर्थिक बाबतीत टोकाची विषमता नसेल आणि समता स्थापन करण्यासाठी वैधानिक उपाय योजना केलेल्या असतील अशा देशात अशी खुली स्पर्धा समतेवर आधारित होते. त्यामुळे समाजातील सर्व घटकांना समान पद्धती ने आपल्या विकासाची संधी उपलब्ध होते. परंतु विकसनशील देशात जेथे जेथे टोकाची सामाजिक व आर्थिक विषमता असते, जेथे वर्षानुवर्षे एका विशिष्ट वर्गाची, जाती व वंशाचे वर्चस्व असते, जिथे उपजीविकेची साधने मोजक्याच वर्गात- जातीकडे केंद्रित झालेली असते, अशा समाजव्यवस्थेत वैधानिक समता प्रस्थापित होऊनही खुली आणि मुक्त स्पर्धा निर्माण होऊन समता कधीच प्रस्थापित होऊ शकत नाही. म्हणजेच समतेवर आधारित स्पर्धा घडवून आणण्याची पूर्वअट ही सामाजिक व आर्थिक बाबतीत समता स्थापित करणे ही आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सविधान सभेतील आपल्या शेवटच्या भाषणात भारतातील अशा विसंगतीवर बोट ठेवून ते बाबत चेतावणी दिली होती. ते म्हणाले होते की, "उद्यापासून आपण एका विसंगतीत पदार्पण करीत आहोत. कायद्यापुढे सर्व समान असणार आहेत आणि प्रत्येक व्यक्तीला समान मत असणार आहे, पण प्रत्येक व्यक्तीचे समान मूल्य मात्र असणार नाही. जर ही विषमता आणि विसंगती अशीच कायम राहिली तर एक दिवस असा येईल की लोक या विषमतेला कंटाळून राज्य घटनाच उलथून पडतील." जातील सामाजिक आणि आर्थिक विषमता समतेवर आधारित स्पर्धा निर्माण करू शकत नाही. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी राजकीय लोकशाही सामाजिक व आर्थिक लोकशाहीत परावर्तित करण्याची आपण त्वरा करायला पाहिजे, असे प्रतिपादन केले होते.

भारत आणि इतर विकसनशील देशात अनेकांना आजही दारिद्र्यात जीवन जगावे लागत आहे. येथील जनतेला जीवनाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, आरो, स्वच्छ पाणी यांची हमी नाही. आजही निरक्षर बालकांची संख्या मोठी आहे. वेठ बिगारी, बाल कामगार सारख्या पद्धती आजही चालूच आहेत. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी वाढली आहे. एका बाजूला झोपडीत राहणाऱ्यांना तिथून हाकलले जाते तर दुसऱ्या बाजूला भ्रष्ट मार्गाने धनदांडग्यांनी जमिनी बळकावल्या आहेत. खाजगीकरणाच्या नव्या धोरणामुळे कमीत कमी लोकांना कामावर ठेवून, भांडवली गुंतवणूक वाढवून नकाशाचे प्रमाण वाढविण्यात गुंतले आहेत. त्यामुळे बेरोजगारीने भयानक रूप धारण केले आहे. मोठे भांडवल प्रधान प्रकल्प लोकांना विश्वासात न घेता स्वीकारले जात आहेत. त्या प्रकल्पामुळे लाखो लोकांना बेघर केले जात आहे. त्यांच्या पुनर्वसनाच्या योजना फक्त कागदावर

दाखवल्या जातात. परकीय भांडवल गुंतवणुकी करता जे करार केले जातात, ते देशाच्या आणि लोकांच्या हिताचे नाही हे स्पष्टपणे दिसत असताना देखील देशावर लादले जात आहेत. लोकांनी त्यांच्या जीवनमानाशी संबंधित असलेल्या प्रश्नांकडे लक्ष देऊ नये आणि आणि आपल्या हक्कांबाबत आग्रही राहू नये यासाठी सत्ताधारी भावनिक प्रश्न उदा. देशाची अस्मिता, जातीय- धार्मिक कट्टरता, मंदिर मशिदीचे प्रश्न, भाषिक- प्रादेशिक अस्मितेचे प्रश्न, वांशिक प्रश्न उभे केले जात आहेत. अशा परिस्थितीत समता,, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय ही लोकशाही मूल्य केवळ नावापुरते शिल्लक राहतात. अशा समाजव्यवस्थेत समतेवर आधारित स्पर्धा निर्माण होऊ शकत नाही.

समतेवर आधारित स्पर्धेसाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांची बांधिलकी असणारा नागरी समाज अभिप्रेत आहे. नागरी समाजच घटनेने स्थापित केलेल्या किंवा राज्यकर्त्यांनी क्षमतेसाठी अमलात आणलेल्या ‘ आरक्षण’ किंवा सकारात्मक कृती (Affirmative Action) नीतिचा व्यवस्थित अमल होऊ शकतो. नागरी समाजाची मूल्य समाजात रुजलेली नसतील तर वर्चस्व असलेल्या जाती वर्गाची अशी भूमिका तयार होऊ शकते की, आतापर्यंत हे लोक ( जाति, वंश, लिंग) आमच्या खाली होते, गुलाम होते. आता शासनाच्या नीतीमुळे (आरक्षण किंवा सकारात्मक कृती) आमच्या पुढे जात आहेत, आमची बरोबरी करीत आहेत. असा पारंपरिक मूल्य सांभाळून असलेल्या समाज समतेवर आधारित स्पर्धा निर्माण करण्याच्या नीती विरोधात जाऊ शकतो. तसेच वर्चस्व कायम राहावे यासाठी आरक्षण यासारख्या नीतीचा विरोध उभा किंवा आपले वर्चस्व कायम रहावे यासाठी आपल्या जाती वर्गासाठी आरक्षण किंवा सकारात्मक कृतीची मागणी करायला लागतो. म्हणूनच समतेवर आधारित स्पर्धा निर्माण करण्यासाठी लोकशाही मूल्य रुजविणे बरोबरच नागरी समाजाची उभारणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

## 2.4 उपचाराची समानता विरुद्ध समान म्हणून उपचार

### Equality of treatment Vs. treatment as equals

२० व्या शतकातील इतिहासाचा अन्वयार्थ म्हणजे समानतेच्या तत्त्वाचा शोध होय. यासाठी लोकांनी लढा दिला आणि हे तत्त्व मिळवून लोकशाही दृढमूल केली. या काळात समता ही सामाजिक चळवळीतील मुख्य प्रेरणा होती. तिने युरोप खंड आला झपाटले, रशिया, चीन, क्युबा या देशातील साम्यवादी चळवळीला स्फूर्ती दिली. आफ्रिका खंडातील देशांनीही समतेचा पाठपुरावा केला आणि श्वेतवर्णीयांच्या राजकीय व आर्थिक मक्तेदारिला आव्हान दिले. अमेरिकेतही कृष्णवर्णीयांनी श्वेतवर्णीयांच्या वर्चस्वाला आव्हान देत नागरी हक्काची चळवळ उभी केली. भारतात तर ब्रिटिशांविरुद्ध स्वराज्यासाठी ची किंवा जातिभेद, उच्च निच्चता दूर करण्यासाठी समाज क्रांतीची चळवळ समांतरपणे सुरू होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वामुळे समतेच्या चळवळीला एक नवा आयाम मिळाला. या चळवळी बरोबर स्त्रियांनी स्त्रीमुक्ती चळवळीत द्वारे आपल्याला गौण लेखण्याबद्दल पुरुषांच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील वर्चस्वाला आव्हान दिले आणि पुरुषांबरोबर समान हक्कांची मागणी केली.

munotes.in

असे असले तरी वांशिक, जातीय, लैंगिक भेदभाव पूर्णता नष्ट झाले नाहीत. अमेरिकेत अद्यापि काळा-गोरा भेद भाव प्रसंगोपात्त डोके वर काढताना दिसतो. स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता समान संधी देण्याचे तत्व विधीवत सर्वमान्य झाले असले तरी केव्हा रात पूर्ण समानता आलेली दिसत नाही. भारतातही ' समतेचा हक्क' मूलभूत हक्क म्हणून मान्य केलेला असला आणि अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा मानला जात असला तरी जातीय भेदभाव आणि दलित अत्याचाराच्या घटना राजरोसपणे घडताना दिसतात. जातीभेद कोणालाही मान्य होणारा नसला तरी जातीय भावना भारतीयांच्या मनातून पार निघून गेली असे म्हणता येत नाही. जातीयतेची कीड भारतीयांच्या डोक्यात खोलवर आत शिरलेली असल्याने जातीय भेदभावाच्या घटना नित्याने घडताना दिसतात. थोडक्यात ज्या समाजात जेवढ्या प्रमाणात विषमता असेल तिथे तेवढ्या प्रमाणात न्याय मिळू शकत नाही. इतरांपेक्षा आपल्याला कमी लेखले जाते, संधी देताना भेदभाव केला जातो, अशी कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्गाची दृढ भावना होते. त्यातून उठाव होतो. विषमतेचे, भेदभावाचे शल्य समाजात दीर्घकाळ बोचत राहिल्यास, ती गोष्ट समाजाला घातक ठरते.

सामाजिक क्षेत्रातील विषमता मानवनिर्मित असते म्हणून ती दूर करण्याचे प्रयत्न माणसाने केले पाहिजेत, हे तत्व समानतेच्या संदर्भात महत्त्वाचे आहे. समता प्रस्थापित करणे याचा अर्थ कोणाही व्यक्तीला आपल्या बुद्धिमत्तेचा, विविध गुणांचा व कार्यक्षमतेचा विकास करण्यासाठी समाजाने व शासनाने संधी उपलब्ध करून देणे असा आहे. समाजातील काही घटकांना अशी संधी उपलब्ध नसेल तर त्यासाठी काही कायदेशीर उपाययोजना करणे अपेक्षित असते. परंतु हे भेदभाव विषमता नष्ट करण्याचे उपचार दुधारी शस्त्र ठरू शकते. समता प्रस्थापित करण्यासाठी सकारात्मक कृती- आरक्षण यासारखे उपचार केले जातात. त्यातून विषमतेचे बळी ठरलेल्या समूहाला विशेष संधी उपलब्ध करून दिली जाते. असे करताना जात, वर्ण, वंश, लिंग या आधारावर भेदभाव केला जातो. परंतु हा भेदभाव विषमता नष्ट करण्यासाठी केला जातो म्हणून अशा उपचाराला सकारात्मक कृती (Affirmative Action) म्हटले जाते. परंतु एका वर्गाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेली ही सकारात्मक कृती अन्य वर्गासाठी नकारात्मक कृती ठरते. संधीच्या बाबतीत अशा उपचारातून भेदभाव केला जात असल्याने, आरक्षण किंवा सकारात्मक उपचारा बाहेर असलेल्या समाज घटकाला आपल्यावर केला जाणारा अन्याय आहे असे वाटायला लागते. समानतेच्या उपचाराची पद्धती आणि आणि प्रमाण यातील संतुलन बिघडल्यास समाजात पुन्हा संघर्षाची ठिणगी पेटते आणि विषमतेच्या रेखा अधिक गडद होतात.

समतेच्या प्रस्थापनेसाठी जगातील अनेक देशात आरक्षण, सकारात्मक कृती, कोटा पद्धती इत्यादीचा वापर केला जातो. सकारात्मक कृती म्हणजे सरकार किंवा राज्याच्या धोरणाचा व पद्धतीचा असा आराखडा की जात लिंग, वंश, जात, पंथ, राष्ट्रीयता या आधारावर शिक्षण, नोकरी तसेच व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असलेल्या क्षेत्रात विशेष संधी दिली जाते. सकारात्मक कृती च्या माध्यमातून नोकरी आणि वर्तनातील असमानता दूर करणे, वंचित- अल्पसंख्यांक घटकांचे शिक्षण,

नोकरी व इतर कार्यात्मक संघटनांमध्ये प्रमाण माण वाढविणे, भूतकाळात झालेल्या चुका, हानी किंवा अन्याय दूर करणे इत्यादी उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न होतो.

ज्या देशात सकारात्मक कृतीच्या माध्यमातून विशिष्ट समूहांना विशेष वागणूक दिली जाते, सवलती, सूट किंवा पात्रतेचे निकष शिथिल केले जातात, त्यांचा उद्देश समाजातील अल्पसंख्यांक गटांना, वंचित वर्गाला त्यांच्या क्षमता ना संधी मिळण्यासाठी बहुसंख्य किंवा प्रस्थापित लोकांच्या सामाजिक, आर्थिक, संस्कृतिक व राजकीय बाबतीत समकक्ष येण्यासाठी असतो.

समतेचा नेमका अर्थ काय घ्यावा याविषयी दीर्घकाळापासून विवाद सुरू आहे . काही उदारमत वाद्यांच्या मते, कृत्रिम रित्या समानता निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास समाजाच्या जीवन पद्धती मध्ये साचेबद्धपणा निर्माण होईल. टॉकव्हिल या विचारवंताने ' डेमॉक्रसी इन अमेरिका' या ग्रंथात अशी भीती व्यक्त केली की, जर समाजात कल्पना आणि विचारांमध्ये तसेच कर्तबगारी मध्ये सारखेपणा निर्माण झाला तर मतस्वातंत्र्य आणि गुणवत्ता ही सर्वसामान्य दर्जाची मानली जाईल. अतिरेकी स्वरूपाची लोकशाही ही बहुसंख्यकांची हुकूमशाही निर्माण करू शकते. १९ व्या शतकात जॉन स्टुअर्ड मिल या उदारमतवादी विचारवंतांनी सुद्धा अशाच प्रकारची भीती व्यक्त केली होती. म्हणून त्याने उत्तम दर्जाच्या उदारमतवादी शिक्षण पद्धतीवर भर दिला. जेणेकरून समते करिता होत असलेल्या चळवळीच्या परिणामाची तीव्रता कमी होईल.

उदारमतवाद्यांमध्ये समस्येविषयी प्रामुख्याने दोन भूमिका आहेत. पहिली भूमिकाही की, प्रत्येक व्यक्ती समान असून प्रत्येकाच्या क्षमतेला संधी देण्यासाठी राज्याने व्यवस्था केली पाहिजे. या भूमिकेत स्वच्छ व न्याय्य स्पर्धा, संधीची समानता, विशेष अधिकाराचे सम पुष्टीकरण, गुणवत्तेला प्रोत्साहन इत्यादी बाबी अंतर्भूत आहेत. त्यामागील उद्देश असा की, शिक्षण आणि रोजगार क्षेत्रात क्षमता- गुणवत्ता असलेल्या व्यक्तिला प्रोत्साहन मिळणे. दुसरी भूमिका अमेरिकेतील वांशिक समतेच्या चळवळीतून पुढे आली. या भूमिकेनुसार लोकांना विकास विषयक संधी चा लाभ घेता यावा म्हणून प्रशिक्षित करणे आवश्यक आहे. असे केल्यास व्यक्तीला शिक्षणात किंवा रोजगार क्षेत्रात संधी मिळण्याची शक्यता वाढते. समते संबंधीची ही भूमिका भारतीय संविधानाने सुद्धा अधोरेखित केली आहे. ही भूमिका पहिल्या भूमिकेपेक्षा अधिक व्यापक आहे. याच भूमिकेचा आरक्षण, न्याय आधारित भेदभाव (Reverse discrimination), सकारात्मक कृती (Affirmative Action), प्रिफरेन्शियल ट्रीटमेंट,रेमिडियल ॲक्शन, कोटा सिस्टिम, कॉम्पेनसेटरी ॲक्शन इत्यादी धोरणावर पडलेला आहे.

अमेरिका आणि भारत या देशात आर्थिक प्रगतीच्या संदर्भात काही फरक असला तरी सामाजिक वैशिष्ट्यांच्या संदर्भात बरेच सामने आहे. अमेरिका बहु वांशिक देश असल्यामुळे अमेरिकेत सांस्कृतिक विविधता आहे. तसेच विविधता भारतात आहे. अमेरिकेच्या कृष्णवर्णीयांच्या गुलामगिरीचा ५०० वर्षाचा इतिहास आहे, तर भारताचा अस्पृश्यतेचा व जातिव्यवस्थेचा २५०० वर्षांचा इतिहास आहे. अमेरिका व भारत हे दोन्ही लोकशाहीप्रधान राष्ट्र आहेत. अमेरिकेत कृष्णवर्णीयांना साठी ' ॲफरमेटिव्ह ॲक्शन ' चे धोरण१९६४ पासून राबविली जाते तर भारतात आरक्षणाचे धोरण

१९०२ पासून राबविले जात असले तरी भारताच्या संविधानाच्या अंमलबजावणीनंतर राष्ट्रीय पातळीवर राबवले जात आहे. या दोन्ही देशांच्या धोरणांच्या रचनेत व अंमलबजावणी पद्धतीत फरक असला तरी त्याचे उद्दिष्ट एकच आहे व ते म्हणजे सामाजिक कारणांमुळे वगळल्या गेलेल्या समाज घटकांना प्रगतीची विशेष संधी उपलब्ध करून देणे.

१५ व्या शतकात युरोपातून अमेरिकेत गेलेल्या गौरवर्णीयांनीही स्थानिक आदिवासी जमातींना गुलाम केले, तसेच शारीरिक कष्टाची कामे करण्यासाठी त्यांनी आफ्रिकेहून मजूर आणले व त्यांनाही गुलाम केले. अशा गटांना ' नेटिव्ह अमेरिकन' ' आफ्रिकन अमेरिकन' ' हिस्पॅनिक' या नावाने संबोधले जाते. इ. स. १७७६ च्या अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात व्यक्तिस्वातंत्र्याचा उल्लेख असला तरी अमेरिकेतील वरील वर्गांची गुलामगिरी चालूच राहिली. इ. स. १८६५ मध्ये अब्राहम लिंकन यांनी कायद्याने गुलामगिरी बंद केली, तरी कृष्णवर्णीयांना प्रचंड भेदभावाला सामोरे जाणे चालूच राहिले. त्यातून १९५०-६० मध्ये अमेरिकेत ' नागरी हक्कांची' चळवळ सुरू झाली. १९६१ मध्ये राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केंनेडी यांनी ' अफरमेटिव्ह ॲक्शन हा शब्दप्रयोग प्रथम केला. तसेच समाज रोजगार संधी समिती ( Equal Employment opportunity committee) त्यांनी स्थापन केली. सकारात्मक कृती म्हणजे भूत काळातील व वर्तमान काळातील भेदभावाचा परिणाम दुरुस्त करणे व वंचित समाज घटकांचे प्रतिनिधित्व सर्व स्तरांवर वाढविणे.

१९६४ मध्ये नागरी हक्क कायदा संमत करण्यात आला; रंग, वंश, धर्म, राष्ट्र वेध इ. कारणांमुळे भेदभाव करण्यास बंदी करण्यात आली. ' रोजगार आणि शिक्षण' यासाठी सकारात्मक कृती कार्यक्रम राबविण्यात आला. ' सकारात्मक कृती' च्या धोरणाचे समर्थन करताना राष्ट्राध्यक्ष जॉन्सन म्हणतात, " भेदभाव नष्ट करण्यासाठी केवळ नागरी हक्क कायदा पुरेसा नाही" "You can not wipe scars of centuries by saying 'now you are free to go where you want, do as you desire.' You do not take a man who for years has been hobbed by chains, liberate him, bring him to the starting line of a race saying, 'you are free to compete with all others and still justify believe you have been completely fair. This is the next and more profound stage of the battle for civil rights. We seek not just freedom but opportunity, not just legal equality but human ability, not just equality as right and a theory but equality as a fact and as a reality."

याच काळात ' समान रोजगार संधी आयोग' स्थापन करण्यात आला. १५ पेक्षा जास्त कर्मचारी असणाऱ्या आस्थापनात ' सरकारी कंत्राट असो व नसो, रोजगार देताना भेदभाव करण्यास बंदी करण्यात आली. सरकारी कंत्राटदाराने अल्पसंख्यांक गटांना सामावून घेण्यासाठी ' सकारात्मक कृती' करावी असे आदेश देण्यात आले. १९६५ मध्ये अमेरिकेतील मजूर खात्यात ' फेडरल कॉन्ट्रॅक्ट कंप्लायंस प्रोग्रॅम' विभाग स्थापन करण्यात आला व सरकारी आदेशाच्या अंमलबजावणीची जबाबदारी या विभागास देण्यात आली. इ.स. १९६९ मध्ये राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी अल्पसंख्यांकांचे प्रमाण उद्योग-व्यवसायात, रोजगारात वाढवण्यासाठी उद्योगांनी ' उद्दिष्टे व

munotes.in

वेळापत्रक' तयार करावे असे आदेश दिले. इ.स. १९७१ मध्ये महिलांचा समावेश ' सकारात्मक कृतीत' करण्यात आला. १९७८ मध्ये 'कॅलिफोर्निया विद्यापीठ विरुद्ध ॲलन बॅक' या खटल्यातील महत्त्वपूर्ण निकालात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की, ' विद्यापीठात प्रवेश देताना ' वंश' हा घटक लक्षात घेऊन प्रवेश देणे चूक नाही, परंतु कोटा पद्धत घटनाबाह्य आहे. या काळात अमेरिकेत ' सकारात्मक कृतीच्या' या धोरणाला विरोध सुरू झाला. १९९५ साली राष्ट्राध्यक्ष क्लिंटन यांनी म्हटले की, "Mend it, don't end it." ते ते म्हणाले, " Affirmative action is in the national best interest, to create more inclusive society that provide genuine equality of people"

अमेरिकेत इ.स. २००० पासून ' समान संधी पहाणी अहवालाची' प्रक्रिया सुरू झाली. सर्व उद्योगाना, प्रत्येक वर्षी आपल्या उद्योगातील कर्मचाऱ्यांची माहिती ( वंश, रंग, लिंगभेद) श्रम खात्याला कळविण्याचे बंधन घालण्यात आले. २००३ मध्ये मिशिगन विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रिया बद्दल अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की, " विद्यार्थ्यांना प्रवेश देताना इतर बाबींबरोबरच वंश हा घटक लक्षात घेणे घटनाबाह्य नाही.

अमेरिकेत सकारात्मक कृतीच्या संदर्भात इतर अटी अशा आहेत-

१) व्यवसायाच्या ठिकाणी भेदभावाला बंदी व समान रोजगार संधी असल्याचा फलक लावण्याचे बंधन.

२) नोकर भरतीच्या जाहिराती मध्ये ' समान संधी दिली जाईल' असा स्पष्ट उल्लेख करण्याचे बंधन

३) उमेदवारांची कागदपत्रे जपून ठेवण्याचे बंधन

४) उमेदवाराकडून भेदभावाची तक्रार आली तर आयोगाला चौकशीचा अधिकार

५) दरवर्षी कर्मचारी वर्गीकरणाचा अहवाल पाठविण्याचे बंधन

अमेरिकेच्या ह्या ' सकारात्मक कृती' धोरणामुळे तेथील रोजगार शिक्षण आणि इतर क्षेत्रावर परिणाम पडलेला दिसून येतो. यामुळे प्रत्येक क्षेत्रात कृष्णवर्णीय अल्पसंख्यांक स्थानिक समूह यांचे सहभागाचे व प्रतिनिधित्वाचे प्रमाण वाढलेले आहे. भारतात सुद्धा गेल्या ७० वर्षांपासून आरक्षणाचे धोरण राबविले जात आहे. अमेरिकेचे सकारात्मक कृती चे धोरण खाजगी क्षेत्रातील नोकऱ्यांना लागू आहे. भारतात मात्र आरक्षणाचे धोरण सरकारी क्षेत्रातील नोकऱ्यांनाच लागू आहे. भांडवलशाहीच्या जागतिकीकरण व खाजगी करणाच्या प्रक्रियेमुळे सरकारी नोकर यांचे क्षेत्र आकुंचन पावत आहे. त्यामुळे जिथे रोजगारच नाही, तेथे आरक्षणाच्या धोरणाला अर्थच उरत नाही. म्हणूनच भारतात खाजगी क्षेत्रातील आरक्षणाची मागणी होत आहे.

जगातील बहुसंख्य देशात सकारात्मक कृती चे धोरण वेगवेगळ्या नावाने अमलात आणले जात आहे. आणि ही सकारात्मक कृती सामाजिक दृष्ट्या वंचित, ऐतिहासिक दृष्ट्या अन्याय झालेल्या संपूर्ण गटासाठी राबविले जाते. आर्थिक परिस्थिती हा या धोरणाचा आधार नसतो.

असे असले तरी समानतेच्या हक्कासाठी विषमतेची वागणूक देणाऱ्या या सकारात्मक कृती धोरणावर टीका सुद्धा केली जाते. या धोरणाची विरोधक असा तर्क देतात की, हे धोरण उलट भेदभावाचा एक प्रकार आहे. सकारात्मक कृती धोरण व्यक्तीच्या पात्रतेचे ऐवजी सामाजिक पात्रतेच्या आधारावर संधी दिली जाते, त्यामुळे वास्तव कर्तुत्वाचे अवमूल्यन होते. जुन्या चुकांच्या जागी नवीन चुका केल्या जातात. असे धोरण सकारात्मक कृतीच्या लाभार्थ्यांचे ही कर्तुत्व कमी करते. तसेच या धोरणाचा लाभ घेण्यासाठी मागास नसलेले सामाजिक गट लाभार्थी गटात जाण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे समूह- समूहात संघर्ष निर्माण होतोच. गट आपल्या राजकीय प्रभुत्वा च्या जोरावर खऱ्याखुऱ्या वंचित समूहाचे लाभ मिळवून घेतात. त्यामुळे हे धोरण फसवणुकीची संधी निर्माण करते.

सकारात्मक कृतीची आणखी टीका अशिकी सकारात्मक कृतीचा लाभ घेणारे लक्षित गट निश्चित झाल्यानंतर इतर सक्षम, पात्र घटकांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय फायद्यापासून वंचित ठेवले जाऊ शकते. तसेच आरक्षित गटात असलेल्या व्यक्ती असा निष्कर्ष काढू शकतात की कठोर परिश्रम करणे अनावश्यक आहे. आणि ज्यांना फायदा मिळत नाही त्यांना कठोर परिश्रम करणे व्यर्थ वाटू शकते.

वागणुकीची समानता विरुद्ध समान म्हणून वागणूक या बाजूने जो तर्क दिला जातो. यात तथ्य नाही असे म्हणता येणार नाही. जगातील सर्व देशात सकारात्मक कृती धोरणाच्या विरोधाचा सामना करावा लागत आहे. भारतासारख्या देशात जेथे सरकारी रोजगाराच्या संधीच मुळी कमी आहे तेथे अशा धोरणाच्या विरोधाची तीव्रता जास्त आहे. परंतु तरीही यामुळे सकारात्मक कृतीचे धोरणाचे महत्त्व कमी होते असे नाही. लोकशाही जिवंत ठेवणारे ‘ समता’ हे एक मूल्य आहे. समता केवळ नागरी हक्क समान दिल्याने निर्माण होत नाही. वंश, रंग, जात, धर्म, लिंग या आधारावर जे विकासापासून वंचित राहिलेले समूह आहेत त्यांना शिक्षण, रोजगार, आरोग्य, जमीन, उद्योग इ. ठिकाणी किती प्रतिनिधित्व व संधी मिळते हे तपासणे आवश्यक ठरते. आणि उचित प्रतिनिधित्व मिळत नसेल तर ‘ सकारात्मक कृती’ धोरणाची कडक अंमलबजावणी करून सामाजिक न्यायाच्या आधारावर समता निर्माण करणे आवश्यक ठरते.

## 2.5 संसाधनांची समानता आणि परिणती : (Equality of resources and outcome)

संसाधनांची समानता हा मुद्दा मुख्यतः आर्थिक समतेशी संबंधित असून, त्यात समाजाच्या विविध घटकांपर्यंत विकासाचे फायदे पोहचविणे अपेक्षित आहे. रोजगाराच्या संधी, दारिद्रय निर्मूलन, आर्थिक विषमता दूर करणे, समाजातील सर्व घटकांचे जीवनमान उंचावणे इत्यादी गोष्टी संसाधनाचे समान वितरण करण्यावर अवलंबून आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत समाजातील मूठभर लोकांनाच फायदा न होता ग्रामीण व तळागाळातील सर्व लोकांना झाला पाहिजे. त्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न, नैसर्गिक साधन संपत्ती याबरोबरच दळणवळणाची साधने, शिक्षण,

munotes.in

आरोग्य, पाणी, शेत जमीन, अन्न वस्त्र निवारा इत्यादी सर्व संसाधने समाजातील सर्व घटकात समान रीतीने वितरित होणे म्हणजे संसाधनाची समानता.

मानवी समाजात जेव्हा पासून ' संपत्ती' या स्वरूपात संसाधनाचा जन्म झाला तेव्हापासून, या संसाधनाचे वितरण कसे करावे? हा प्रश्न अजून पर्यंत सुटलेला नाही. समाजातील काही लोक कमी काम करून ( काही काम न करताही) पैसा कमावतात. त्यामुळे समाजातील साधनसंपत्तीचे विशिष्ट वर्गाकडे केंद्रीकरण होते. त्याचा परिणाम असा होतो की, समाजातील बहुसंख्य लोक भरपूर कष्ट करूनही त्यांना आपल्या मूलभूत गरजा भागवता येत नाही. त्यांना साधनवंचित- कफल्लक दारिद्र्यात जीवन जगावे लागते. समाजातील अशा असंतुलित साधनसंपत्तीच्या वितरणा मुळे समाज जीवन बेरोजगारी, दारिद्र्य, अनारोग्य, अशांतता, गुन्हेगारी अशा दृष्टचक्रात संपूर्ण समाज अडकतो. तात्पर्याने सुख आणि शांत जीवनाला पारखा होतो. म्हणून खऱ्या अर्थाने मानवी जीवन सुखी, समृद्ध व सुव्यवस्थित होण्यासाठी संसाधनांचे समान वितरण होणे आवश्यक असते.

प्रत्येक राष्ट्रातील समाजामध्ये संपूर्ण समाज एक सारख्या स्तरांमध्ये जीवन व्यतीत करत नसतात. अर्थात समाजामध्ये श्रीमंत, मध्य व गरीब असे ढोबळमानाने तीन स्तर असतात. या तिन्ही स्तरांमध्ये जीवनमान, राहणीमान, सुख सुविधा, आर्थिक विकास यामध्ये समानता नसते. यामध्ये समानता नसण्याचे कारण जीवन जगण्यासाठी आवश्यक संसाधनाचे विषम वाटप हे असते. समाजातील या तीन स्तरांमध्ये प्रचंड खायी असेल तर समाजात गंभीर प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे समाजाच्या संतुलित विकासासाठी संसाधनाच्या वाटपाचा प्रश्न हा मुख्य प्रश्न आहे. हा प्रश्न सोडविण्याचे जगातील निरनिराळ्या देशात प्रचलित असलेल्या दोन पद्धती आहेत. त्या म्हणजे भांडवलशाही व साम्यवादी अर्थव्यवस्था. भांडवलशाही व समाजवाद यामध्ये सुवर्णमध्य साधणारी आणखी एक अर्थव्यवस्था ' मिश्र अर्थव्यवस्था' प्रचलित आहे. मिश्र अर्थव्यवस्थेत भांडवल शाही तील मक्तेदारीचे प्राबल्य टाळले जाते. तसेच साम्यवादातील सरकारचाअनिर्बंध हस्तक्षेपही टाळला जातो. मुक्त वातावरण, वैयक्तिक स्वातंत्र्य, खाजगी उत्पादन, नफ्याची प्रेरणा ह्या गोष्टींवर सरकारचे प्रभावी नियंत्रण, उत्पादनात सरकारचा सहभाग इत्यादी तत्वांची जोड दिली जाते. स्वतंत्र भारताच्या नेहरू सरकारच्या भूमिकेत मिश्र अर्थव्यवस्थेचा संदर्भ सापडतो. परंतु भारताने १९९१ च्या नव्या आर्थिक धोरणाद्वारे मिश्र अर्थव्यवस्थेच्या धोरणाला तिलांजली दिलेली दिसते.

संसाधने वाटपाच्या संदर्भात भांडवलशाही, साम्यवादी अर्थव्यवस्थेची भूमिका व तिच्या मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे.

**भांडवल शाही तील संसाधनांचे वाटप आणि तिची परिणीती:-**

प्रा. पिगु यांच्या मते " ज्या अर्थव्यवस्थेत भौतिक संसाधनाची माणकी किंवा त्यांचा वापर करण्याचा अधिकार काही विशिष्ट व्यक्तींच्या हातात असतो व त्यांच्या इच्छेनुसार साधनांचा वापर केला जातो, त्या अर्थव्यवस्थेला भांडवलशाही अर्थव्यवस्था म्हणतात."

जी. डी. एच कोल च्या मते, " लाभाच्या हेतूने केल्या जाणाऱ्या उत्पादनाला शी संबंधित भांडवलवाद अशी प्रणाली आहे की, ज्यामध्ये उत्पादनाची साधने व सामग्री ह्यावर खाजगी मालकी असते व उत्पादनाचे कार्य मुख्यतः भाडोत्री श्रमा द्वारे केले जाते. उत्पादन मात्र भांडवलदारांच्या मालकीचे असते."

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत प्रत्येक व्यक्ती आपल्या इच्छेनुसार व शक्तीनुसार खाजगी संपत्ती प्राप्त करू शकतो, तिचा उपभोग घेऊ शकतो. उत्पादन प्रक्रियेत सरकारचा कोणताही हस्तक्षेप नसतो. मागणी आणि पुरवठा च्या द्वारे बाजार यंत्रणा चालते. भांडवल वादात व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित राहते. उपभोग, उत्पादन, बचत, गुंतवणूक इत्यादीबाबत निर्णय घेऊन ते अमलात आणणे हे व्यक्तीवर अवलंबून असते. यातून मुक्त स्पर्धा निर्माण होऊन जो सर्वात प्रबळ असतो तोच टिकतो. त्यामुळे विविध संसाधनांचे अधिकाधिक कार्यक्षमतेने वितरण होते. उत्पादकतेत वाढ, संसाधनांच्या कार्यक्षमतेने व प्रभावीपणे वापर करण्यासाठी तंत्रज्ञानाचा विकास, नफ्याच्या प्रेरणेमुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास व शेवटी लोकांच्या राहणीमानाच्या स्तरात ही वाढ होते. म्हणजे या पद्धतीत सामाजिक कल्याणाचे कोणतेही उद्दिष्ट स्वीकारले नसताना व संसाधनाचे समान वितरण करण्याचे नियोजन नसताना या पद्धती सामाजिक कल्याण साधले जाते व संसाधनांचे योग्य वितरण होते, असा भांडवल वाद समर्थकांचा दावा असतो.

भांडवलशाही अर्थव्यवस्था समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय या मूल्यांशी अधिक जुळणारी व व्यक्तिस्वातंत्र्याचे पोषण करणारी व्यवस्था असली तरी संसाधनांचे समान वाटप आणि त्याच्या परिनीतीचा विचार करतासमाजातील दुर्बल घटकांसाठी अतिशय अन्याय्य व्यवस्था ठरली आहे. भांडवलशाहीत साधनसंपत्तीचे मूठभर लोकांच्या हातात केंद्रीकरण होते व असंख्य श्रमिकांना संसाधनांचा फार छोटा भाग मिळतो. व्यापक, फायदा होत जाणारी आर्थिक विषमता हा भांडवलशाहीचा अंगभूत दोष आहे. हे भांडवलशाहीत सुशिक्षित, कुशल व संघटित कामगार वर्ग हा सुखासीन आयुष्य जगत असलेला दिसत असला तरी कामगार वर्गातील बहुसंख्य श्रमिक, कुशल व असंघटित कामगार त्यांची पिळवणूक होऊन कंगाली चे, दारिद्र्याचे व कफल्लक जीवन जगण्यास बाध्य केले जाते. भांडवलशाहीत सामाजिक कल्याणाची उपेक्षा केली जात असल्यामुळे देशातील साधनसंपत्तीचे न्याय्य वितरण होत नाही.

भांडवलशाहीत ज्या वस्तूंचा उत्पादनातून जास्त नफा मिळेल त्याच वस्तूंचे उत्पादन केले जाते. अल्पसंख्य वैभव संपन्न लोकांकडे प्रमाणाबाहेर खरेदी शक्ती निर्माण झालेली असते. त्याचा परिणाम म्हणून अनावश्यक चैनीच्या वस्तू व सेवा निर्माण करण्यावर भर दिला जातो. सर्वसामान्य लोकांना दैनंदिन जीवन जगण्यास आवश्यक असलेल्या वस्तूंचा तुटवडा निर्माण होतो. चैनीच्या वस्तूंची बाजारात रेलचेल असते परंतु दुसरीकडे बहुसंख्य गरीब- श्रमिक वर्गाची क्रयशक्ती कमी असल्याने त्यांना आपल्या दैनंदिन गरजा भागवणे ही कठीण जाते. मार्क्सने म्हटल्याप्रमाणे, " भांडवलशाहीतील उत्पादनाचे स्वरूप असे आहे की, ज्यात श्रमिक आपल्या आश्रमापासून पारखे होतात. त्यांना उत्पादनाच्या प्रक्रियेत रस राहत नाही नाही तसंच उत्पादित वस्तू मध्येही रस राहत

नाही. काम करांची एकंदर आर्थिक हालचाल ही भकास आणि कंटाळवाणे दिनक्रमाचाच एक भाग होतो." दीडशे वर्षापूर्वी मार्क्सने कामगार वर्गाच्या परिस्थितीचे केलेले हे वर्णन आजच्या जागतिकीकरणाच्या बदलत्या परिस्थितीतही यात बदल झाला आहे असे वाटत नाही.

भांडवलशाही संसाधनांची समान वितरण करण्यास अपयशी ठरण्याची आणखी एक कारण म्हणजे मुक्त स्पर्धा ही अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे लक्षण मानले जाते. या मुक्त स्पर्धेत समाजाला ' ग्राहक समाज म्हणून रूपांतरित केले जाते. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी मोठ्याप्रमाणात उत्पादन वाढविले जाते. त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीची प्रचंड नासधूस होते. पर्यावरणाचे संतुलन बिघडते. या उत्पादनाच्या प्रक्रियेत कोणतीही हिस्सेदारी नसलेला, तिच्या लाभापासून वंचित असलेल्या गरीब-साधनवंचित समाजाला विस्थापित स्थलांतरिताचे जीवन जगण्यास बाध्य केले जाते.

सुधारलेल्या भांडवलशाही देशात सामान्य माणसाचे जीवन मान उंचावलेले दिसत असले तरी भांडवल शाही ही एक असमाधानकारक, संसाधनाच्या वाटपा बाबतीत विषमता निर्माण करणारी आणि वैफल्य निर्माण करणारी व्यवस्था मानली जाते.

**कम्युनिस्ट व्यवस्थेतील संसाधनाचे वाटप आणि परिणती**

डिफीन्सन यांच्या मते, " समाजवाद हे समाजाचे असे आर्थिक संघटन आहे कि, यामध्ये सामान्य आर्थिक योजनेच्या दृष्टीने उत्पादनाची भौतिक साधने संपूर्ण समुदायाच्या मालकीचे असतात आणि अशा समानीकृत नियोजित उत्पादनाच्या लाभाचे समान आधारावर सर्व नागरिक अधिकारी असतात."

प्रो. वेब्स यांच्या मते, " समाजवाद म्हणजे अशी आर्थिक व्यवस्था होय की, ज्यामध्ये उत्पादनाच्या संसाधनावर खाजगी मालकी आणि नियंत्रणा ऐवजी संपूर्ण समाजाची मालकी व नियंत्रण असते."

प्रो. मॉरीस यांच्या मते, " समाजवादाची खास वैशिष्ट्य म्हणजे सर्व मोठे उद्योग व संपूर्ण भूमीवर सार्वजनिक- सामूहिक स्वामित्व असले पाहिजे आणि त्याचा उपयोग व्यक्तीगत लाभा ऐवजी सार्वजनिक हितासाठी केला पाहिजे."

समाजवादाच्या संदर्भात विचारवंताच्या वरील व्याख्यांचा अर्थ लक्षात घेतल्यास कम्युनिस्ट किंवा समाजवादी व्यवस्थेत ' संसाधनांचे समान वाटप करणे' हे मुख्य उद्दिष्ट असते. वस्तू व सेवा यांचे उत्पादन आणि वितरण हे सरकारच्या हाती असल्याने आर्थिक विषमता व शोषणाला वाव नसतो. आर्थिक समानता निर्माण करण्यास हेतुपुरस्कर प्रयत्न केला जातो. समाजवादी अर्थव्यवस्थेचे महत्वाची वैशिष्ट्य म्हणजे व्यक्तीचा खाजगी मालकीचा हक्क अमान्य केलेला असतो. त्यामुळे समाजातील संपत्तीचे केंद्रीकरण मूठभर लोकांकडे होत नाही. त्यामुळे विकासाची समान संधी सर्वांना उपलब्ध होते. या व्यवस्थेत पात्रतेनुसार सर्वांची कल्याण अभिप्रेत असते. कोणताही भेदभाव न करता सर्वांना रोजगार, शिक्षण, आरोग्य सुविधा, दळणवळण, पाणी इ. सर्व साधनांवर सामूहिक मालकी असल्याने गरजेनुसार व पात्रतेनुसार ती सगळ्यांना उपलब्ध करून दिली जाते. शोषणाचे व अन्यायाचे मूळ असलेल्या खाजगी संपत्तीचे उच्चाटन झाल्यामुळे समाजात मालक मजूर, भांडवलदार

munotes.in

कामगार, शोषक-शोषित असे वर्ग शिल्लक राहत नाही. त्यामुळे वर्ग संघर्ष संपुष्टात येतो. समाजात शांतता व सुव्यवस्था नांदते.

समाजवादी अर्थव्यवस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ' नियोजित विकास'. उत्पादनाची मालकी व त्याचे वितरण करण्याची जबाबदारी सरकारची असते. त्यामुळे केंद्रीय सत्तेकडे सत्ता अधिक केंद्रित होते. नफा प्राप्त करण्यासाठी उत्पादन होत नाही तर जनकल्याणासाठी उत्पादन केले जाते. त्यामुळे कोणत्या वस्तूचे? किती? किती कालावधीत करावे? याचा विचार करण्यासाठी नियोजन आवश्यक असते. त्यासाठी योजना आखणे, त्याची अंमलबजावणी करणे, संसाधनांचे विविध पर्यायी उपयोगांमध्ये वितरण करणे हे नियोजनाचे उद्दिष्ट असते. म्हणून समाजवादी अर्थव्यवस्थेत नियोजन आवश्यक अंग मानले जाते.

भांडवलशाही पद्धतीशी तुलना करता कम्युनिस्ट अर्थव्यवस्थेत संसाधनाचे समान वितरण होते, त्यामुळे या व्यवस्थेत विषमतेचे प्रमाण कमी असते. की संसाधन व उत्पादनावर सामूहिक मालकी असल्याने, उत्पादन समाजाच्या गरजा लक्षात घेऊन केले जात असल्याने आवश्यक वस्तू सर्वांना उपलब्ध होतात. श्रमाचा योग्य मोबदला मिळतो. तिची मंदीच्या चक्रापासून जनतेचे संरक्षण होते, व्यक्तिगत स्वातंत्र्यापेक्षा समतेवर अधिक भर कम्युनिस्ट व्यवस्था देते, त्यामुळे सहाजिकच समाजात सर्वच क्षेत्रात समतेचे तत्त्व प्रस्थापित होते, मात्र तिच्या परिणती चा विचार करता समाजवादी पद्धती भांडवलशाही व्यवस्थे प्रमाणेच निराशाजनक ठरली आहे.

समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादनाच्या साधनांवर सार्वजनिक म्हणजे सरकारची मालकी असते. म्हणजेच आधीच राजकीय सत्ता असलेल्या राज्यकर्त्यांकडे आर्थिक सत्ता देखील केंद्रीत होते. अशा स्थितीत व्यक्ती स्वातंत्र्या वर मर्यादा पडतात. व्यक्तिस्वातंत्र्य संपुष्टात आल्यामुळे संपत्ती मिळविणे, भांडवलाची उभारणी, गुंतवणूक, खरेदी-विक्री इत्यादीबाबत व्यक्ती निर्णय घेऊ शकत नाही. समाजवादी व्यवस्थेत उत्पादन आणि वितरण व्यक्तिगत हितासाठी उपयोगात आणले जात नाही. त्यामुळे लोकांची आर्थिक प्रेरणा नष्ट होते. उत्पादन प्रक्रियेत प्रेरणांचा अभाव असल्यामुळे उत्पादनाच्या रचनेत बदल घडून येणे शक्य नसते. समान उत्पादन- समान वितरण यामुळे कुठेच नाविन्य राहत नाही. जीवन रटाळ व कंटाळवाणे बनते. समानता म्हणजे सर्व क्षेत्रात सर्व ठिकाणी सारखेपणा असा नकारात्मक अर्थ ' समता' या मूल्यांना प्राप्त होतो. त्यामुळे उत्साह व आनंदाला मर्यादा पडतात. मनोवैज्ञानिक दृष्टीने अशा बाबी व्यक्ती विकासाला पर्यायाने समाज विकासाला मारक ठरतात. ज्या ठिकाणी कार्यामध्ये लाभाचे उद्दिष्ट असते तेथे कार्य अधिक कार्यक्षमतेने व उत्साहाने केले जाते. परंतु समाज वादात एकूणच सर्व कार्य ठोकळे वजा, यांत्रिक पद्धतीने होते. त्या मागे मानवी प्रेरणा व भावनांचा अभाव असतो. उत्पादन वाढो अथवा कमी होवो, याची काळजी व्यक्ती करत नाही. त्यामुळे मनुष्य आळशी व कामचुकार बनतो. अशी संख्या वाढली तर एकूण उत्पादन वाढीवर त्याचा वाईट परिणाम होतो. कार्ल मार्क्स भांडवलशाहीचा दोष म्हणून, " भांडवल शाही उत्पादनाच्या बाबतीत मजूर हे उदासीन राहतात कारण उत्पादित वस्तूत त्याचा रस राहत नाही तसाच उत्पादन प्रक्रियेतून ज्याचे उत्पादन होते त्या प्रक्रियेबद्दल ही त्याला आस्था नसते." असा जो उल्लेख

केला, तसाच दोष समाजवादी व्यवस्थेत सुद्धा निर्माण होतो. समाजवादी उत्पादन व्यवस्थेतही मजुरांची अलगतेची भावना तशीच कायम राहते . कामगार वर्गाचे खाजगी मालकी तुन सार्वजनिक मालकीच्या उत्पादन प्रक्रियेत स्थलांतरण होते. पिळवणूक अन्याय शोषणाची मात्रा तशीच कायम राहते.

रशियात १९२८ ते १९८८ या काळात कम्युनिस्ट पक्षाची हुकूमशाही असलेले समाजवादी सरकार सत्तेवर होते. या काळात मोठाले उद्योग उभे करण्यासाठी लावलेल्या मजुरांना अर्धपोटी ठेवून जेमतेम जगण्या पुरते अन्न दिले जात होते. ' गुंतवणुकीसाठी लागणारी बचत' असे त्याला गोंडस नाव दिले गेले. शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना कसलेही स्वातंत्र्य नव्हते. सरकार जे सांगेल ते पेरणे त्याला भाग पडे. परिणामी अन्नधान्याची टंचाई निर्माण होई. ती घालवण्यासाठी तेल निर्यात करून अन्नधान्याची आयात करावी लागेल. घराची रचना एकसारखी परंतु त्याचीही कमतरता. एकाच अपार्टमेंटमध्ये बऱ्याच कुटुंबांना राहावे लागे. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाकडे पहिल्यापासूनच दुर्लक्ष झाले होते. त्यामुळे अनेक उपभोग्य वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला. ्या मिळवण्यासाठी न संपणाऱ्या रांगेत उभे राहावे लागे. निरंकुश राज्यसत्ता, कठोर लाचखोर नोकरशाही, ढासळलेली अर्थव्यवस्था यातून मार्ग काढण्यासाठी १९८८ मध्ये राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव यांनी भांडवलशाही तत्त्वांचा स्वीकार करून समाज व अर्थव्यवस्थेची पुनर्रचना केली. १९९१ साली रशियात उदारमतवादी सरकार सत्तेवर आले. आणि भांडवलशाहीची प्रक्रिया आणखी गतिशील झाली. सार रूपाने असे म्हणता येईल की साम्यवादी अर्थव्यवस्थेत संसाधनांवर सामुहिक मालकी ठेवूनही संसाधनांचे समान वितरण करण्याचा प्रश्न सुटू शकला नाही.

भांडवलशाही उर्फ उदारमतवादी लोकशाही विचारसरणी आणि साम्यवादी विचारसरणी या दोन विचारधारेच्या परस्परविरोधी संघर्षात समता आणि स्वातंत्र्य मूल्यांची नव्याने मांडणी करण्याची गरज निर्माण झाली. ती गरज जॉन रॉल्सने मांडलेल्या नवउदारमतवादाने अंशतः पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. रॉल्सने स्वातंत्र्य आणि समता मूल्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. रॉल्स पूर्ण समता निर्माण करण्यास विरोध करतो व मर्यादित प्रमाणात समता निर्माण करावी असे म्हणतो. कारण त्याच्यामध्ये पूर्ण समता असलेल्या समताधिष्ठित समाजात व कार्यक्षमतेचे मोठ्या प्रमाणात अस्तित्व असते. म्हणून तो म्हणतो की समाजातील वंचित व मागासलेल्या लोकांना जीवनमान उंचावण्याची खात्री असेल तर अशी असमानता किंवा विषमता देखील योग्य असते. नैसर्गिक विषमतेच्या तत्त्वामुळे समाजात विषमतेचे तत्त्व अस्तित्वात असणे अपरिहार्य असते. परंतु ही विषमता दुर्बलांच्या शोषणास कारणीभूत ठरू नये यासाठी समाजातील क्षमता वाण आणि बुद्धिमान वर्गाने समाजातील मागासलेल्या व गरीब वर्गातील लोकांचे जीवनमान बदलविण्याचा प्रयत्न करावा.

### साधनसंपत्तीचे न्याय्य वाटप

उत्पादन आणि साधनसंपत्तीचे न्याय्य वाटप हा कोणत्याही नागरी समाजामध्ये मोठा बिकट व गुंतागुंतीचा प्रश्न असतो. समाजात उपलब्ध साधन सामग्री ही मर्यादित असते. ही साधन संपत्ती ची

munotes.in

हाव काही लोकांना असते. स्वार्थी प्रवृत्तीचे प्रस्थापित व प्रबळ लोक समाजातील साधनसंपत्तीवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करतात. साधन संपत्तीचे केंद्रीकरण होऊ नये यासाठी शासनाने पुढाकार घ्यायला पाहिजे असे जॉन रॉल्य प्रतिपादन करतो. साधनसंपत्तीचे न्याय्य वाटप करत असताना न्यायाच्या दोन तत्त्वांचे कटाक्षाने पालन केले पाहिजे. एक म्हणजे साधन संपत्तीचे वाटप करताना सर्वांचे हित लक्षात घेतले पाहिजे. आणि दुसरे न्याय तत्व म्हणजे संसाधन वाटपाची सुरुवात समाजातील सर्वात उपेक्षित व कमकुवत घटकापासून केली पाहिजे. सुव्यवस्थित समाजातील प्रत्येक व्यक्ती न्यायाच्या तत्त्वाला मान्यता देतील आणि त्यानुसार वागतील म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्ती न्याय तत्त्वाचे पालन करेल. आपले हित साधले जाईल अशी प्रत्येक व्यक्तीला खात्री होईल, त्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या मनातील भीती आणि संघर्षाची भावना नष्ट होईल. अशी न्यायाधीश टीत राजकीय व्यवस्था जबाबदार लोकप्रतिनिधीक शासनामध्येच शक्य आहे. अर्थात आत्मकेंद्री वा स्वार्थी मानवी स्वभावामुळे समाजात स्पर्धा, संघर्ष आणि भीती चे अस्तित्व शिल्लक राहणार. शा परिस्थितीत विघातक प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाला दंड शक्तीचा वापर करण्याची आवश्यकता भासेल. म्हणून हे काम जबाबदार घटनात्मक प्रतिनिधिक सरकारच पूर्ण करू शकते. हुकूमशाही किंवा एकाधिकारशाही असलेल्या शासन व्यवस्थेत न्यायधिष्टीत समाजाची स्थापना करणे शक्य नाही असे रॉल्स चे म्हणणे होते.

जॉन रॉल्स प्रणित सिद्धांताचे फलित हेच वाटते की, कोणत्याही राजकीय व्यवस्थेत मुठभर वर्गाकडे संपत्तीचे केंद्रीकरण करून आणि बहुसंख्यांक दुर्बल वर्गाला दारिद्र्याच्या खाईत लोटून कोणताही समाज सुव्यवस्थित व सुखी राहू शकत नाही. तसेच सर्व प्रकारची विषमता नष्ट करण्यासाठी व्यक्ती स्वातंत्र्याचा बळी देऊन चैतन्यहीन समता प्रधान समाज सुद्धा सुखी व आनंदी जीवन जगू शकत नाही. त्यासाठी राज्य व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. की ज्यात स्वातंत्र्याचा हक्क सर्वांना समान असेल. आणि अशी सामाजिक आणि आर्थिक विषमता न्याय्य मानता येईल की ज्यात समाजातील वंचित व उपेक्षित वर्गाला लाभ मिळणार असेल. समाजातील संशोधनाचे वाटप करताना, संसाधनांच्या वाटपाची सुरुवात वंचित व उपेक्षित वर्गापासून करावी लागेल. सामाजिक व आर्थिक व्यवहारात त्यामुळे विषमता होत असताना दिसत असली तरी ही विषमता सर्वांना फायदेशीर राहणार.

## सारांशत:

संसाधनाचे समान वाटप व त्याची परिणती याचा विचार करता पूर्णपणे खुली ( भांडवलशाही) व्यवस्था आणि पूर्णतः बंदीस्त( साम्यवादी) व्यवस्था ही संसाधनाची समान वितरण करण्याच्या सुयोग्य उद्दिष्टापर्यंत जाऊ शकत नाही. वरील विवेचनावरून याबाबतीत हे दोन्ही व्यवस्थेचे अपयश लक्षात येते. संसाधनाचे संमेक या समान वितरण हे अशाच राजकीय व्यवस्थित होऊ शकते जिथे कर्तव्यदक्ष, विवो समाज व्यवस्था असेल. " राजकीय लोकशाहीची सामाजिक व आर्थिक लोकशाहीत रूपांतर होणारी लोकशाही" डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिपादन केलेल्या अशा लोकशाही व्यवस्थेतच

खऱ्या अर्थाने सम्यक पद्धतीने संसाधनाचे समान वितरण होऊ शकते. त्या दिशेने सध्याच्या नागरी समाजाचे पाऊले पडणे आवश्यक आहे.

## संदर्भ


१) भोळे भास्कर लक्ष्मण; राजकीय सिद्धांत, पिंपळापुरे प्रकाशन नागपूर-२००८

२) लिजारे रा. अं., पेशवे व. मा. ; आधुनिक राजकीय सिद्धांत; श्री मंगेश प्रकाशन; नागपूर, १९७९

३) पाटील महेंद्र : विसाव्या शतकातील राजकीय विचारप्रवाह; डायमंड पब्लिकेशन्स; पुणे- २०१८

४) तारकुंडे व्ही. एम., कर्णिक द्वा. म. (अनु); मूलगामी मानवतावाद; श्रीविद्या प्रकाशन; पुणे-१९८५

५) जावडेकर शरद, वसुधा जोशी, लता जाधव, रवींद्र म्हसदे ( संपा); सामाजिक परिवर्तन चिकित्सा आणि भवितव्य; सुगावा प्रकाशन, पुणे- २००९


**आपण काय शिकलो?**

प्र. १ ला समता ही संकल्पना स्पष्ट करून समता संकल्पनेचे मूल्यमापन करा.

प्र. २ रा समतेचे विविध प्रकार लिहा.

प्र. ३ रा 'उपचाराची समानता विरुद्ध समांन म्हणून उपचार' या घटकावर निबंध लिहा

प्र. ४ था संसाधनांची समानता व परिणती ही संकल्पना स्पष्ट करा

**टिपा लिहा**

१. समता

२. संसाधनांची समानता

३. उपचाराची समानता

४. सामाजिक समता

५. आर्थिक समता

६. राजकीय समता

७. समतेवर आधारित समानता

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

घटक ३

# ३

# न्याय (Justice)

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ न्याय म्हणजे काय

३.३.१ न्यायाचा अर्थ आणि न्यायाचे प्रमुख प्रकार (Meaning and types)

३.४ जॉन रॉल्सचा सामाजिक न्यायाचा सिद्धांत

३.५ रॉबर्ट नॉझिकचा सामाजिक न्यायाचा सिद्धांत

३.६ अमर्त्य सेन यांचा सामाजिक न्यायाचा सिद्धांत

३.७ मायकल सँडेल यांची न्यायाची संकल्पना

३.८ आयरिस यंग यांची न्यायाची संकल्पना

३.९ समारोप

३.१० सराव प्रश्न

३.११ संदर्भ

## ३ .१ उद्दिष्टे

- न्याय म्हणजे काय हे समजावून घेणे व न्यायाचे प्रमुख प्रकार समजावून घेणे
- न्यायाच्या प्रमुख सिद्धांतांची तोंडओळख करणे

## ३.२ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून आपण न्याय म्हणजे काय हे समजून घेत आहोत. न्याय ही संकल्पना स्वातंत्र्य (Liberty) आणि समता (Equality) या संकल्पनांशी जोडली गेली असल्याने काहीशी सापेक्ष संकल्पना आहे.

## ३.३ न्याय म्हणजे काय-

न्याय ही राज्यशास्त्र आणि राजकीय तत्त्वज्ञानातील महत्वपुर्ण संकल्पना आहे. लॅटीन भाषेतील *Jungere* या शब्दापासून Justice या शब्दाचा उगम झाला असून त्याचा अर्थ 'एकत्र बांधणे' असा

munotes.in

होतो. 'न्याय' या संकल्पनेचा सोप्या भाषेत अर्थ सांगावयाचा झाल्यास न्याय हा चांगल्या वातावरणात लोकांना एकत्र बांधण्याचे काम करतो. दुसऱ्या मतप्रवाहानुसार Justice या शब्दाची व्युत्पत्ती लॅटीन भाषेतील *Justitia* या शब्दापासून झाली असून त्याचा अर्थ 'चांगुलपणा' असा होतो. न्यायाचा अर्थ अनेकदा 'योग्यपणा' (justness) या असाही लावला जातो. तार्किकदृष्ट्या हा अर्थ योग्यही मानता येईल. या अर्थानुसार न्याय ही संकल्पना सार्वजनिक धोरण किंवा कायद्याच्या अंमलबजावणीशी निगडीत असून वर्तमानकाळातील कायद्यांची अंमलबजावणी करीत वैधानिक समानता (Legal Equality) प्रस्थापित करणे किंवा उपलब्ध संसाधनांचे वितरण किंवा फेरवितरण करणे म्हणजे न्याय होय. यातूनच न्यायाची संकल्पना समतेच्या तत्वाशी जोडल्या गेली आहे. कायद्यापुढे समानता (Equality before law) अथवा कायद्याची समानता (Equality of law) या वाक्प्रचारांची सुरवात झाली.

न्याय या संकल्पनेचा परामर्श विविध राजकीय विचारवंतानी घेतला आहे. प्राचीन ग्रीक विचारवंत प्लेटो याने आपल्या Republic या ग्रंथाद्वारे न्यायाची चर्चा केली आहे. आदर्श राज्याच्या पायाभरणीसाठी प्लेटोने मानवी सदगुणांची गरज असल्याचे स्पष्ट केले आहे. प्लेटोच्या मते, प्रमुख मानवी सदगुणावर (बुद्धीमत्ता, शौर्य आणि तृष्णा) आधारित समाजरचना (अनुक्रमे शासक, सैन्य आणि कारागीर) केल्यास 'न्याय' प्रस्थापित होईल. प्लेटोच्या न्यायरचनेचा कणा म्हणजे 'आपले काम करणे व इतरांच्या कामात ढवळाढवळ न करणे' (To do one's own business and not to interfere in other's business) हे तत्व होते.

ॲरिस्टॉटलने 'न्याय' या संकल्पनेस 'वैश्विक न्याय' (Universal Justice) आणि 'विशिष्ट न्याय' (Particular Justice) अशा दोन प्रकारांत विभागले आहे. 'वैश्विक न्याय' हि संकल्पना कायद्याचे पालन करण्याशी निगडीत असून व्यक्तीने सदगुणी असावे असा त्याचा अर्थ असतो. 'विशिष्ठ न्याय' ही संकल्पना 'वितरणात्मक न्याय' (Distributive Justice) आणि 'सुधारणात्मक न्याय' (Corrective Justice) अशा दोन उपप्रकारांत विभागली आहे. ॲरिस्टॉटलच्या वितरणात्मक न्यायानुसार राज्याने नागरिकांमध्ये गुणवत्तेच्या आधारे संसाधनांचे फेरवितरण करणे अपेक्षित आहे तर सुधारणात्मक न्याय हा ऐच्छिक किंवा अनैच्छिक कृतींमुळे व्यक्तीच्या अधिकारांवरील होणारे अतिक्रमण दूर करतो. न्यायाचे स्वरुप स्पष्ट करतांना ॲरिस्टॉटलने म्हटले आहे कि, 'न्याय म्हणजे समानांना समानतेने तर असमानांना असमानतेने वागवणे होय'. तार्किकदृष्ट्या ॲरिस्टॉटलने मांडलेली ही व्याख्या बरोबर असली तरीही असमानांना वेगळ्या पद्धतीने वागवणे म्हणजे नक्की काय? याचे समाधानकारक उत्तर ॲरिस्टॉटल देत नाही. ॲरिस्टॉटलने तत्कालीन गुलामगिरीच्या पद्धतीचे समर्थन केले असल्याने ही व्याख्या आजच्या दृष्टीने ही व्याख्या कालबाह्य ठरते.

प्लेटो आणि ॲरिस्टॉटलनंतर मध्ययुगीन कालखंडातही अनेक राजकीय विचारवंतांनी न्यायाच्या संकल्पनेचा ऊहापोह केला आहे. यामध्ये रोमन विचारवंत सेंट ऑगस्टाईन आणि थॉमस ॲक्विनास यांचा प्रामुख्याने समावेश होतो. सेंट ऑगस्टाईनच्या मते, न्याय हा व्यक्तीचा आंतरिक घटक आहे.

सार्वजनिक जीवनात व्यवस्था निर्माण करण्यासाठी व्यक्तीने आंतरिक शिस्त पाळणे आवश्यक असते तेव्हा 'न्याय म्हणजे व्यक्तीने सुव्यवस्थित व स्वयंशिस्त जीवन जगत कर्तव्याचे पालन करणे व त्याद्वारे राज्यव्यवस्थेस अनुकूल वातावरण निर्माण करणे होय'. थॉमस ॲक्विनास याने न्यायाची व्याख्या करतांना 'इतरांना देय असलेले देण्याची स्थिर व चिरंतन टिकणारी इच्छाशक्ती म्हणजे न्याय' असे म्हणले आहे. ॲक्विनासने न्यायास व्यक्तीमध्ये दडलेली नैतिकता मानले आहे.

१८ व्या शतकातील औद्योगिक क्रांती आणि भांडवलशाहीच्या उदयानंतर उपयोगितावादाचा (Utilitarianism) जन्म झाला. उपयोगितावाद प्रामुख्याने 'चांगले' आणि 'वाईट' या द्वंद्वावर आधारलेला आहे. व्यक्तीच्या जीवनात 'सुख' (Pleasure) आणि 'वेदना' (Pain) या मुलभूत प्रेरणा असतात. या गृहितकाच्या आधारे जास्तीत जास्त सुख, आनंद देणाऱ्या यंत्रणेची निर्मीती करणे म्हणजे न्याय होय असा तर्क उपयोगितावादाद्वारे मांडला जातो. मात्र येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, 'सुख' आणि 'आनंद' या संकल्पना व्यक्तीसापेक्ष असल्याने जास्तीत जास्त व्यक्तींचे हित त्याद्वारे जोपासले जाणे शक्य नसते. त्यामुळे जॉन स्टुअर्ट मिल या विचारवंताने सुखाचे संख्यात्मक (Qualitative) मोजमाप न करता गुणात्मक (Quantitative) करावे असा आग्रह धरला. उपयोगितावादानुसार न्यायाचा अर्थ समाजाचे व्यापक हित असून न्याय हा व्यक्ति- व्यक्तिंच्या वैयक्तिक हितास केंद्रबिंदू न मानता समाजाचे हित जोपासते. मात्र असे करतांना व्यक्तीच्या हिताचा संकोच होणार नाही याचीही काळजी घेतली जाते.

### ३.३.१ न्यायाचा अर्थ आणि न्यायाचे प्रमुख प्रकार (Meaning and types)

वरील चर्चेच्या आधारे आपणास न्यायाच्या व्याख्येतील परस्परविसंगती तसेच सर्वसमावेशकतेचा अभाव दिसून येतो. न्यायाची सर्वसमावेशक व्याख्या का मांडता येत नाही याचे उत्तर शोधायचे झाल्यास परस्परनिगडीत तीन पैलूंचा विचार होणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, मूल्यात्मक पातळीवर न्याय म्हणजे काय? या प्रश्नाची उकल करतांना विविध विचारवंतांकडून परस्परविरोधी मते मांडली जातात हे मान्य केले पाहिजे. दुसरे असे की, न्यायाची अंमलबजावणी करतांना कोणकोणत्या साधनांचा (Means) वापर केला जावा या प्रश्नाचे उत्तर अनुभवजन्य पातळीवर वेगवेगळे येते. ज्यामुळे सर्वसमावेशक न्यायाधिष्ठीत व्यवस्था स्थापन करतांना अनेक अडचणी येतात. तिसरे असे की, दुसऱ्या महायुद्धानंतर राज्याने सामाजिक आणि राजकीय मुल्यांवर आधारित सामाजिक न्यायाची स्थापना केली पाहिजे हा युक्तिवाद अनेक पाश्चात्य देशांतील विचारवंत करीत आहेत. ज्यामुळे न्यायाचा अर्थ लावणे कठिण जाते.

- नैसर्गिक न्याय- सुरवातीच्या काळात, न्याय ही संकल्पना नैसर्गीक न्याय (Natural Justice) या संकल्पनेशी जोडली गेली होती. नैसर्गीक न्याय ही संकल्पना विशीष्ट प्रश्नाबाबत संवेदनशील आणि तार्किक निर्णय घेण्याशी निगडीत आहे. नैसर्गीक न्याय एकंदर निर्णयप्रक्रियेत अंतिम ध्येयापेक्षा प्रक्रियेस (Procedures) अधिक महत्त्व देतो. नैसर्गीक न्यायात भेदभावाविरुद्ध

अधिराज्य (Rule against bias) आणि योग्य सुनावणीचा अधिकार (Right to fair hearing) या दोन तत्वांना महत्त्व दिले आहे. थोडक्यात प्रस्थापित वैधानिक संस्था आणि सामाजिक नियमांच्या आधारे विवादांची सोडवणूक करणे व सुव्यवस्था राखणे या हेतूने नैसर्गीक न्यायाची रचना झाली आहे असे सांगता येईल.

- सामाजिक न्याय- सामाजिक न्याय ही संकल्पना काहीशी आधुनिक आहे. विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर राज्याच्या मदतीने न्यायाची स्थापना करण्याचा याद्वारे प्रयत्न झाला आहे. मुळात न्याय ही संकल्पना कल्याणकारी राज्य या संकल्पनेशी निगडीत असून सर्वंकष राज्यव्यवस्थेत (Totalitarian state) किंवा साम्यवादी राज्यव्यवस्थेत (Communist state) न्यायाची पायाभरणी होतांना दिसत नाही. पाश्चात्य उदारमतवादी लोकशाही विचारवंतांनी न्यायाच्या संकल्पनेस संपत्ती आणि उत्पन्नाच्या फेरवितरणाशी जोडले आहे. यातूनच व्यक्तीची कुवत (Desert), गुणवत्ता (Merit), गरज (Needs) आणि काहीवेळा समतेसारख्या (Equality) तत्वांचा आधार घेऊन वितरणात्मक धोरणांची अंमलबजावणी झाली पाहिजे असा विचार मांडला जातांना आपणास दिसतो. कल्याणकारी राज्य हे व्यक्तीच्या अधिकार आणि कर्तव्यांबाबत विशेष जागरुक असते. तेव्हा न्यायाचे पालन करणाऱ्या व्यक्तीस त्याचे देय विशेषाधिकार (Entitlement) मिळाले पाहिजेत यासाठी राज्य प्रयत्न करतांना दिसते. सामाजिक न्याय त्यामुळेच राज्यास सकारात्मक भूमिका पार पाडण्याचे निर्देश देते.

- प्रक्रियात्मक न्याय- प्रक्रियात्मक न्याय हा विवादांची सोडवणूक आणि संसाधनांचे वितरण करतांना रास्त प्रक्रियेचा आग्रह धरतो. निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी कायद्याची विहीत प्रक्रिया (Due process of law) सारख्या तत्वाचा अवलंब करुन न्याय प्रस्थापित केला जातो.

- वितरणात्मक न्याय- वितरणात्मक न्याय संसाधनांचे सामाजिकदृष्ट्या रास्त वितरण करण्याशी संबंधीत आहे. वितरणात्मक न्याय हा प्रक्रियात्मक न्यायाशी विसंगत आहे. संसाधनांचे वितरण करतांना एकूण संसाधने, संसाधनवितरणाची प्रक्रिया, आणि संसाधनवितरणाची पद्धत या घटकांचा विचार करुन रास्त वितरण केले जाते. समाजातील सर्व घटकांना संसाधनांना समान वितरण व्हावे यासाठी शासन गैरलाभार्थी घटकांना विशेष लाभ दिले जातात. थोडक्यात वितरणात्मक न्याय म्हणजे उपलब्ध संसाधनांचे फेरवितरण करुन न्याय प्रस्थापित करणे

## ३.४ जॉन रॉल्सचा सामाजिक न्यायाचा सिद्धांत

जॉन रॉल्स या अमेरिकन विचारवंताने A Theory of Justice (1972) या ग्रंथाद्वारे सामाजिक न्यायाचा सिद्धांत मांडला आहे. रॉल्सच्या मते, समानतेवर आधारित व्यवस्था निर्माण करायची झाल्यास भौतिक संसाधनांप्रमाणेच स्वातंत्र्य आणि राजकीय सत्तेचेही वितरण झाले पाहिजे. जॉन

रॉल्सने सामाजिक न्यायाचा सिद्धांत मांडतांना जॉन लॉक आणि जीन जॅक रुसोसारख्या विचारवंतांच्या सामाजिक करार सिद्धांताचा आधार घेतला आहे. सामाजिक कराराच्या सिद्धांतानुसार, 'निसर्गावस्थेतही व्यक्तीला चांगले जीवन जगता यावे यासाठी दमनकारी अधिसत्ता काही अधिकार प्रदान करीत असे'. रॉल्स याने सामाजिक करारातील राज्याच्या व्यक्तीकेंद्री भुमिकेपेक्षा व्यक्ति-व्यक्तींमधील सहकार्याच्या भुमिकेस अधिक महत्व दिले आहे. जॉन रॉल्सच्या मते, सामाजिक कराराच्या काळात व्यक्ति- व्यक्तीमध्ये सहकार्याची भावना असल्याने लाभ (Benefits) आणि जबाबदाऱ्यांचे ओझे (Burden) यांचे वितरण करणे सोपे जात असे. आजच्या काळात सामाजिक न्यायाची पुन्हा नव्याने पायाभरणी करायची झाल्यास पुन्हा असे फेरवितरण होणे गरजेचे आहे. भौतिक वस्तू (Material Goods), व्यक्तिगत स्वातंत्र्य (Personal Freedom) आणि राजकीय सत्ता (Political power) यांचा समावेश लाभांमध्ये (Benefits) करता येईल. तर अशी व्यवस्था निर्माण करतांना उपस्थित होणारी विषमता आणि सामाजिक न्यायाची स्थापना करतांना उचलावी लागणारी कठोर पाऊले यांचा समावेश ओझ्यांमध्ये (Burden) करता येईल. रॉल्सने आपल्या न्यायाच्या सिद्धांतास शुद्ध प्रक्रियात्मक न्याय (Pure Procedural Justice) असे संबोधले आहे. म्हणजेच एकदा का न्यायाची तत्वे सर्वमान्य झाली कि त्याच्या अंमलबजावणीतून आपोआप न्याय साधला जाईल.

या प्रक्रियात्म न्यायाचा आधार सामाजिक करार असल्याने प्रत्येक व्यक्तीने आपल्या मुळस्थानी (Original position) जाणे गरजेचे आहे. जेणेकरुण व्यक्ती आपल्या सामाजिक आणि आर्थिक प्रभावांपासून मुक्त राहील व एकप्रकारे समता निर्माण होईल. या व्यक्तींनी वैध कर्ता बनावे यासाठी त्यांना अज्ञानतेच्या पडद्यामागे (Veil of ignorance) ठेवण्यात येईल. या व्यक्ती भेदभाव आणि संघर्षाचे कारण ठरणाऱ्या गरजा, कौशल्ये, हितसंबंध यांपासून दुर असल्याने त्यांच्यात न्यायाची जाणीव निर्माण करणे सोपे जाईल. अशावेळी जॉन रॉल्स सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी तीन वितरणाची तत्वे (Principles of Distribution) प्रस्तुत करतो. समान स्वातंत्र्याचे तत्व (Principle of equal liberty), संधीच्या समानतेचे तत्व (Principle of fair equality of opportunity) आणि भेदाचे तत्व (Difference Principle) ही ती तीन तत्वे आहेत. या तीन तत्वांच्या आधारे न्याय प्रस्थापित करणे शक्य होईल असे रॉल्सला वाटते. भेदाचे तत्व हे समाजातील अल्प लाभार्थीला प्रवाहात आणण्यासाठी अंशतः विषमता स्विकारण्यास मान्यता देते.

न्यायातील अंतर्भूत तात्विक बाजूमुळे राजकीय आणि सामाजिक सिद्धांतातील न्यायाचे महत्त्व अधोरेखित होते. जॉन रॉल्स याने तर 'न्याय हा समाजाचा प्रथम सदगुण आहे' असे म्हटले आहे. कारण स्वातंत्र्य आणि समता यासारख्या इतर राजकीय मुल्यांची पाठराखण करुनही जर राज्य अन्यायावर आधारलेले असेल तर त्याचा काहीच अर्थ उरत नाही. पण याचा अर्थ न्याय म्हणजे नैतिकता नव्हे. कारण नैतिकतेच्या आधारावर एखाद्या कृतीचे समर्थन करता येत असले तरीही न्यायाच्या कसोटीवर ती कृती योग्य असेलच असे नाही. न्याय ही एक वितरणावर आधारित कल्पना आहे ज्यामध्ये शासनयंत्रणा व्यक्तीच्या कृतीचे मोजमाप करीत बक्षीस (Reward) आणि दंड (Punishment) बहाल करते. व कायद्याची अंमलबजावणी करते.

## ३.५ रॉबर्ट नॉझिकचा सामाजिक न्यायाचा सिद्धांत

रॉबर्ट नॉझिक या अमेरिकन राजकीय तत्त्ववेत्याने आपल्या Anarchy, State and Utopia या ग्रंथाद्वारे खळबळ निर्माण केली. जॉन रॉल्सने मांडलेला सिद्धांत सामाजिक न्यायाचा सिद्धांत हा स्वातंत्र्य, समता, आणि विषमता या तीन घटकांची चर्चा करतो. रॉबर्ट नॉझिक याने जॉन रॉल्सच्या न्यायाच्या सिद्धांतातील काही भूमिकांचा स्वीकार केला असला तरी आपल्या लेखनातून त्याने एक पर्यायी प्रारुप निर्माण करण्याचा प्रयत्न केला. रॉबर्ट नॉझिकच्या न्यायाचा सिद्धांत हा स्वतंत्रतावादावर (Libertarianism) आधारलेला आहे. रॉबर्ट नॉझिकने राज्याचे रात्रप्रहरीरूप (Night-watchman) स्वीकारले आहे.

### संपत्तीच्या अधिग्रहणाचे मार्ग (Modes of Acquisition)-

रॉबर्ट नॉझिक याने Anarchy, State and Utopia या ग्रंथात जॉन रॉल्सच्या Social Justice वर सडेतोड टिका केली आहे. जॉन रॉल्सचे वितरणाचे तत्व (Principle of Distribution) हे आदर्शवादी असून राज्याने वास्तववादी भूमिका स्वीकारणे गरजेचे आहे असे नॉझिक याला वाटते. व्यक्तीला प्राप्त होणारे हक्क आणि वस्तू हक्क यांच्या अधिग्रहणाचे /प्राप्तीचे मार्ग एकदा लक्षात घेतले तर फेरवितरणाचा प्रश्नच उपस्थित राहत नाही. नॉझिकच्या मते, व्यक्ती हा तीन वेगवेगळ्या माध्यमांतून वस्तू/भौतिक संपत्तीचे अधिग्रहण करत असतो.

सर्वप्रथम, व्यक्तीमधील शारीरिक तसेच बौद्धिक क्षमता या अदेय स्वरुपातील संपत्ती आहेत. व्यक्तीचे आपल्या शारिरीक आणि मानसिक क्षमतांवर पुर्ण नियंत्रण असून या क्षमतांच्या वापर तो हवा तसा करु शकतो. या क्षमतांवर व्यक्तीचा पूर्ण अधिकार असतो.

दुसरे असे कि, विविध मार्गांचा वापर करून व्यक्ती निसर्गातील जमीन तसेच खनिजसंपत्तीसारख्या घटकांचे अधिग्रहण करतो. ही नैसर्गिक संपत्ती व्यक्ती स्वतःकडे ठेवू शकत असल्याने आणि या संपत्तीवर सर्वांचा समान अधिकार असल्याने याठिकाणी हक्कबहालीचे तत्व (Principle of Entitlement) ठरवण्याची गरज भासते. व्यक्तीच्या अशा संपत्तीवरील हक्काची मागणी न्याय/ अन्याय हे ठरवतांना सर्वमान्य तर्कांचा आधार घेतला जातो.

तिसरे असे कि, निसर्गातील वर उल्लेखलेल्या घटकांमध्ये व्यक्ती आपले श्रम ओतून नवनिर्मीती करतो अशावेळी तयार होणाऱ्या उत्पादानावर (जसे कि, कृषी आणि औद्योगिक उत्पादने) संबंधित व्यक्तीचा अधिकार असतो. जेव्हा अशी व्यक्ती स्वेच्छेने या उत्पादनाचे इतरांकडे हस्तांतरण करते तेव्हा त्यावर इतरांचा अधिकार निर्माण होतो.

### हक्कबहालीचे तत्व (Principle of Entitlement)

शारीरिक आणि बौद्धिक क्षमतांवर व्यक्तीची मालकी ही निर्विवाद असते. तेव्हा न्यायाचे तत्व प्रस्थापित करतांना व्यक्तीच्या निसर्गनिर्मित घटकांचे अधिग्रहण हक्क आणि व्यक्तीच्या श्रमातून निर्माण होणाऱ्या उत्पादनावरील हक्क यांचा प्राधान्यक्रमाने विचार करण्याची गरज आहे. रॉबर्ट

नॉझिक याने या हक्काबहालीची तीन तत्वे प्रतिपादीत केली आहेत. या तीन तत्वांचे पालन झाल्यास न्याय प्रस्थापित होऊ शकतो असे रॉबर्ट नॉझिक याला वाटते. ही तत्वे पुढीलप्रमाणे-

- आरंभिक अधिग्रहण (Initial Acquisition)

  नैसर्गिक साधनसंपत्तीबाबत जेव्हा याआधी कुणीही मालकी सांगितलेली नसेल तर अशावेळी 'आरंभिक अधिग्रहणा'चे तत्व लागू पडते. रॉबर्ट नॉझिक याने 'आरंभिक अधिग्रहणा'चे तत्व स्पष्ट करतांना जॉन लॉकच्या 'निसर्गावस्थे'चा आधार घेतला आहे. निसर्गावस्थेत निर्मनुष्य जागेवर प्रथम राहायला आलेल्या व्यक्तीने त्या जमीन/ निसर्गसंपत्तीवर प्रथम अधिकार सांगितला आणि त्याला इतरांनी संमती दर्शवली. नॉझिकच्या मते, व्यक्तीच्या अशा अधिग्रहणामुळे इतरांच्या अधिकारांवर जोपर्यंत गदा येत नाही तोपर्यंत हे तत्त्व टिकून राहते. म्हणजेच व्यक्तीच्या अतिरिक्त अधिग्रहणामुळे इतरांवर टंचाई सामना करायची गरज पडू नये.

- ऐच्छिक हस्तांतरण (Voluntary transfer)-

  व्यक्तीच्या आरंभिक अधिग्रहण किंवा नैसर्गिक संपत्तीमध्ये श्रम ओतल्यानंतर निर्माण होणाऱ्या संपत्तीबाबत हे तत्व लागू पडते. जेव्हा एखादा श्रमिकांच्या श्रमाचा पुरेपूर मोबदला देऊन जेव्हा एखादा कारखानदार श्रम विकत घेतो तेव्हा त्यास ऐच्छिक हस्तांतरण असे संबोधले जाते. अशा परिस्थितीत श्रमिक आणि कारखानदार यांवर कोणताही दबाव नसतो आणि फसवणूकही केली जात नसते. ही एक व्यक्तीकेंद्री यंत्रणा असते. अशा सर्व व्यवहारांमध्ये 'व्यक्ती हा ध्येय प्राप्तीसाठी चे साधन' नसून 'व्यक्ती हाच अंतिम ध्येय' असतो.

- सुधारणा (Rectification)

  रॉबर्ट नॉझिकच्या मते, न्यायाच्या प्रस्थापनेसाठी इतर व्यक्तींच्या/ राज्याच्या/ आंतरराष्ट्रीय समुदायाच्या हस्तक्षेपास 'न्याय्य' मानत अशा हस्तक्षेपास 'सुधारणांचे क्षेत्र' संबोधले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे तसेच हक्कांचे अनिर्बंध अधिग्रहण झाल्याने जगभरात विषमता निर्माण झाली आहे. एका व्यक्ती किंवा राज्याकडून होणाऱ्या अशा अधिग्रहणामुळे इतरांच्या हक्कांवर गदा येते. व्यक्तीकडून स्वेच्छेने संपत्तीचे हस्तांतरण होऊन जर विषमता निर्माण होत असेल तर त्याबाबत नॉझिक काहीही बोलत नाही मात्र जेव्हा एखाद्या व्यक्ती किंवा राज्याकडून इतरांच्या अनिर्बंध अधिग्रहणास नॉझिक आपला विरोध प्रकट करतो.

रॉबर्ट नॉझिक याने आपण न्यायाचे तत्त्व 'सर्वसामान्यांसाठी' निर्माण केले असा युक्तिवाद केला. मात्र त्याचा हा युक्तिवाद कमकुवत ठरतो. नॉझिक व्यक्तीगत स्वातंत्र्य आणि 'स्पर्धात्मक बाजारपेठे'चा खंदा पुरस्कर्ता असून ही व्यवस्था धनिकांना अधिक धनिक तर कमजोरांना अधिक कमजोर बनवते. नॉझिक श्रीमंतांना 'सामाजिक जबाबदारी'पासून मुक्त करतो व त्यांच्या सामाजिक ऋणाबाबत काहीही बोलत नाही. नॉझिकचे 'सुधारणेचे तत्त्व' हे श्रीमंत आणि धनदांडग्यांना त्यांच्या कृतीचे समर्थन करण्याचे तत्व बनवते. पुनर्वितरण आणि कल्याणकारी उद्दिष्ट साध्य करणाऱ्या राज्याच्या नाशासाठी नॉझिक याने सुधारणेच्या तत्त्वांचा पुरस्कार केला अशी टिका विरोधक करतात.

## ३.६ अमर्त्य सेन यांचा सामाजिक न्यायाचा सिद्धांत

नोबेल पारितोषिक विजेते भारतीय अभ्यासक अमर्त्य सेन यांनी आपल्या The Idea of Justice या ग्रंथाद्वारे जॉन रॉल्सच्या सामाजिक न्यायाच्या सिद्धांताचे परिक्षण आणि पुनर्मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. पारंपारिक राजकिय तत्वज्ञानात न्याय काय आहे, न्याय समाजाचे स्वरुप कसे असेल आणि न्याय समाजाच्या निर्मीतीसाठी कशाची गरज आहे या प्रश्नांभोवती विविध विचारवंतांनी आपल्या सिद्धांताची गुंफण केली आहे. मात्र अमर्त्य सेन यांनी आपल्या ग्रंथाच्या माध्यमातून या विचारप्रवाहास छेद दिला आहे. त्यांच्या मते, पारंपारिक सिद्धांत केवळ न्याय्य काय आहे आणि ते कसे साध्य होईल न्याय्य राजकिय संस्था कशा स्थापन होतील याचा विचार करते मात्र अभ्यासाचा वास्तव रोख हा अशा संस्थांतील अन्याय्य व्यवस्था हटवण्याशी संबंधित असायला हवा.

सेन यांनी जॉन रॉल्स, रॉबर्ट नॉझिक, रिचर्ड ड्वॉर्किन या विचारवंतांच्या न्यायविषयक विचारांकरिता पराभौतिक संस्थावाद (Transcendental institutionalism) ही कल्पना वापरली असून व्यव्हार्यतेतील अडचणी व अतिरेकाची समस्या या दोन पेचांमध्ये ही कल्पना अडकली आहे असे म्हटले. आतापर्यंत मांडण्यात आलेले सर्व सिद्धांत विशेषतः पहिल्या अडचणीमुळे अवलंबणे कठिण ठरतात; परिणामी न्याय्य समाजाची निर्मीती ही आदर्श कल्पना बनते. उदाहरणार्थ रॉल्सच्या सामाजिक न्यायाच्या सिद्धांतातील महत्वाचा दोष म्हणजे त्यात गृहीत धरण्यात आलेली ‘मुळस्थाना’ची (Original position) कल्पना. अमर्त्य सेन यांच्या मते, ही कल्पना व्यव्हार्य नाही.

अमर्त्य सेन हे समानतावादी विचारवंत असून ते स्वतःला वास्तवदर्शी तुलनात्मक दृष्टीकोनाचे (Realization focused comparative approaches) समर्थक मानतात. हा दृष्टीकोन पराभौतिक संस्थावादापेक्षा भिन्न असून यात वेळोवेळी बदलत जाणाऱ्या सार्वजनिक तर्कास आधार मानले जाते.

आपला युक्तीवाद पुढे नेण्यासाठी अमर्त्य सेन क्षमता दृष्टीकोनाचा (Capability Approach) आधार घेतात. क्षमता दृष्टीकोन हा चांगले जीवन जगण्याची संधी लाभणे ही प्राथमिक गरज आहे आणि चांगले जीवन हे लोकांच्या क्षमता आणि कार्यपद्धती यांद्वारे जोखले गेले पाहिजे या दोन युक्तीवादावर आधारित आहे. एखाद्या व्यक्तीच्या संसाधनांना (जसे की सार्वजनिक सेवा) आपण त्या व्यक्तीच्या अनुकूल क्षमतांमध्ये बदलू शकलो तर आपण चांगले जीवन देण्याचा प्रयत्न करु शकतो. सेन यांनी आपल्या पुस्तकाच्या माध्यमातून सामाजिक वास्तव तसेच न्याय व्यवस्थेच्या आवश्यक घटकांची चर्चा केली आहे.

## ३.७ मायकल सँडेल यांची न्यायाची संकल्पना

अमेरिकन राजकिय विचारवंत मायकेल सँडेल यांनी आपल्या Justice: What is right thing to do? या पुस्तकाद्वारे इमॅन्युअल कांट, जॉन स्टुअर्ट मिल, जॉन र◌ॉल्स यांच्या न्यायाच्या

सिद्धांतावर कडाडून टिका केली आहे. या सिद्धांत ा ंच्या मुलभूत त्रुटींकडे लक्ष वेधत मायकेल सँडेल यांनी ॲरिस्टॉटलप्रणित न्यायाच्या सिद्धांताची पुनर्मांडणी केली आहे.

मायकेल सँडेल यांनी आपल्या न्यायाचा सिद्धांत मांडत असतांना काही घटनांचा ऊहापोह केला आहे. अनेकदा एखाद्या नैसर्गिक आपत्तीसारखी बिकट परिस्थिती ओढावली असतांना व्यक्तीवर अन्याय घडला आहे की नाही हे तपासणे कठीण बनते. अशा आपत्तीमध्ये अचानक गरज वाढल्याने वस्तूंच्या किमती वाढतात. अनेकदा अडचणीत सापडलेल्या बँकांना बाहेर काढण्यासाठी सरकार बेलआऊट पॅकेज ेस देते. किंवा एखाद्या जहाजेमध्ये अडकून पडलेल्या पाच प्रवाशांपैकी नाईलाजास्तव आपल्यापैकी कमकुवत प्रवाशास मारुन इतरांनी नरभक्षक होणे स्विकारतात. यासारख्या उदाहरणा ंबाबत मायकेल सँडेलच्या मते, सर्वसामान्यांच्या मनात तीन प्रकारच्या भूमिका असतात. सर्वप्रथम, नागरिकांच्या मते न्यायाच्या कल्पनेत जास्तीत जास्त लोकांचे कल्याण साधने अपेक्षित असते. दुसरे असे की न्यायाच्या कल्पनेत व्यक्तीत्वाच्या पैलूंचा आदर करणे अभिप्रेत असते. तर तिसरे असे की व्यक्तीला चांगल्या जीवन ाकडे नेणाऱ्या घटकांचा न्यायाच्या कल्पनेत समावेश असतो.

वरील उदाहरणे व त्यामागील सर्वसामान्यांचे युक्तिवाद स्पष्ट केल्यानंतर मायकेल सँडेल यांनी आपल्या चर्चेचा रोख समकालीन राजकीय तत्त्वज्ञानातील प्रबळ विचारप्रवाह ा ंच्या मूल्यमापन ाकडे वळवला. आपल्या पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणात मायकेल सँडेल यांनी जॉन स्टुअर्ट मिलच्या उपयोगितावादाची (Utilitarianism) समिक्षा केली आहे. उपयोगितावादी सिद्धांत ामध्ये परिणामांना/ फलनिष्पत्तीला (Outcome) अधिक महत्त्व दिले असून प्रत्यक्षात मात्र 'न्याय्य कृती' (Just Action) हीच जास्तीत जास्त लोकांना सर्वात चांगली फलनिष्पत्ती देऊ शकते. मायकेल सँडेल य ाने उपयोगितावादी विचारातील महत्त्वपूर्ण मुद्यांवर आक्षेप घेत असे म्हटले आहे की, आपणा सर्वांसाठी न्यायाची संरक्षक मागणी करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिगत अधिकारांचे हनन करु पाहणाऱ्या कृती या पर्यायाने इतरांसाठीही मारक ठरू शकतात. उपयोगितावादाप्रमाणेच मायकेल सँडेल यांनी स्वतंत्रतावाद, क ा ंटवाद आणि जॉन रॉल्सच्या सिद्धांतांचा समाचार घेतला आहे. न्यायाच्या काही सिद्धांतांचा परामर्श घेत मायकेल सँडेल य ाने आपल्या सिद्धांताची पार्श्वभूमी तयार केली असून त्याने सकारात्मक कृतीची (Affirmative Action) सखोल चर्चा केली आहे. आपल्या सिद्धांतामध्ये मायकेल सँडेलने सकारात्मक कृतीच्या बाजूने तसेच विरोधात होणाऱ्या विविध तर ्कांचा पुरेपुर वापर केला आहे.

मायकेल सँडेलच्या मते, पाश्चात्य समाजाला भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे मूळ हे सार्वजनिक चर्चा ंचा अभाव आणि 'चांगल्या जीवनाची चर्चा केली जात असतांना राजकारण हे तटस्थ असावे' या युक्तीवादात आहे. उदारमतवादी विचारपरंपर ा 'विविध व्यक्तींना विविध मत े असतात' हे तत्व स्विकारत असल्याने 'चांगले जीवन' (the Good life) या घटकामध्ये कशाचा समावेश असावा याबाबत जेव्हा चर्चा घडून येते तेव्हा धार्मिक, सांस्कृतिक, आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून मतभिन्नता स्पष्टपणे दिसू लागते. असे सांगत असताना 'वेगवेगळ्या लोकांना आपल्या वेगवेगळ्या

munotes.in

कृती करण्याचे स्वातंत्र्य देत राजकीय क्षेत्राने तटस्थ भुमिका स्विकारली पाहिजे' असा सर्वसामान्य नागरिकांकडून विचार केला जातो. मायकेल सँडेल यांना ही भूमिका चुकीची वाटते. अशा भूमिकेमुळे समाजामध्ये दुफळी निर्माण होऊन, नागरी भावना नष्ट होते व परिणामी नागरिक आपल्या भिन्नतेच्या भावनेत दुर्लक्ष करु लागतात/ त्यावर चर्चा टाळतात. प्रत्यक्षात ही भिन्नता कशी संपवता येईल याकडे सार्वजनिक चर्चेचा रोख असणे अपेक्षित असते. आपल्या व्यक्तिवादाचे समर्थन करताना मायकेल सँडेल असे म्हणतात की समाजामध्ये व्यापक आर्थिक विषमता स्विकारण्यात आली असल्यामुळे अन्याय परिस्थिती निर्माण झाली आहे. नागरिक आपापल्या स्वतंत्र जीवनात झपाट्याने विकास साधत असून नागरिकांतील परस्परसंवादाच्या अभावामुळे 'आपण एकाच राजकीय व्यवस्थेचे सदस्य आहोत' ही भावना संपुष्टात येत आहे. आर्थिक विषमतेमुळे नागरी ऐक्याची भावना नष्ट होते. यावर उपाय म्हणुन मायकेल सँडेल यांनी असा प्रस्ताव मांडला आहे की, 'आपण सर्वांनी सार्वजनिक आणि राजकीय क्षेत्रात समाजासाठी काय चांगले आहे? यावर आधारित योग्य नैतिक चर्चांमध्ये गुंतवून घेतले पाहिजे'. या चर्चांमधून निर्माण होणारी धोरणे हे सर्वांचे हित निर्माण करणारी आणि समुदायाचे ऐक्य निर्माण करणारी असतील. अशापद्धतीने समाजात न्याय निर्माण होऊ शकेल असे मायकेल सँडेल यांना वाटते.

मायकेल सँडेल यांच्या या प्रस्तावाची अंमलबजावणी काही अंशी व्यवहार्य वाटते. याचे कारण, या प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी वेगवेगळी उदाहरणे देत स्वीकारलेली भूमिका. अनेकांना 'चांगले जीवन' या संकल्पनेत काय असावे? आणि 'ही संकल्पना राज्याने ठरवावी' हे मत राज्याची सर्वंकषवादी भूमिका दर्शवणारे वाटते. निश्चितच यामुळे संधीची समानता नष्ट होऊन वेगवेगळ्या कल्पनांची अपेक्षा बाळगणाऱ्यांवर त्यामुळे अन्याय होईल. त्याशिवाय जरी आपण असे म्हणत असलो की, 'राज्याने चांगले जे काही आहे ते सर्व करावे' तरी याचा अर्थ 'राज्याने जे काही निर्माण केले आहेत तो न्याय आहे का?' असा प्रश्न इथे टिकून राहतो.

## ३.८ आयरिस यंग यांची न्यायाची संकल्पना

अमेरिकन विचारवंत आयरिस मॅरियन यंग या स्त्रीवादी राजकिय सिद्धांतातील प्रमुख विचारवंत मानल्या जातात. त्यांचे Justice and the Politics of difference हे महत्वपुर्ण पुस्तक मानले जाते. आयरिस यंग यांच्या मते न्याय ही संकल्पना केवळ व्यक्तीगत पात्रतेशी संबंधीत नसून सामाजिक गटांच्या ओळखीशी तिचा निकटचा संबंध आहे. सामाजिक नियम, कायदे आणि संस्था यांमुळे व्यक्तींच्या सामुहिक जीवनावर मर्यादा येत असतात. न्याय ही प्रामुख्याने एक सामाजिक संकल्पना मानली जात असल्याने व्यक्तीबाबत फारसा विचार केला जात नाही असे यंग यांना वाटते. परिणामी विषमता आणि अन्याय यांबाबत व्यक्तीगत स्तरावर खुलेपणाने चर्चा होत नाही.

आपला युक्तीवादास पुढे नेतांना यंग यांनी उत्तर – उदारमतवादी कालखंडातील भेदभावास अधोरेखित केले आहे. त्यांच्या मते व्यक्तीगत समानतेच्या वागणुकीतून सामुहीक दमनाची समस्या सुटू शकत नाही. यंग यांनी सामुहिक दमनाची पाच रुपे (Five faces of oppression) मांडली

munotes.in

आहेत. यामध्ये शोषण (Exploitation), सिमांतीकरण (Marginalization), सत्ताविहीनता (Powerlessness), सांस्कृतिक वर्चस्व (Cultural domination) आणि हिंसा (Violence) या घटकांचा समावेश होतो.

यापुढे आयरिस यंग यानी 'रचनात्मक अन्याया'कडे (Structural injustice) आपले लक्ष वेधले असून जेव्हा व्यापक सामाजिक क्रियांमध्ये व्यक्तींवर सुनियोजित पद्धतीने दमन अथवा वंचनेचा सामना करावा लागतो तेव्हा ती व्यक्ती/ व्यक्तीसमूह रचनात्मक अन्यायाची शिकार बनते. रचनात्मक अन्यायामुळे व्यक्तीस निर्णयप्रक्रियेपासून दूर ठेवले जाते. या अन्यायापासून व्यक्तीला दूर ठेवता यावे यासाठी आयरिस यंग सहभागी लोकशाहीचा आग्रह धरते. आयरिस यंग यांच्या मते, वर उल्लेखलेल्या दमन आणि रचनात्मक अन्यायाची भरपाई कोणत्याही फेरवितरणातून होऊ शकत नाही.

## ३.९ समारोप

प्रस्तुत प्रकरणातून न्याय म्हणजे काय हे आपण समजून घेतले. न्याय ही संकल्पना गतीमान आणि सापेक्ष आहे. त्यामुळे न्यायाची चर्चा वेगवेगळ्या परिप्रेक्ष्यातून झालेली दिसते. विविध विचारवंतांनी न्यायाचे सिद्धांत मांडले असून न्यायाच्या या चर्चेत व्यक्ती, समाज, अधिकार या घटकांना विशेष स्थान आहे.

## ३.१० सराव प्रश्न

- न्याय म्हणजे काय हे सांगून जॉन रॉल्सच्या सिद्धांताची चर्चा करा.
- रॉबर्ट नॉझिकच्या न्यायाच्या सिद्धांताचे परिक्षण करा.
- टिपा लिहा-
    - अमर्त्य सेन यांचे न्यायविषयक विचार
    - आयरिस यंग यांचे न्यायविषयक विचार
    - मायकेल सँडेल यांचे न्यायविषयक विचार

## ३.११ संदर्भ


- Politics- Andrew Heywood, Palgrave Macmillan
- Contemporary Political Theory- J. C. Johari, Sterling Publication


❄❄❄❄❄❄❄

munotes.in

घटक ४

# ४

# जबरदस्ती आणि संमती (Coercion and Consent)

**घटक रचना**


४.१ उद्दिष्टे

४.२ सत्ता

४.३ अधिसत्ता

४.४ अधिमान्यता

४.५ धुरीणत्व

४.६ सारांश

४.७ आपण काय शिकलो

४.८ संदर्भसूची


## ४.१ उद्दिष्टे

आधुनिक राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना म्हणून सत्ता, अधिसत्ता, अधिमान्यता व धुरीणत्व या संकल्पनांचा संदर्भ महत्त्वपूर्ण मानला जातो. प्रामुख्याने अनुभववादी अभ्यासकांच्या आग्रहातून या संकल्पनांचा राज्यशास्त्र मध्ये अभ्यास अंतर्भूत झाला असला तरी राजकीय विचार विश्वाचा एक भाग म्हणून या संकल्पना प्राचीन काळापासून कार्यरत असलेल्या दिसतात. सॉक्रेटिस, प्लेटो, अरिस्टॉटल यांच्या या विचारांमध्येही या संकल्पनांची मूळ बीज पहावयास मिळतात. मॅकीव्हली,हॉब्ज यांसारख्या विचारवंतांनी या संकल्पनांना आपल्या विचारांमध्ये अधिक मध्यवर्ती स्थान दिलेले दिसते. आधुनिक काळात रसेल, मरियम, कॅटलिन, लारवेल यासारख्या विचारवंतांनी यासंदर्भात महत्त्वाचे योगदान दिलेले दिसते. आधुनिक राज्यशास्त्रात अनुभववादी दृष्टिकोनाचा आग्रह धरणाऱ्या विचारवंतांच्या मते ' सत्ता' या एकाच गोष्टी भोवती सर्व राजकारण फिरत असते. राज्यशास्त्र हे खऱ्या अर्थाने ' सायन्स ऑफ पॉवर' आहे. त्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा मूलभूत अभ्यास विषय हा ' राज्य' न मानता तो 'सत्ता' मानला जावा असा त्यांचा आग्रह दिसतो. या दृष्टीने लारवेल यांची विधान महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, " सत्तेला साकार करणे आणि तिचं वाटेकरी होणे या प्रक्रियांचा अनुभव सिद्ध अभ्यास म्हणजे राज्य शस्त्र होय." आधुनिक राज्य शास्त्रज्ञांनी सत्ता या संकल्पनेस राज्यशास्त्रात मध्यवर्ती स्थान दिले असले तरी आधुनिक राज्यशास्त्रातील ही एकमेव मध्यवर्ती संकल्पना नव्हे. आधुनिक राज्यशास्त्र ज्ञानी या संकल्पनेची मांडणी करताना राज्यशास्त्रास अधिकाधिक शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून दिले हे मात्र नाकारता येणार नाही. सत्ता, अधिसत्ता,

अधिमान्यता, धुरीणत्व यांचा पूर्वी राज्यशास्त्रात एकत्रित अभ्यास केला जात असे. या संकल्पनांना वेगळे करण्याची व त्यातील फरक यांच्या सीमा अधिक ठळक करण्याचे महत्त्वाचे कार्य अनुभववादी अभ्यासकाने पार पडलेले दिसते. या दृष्टीने या घटकांमध्ये सत्ता, अधिसत्ता, अधिमान्यता व धुरीणत्व या संकल्पनांची सविस्तर मांडणी करण्यात आली असून त्यातून आपल्याला या संकल्पनांविषयी चे आकलन अधिक सुस्पष्ट व व्यापक होईल अशी अपेक्षा आहे.

## ४.२ सत्ता

अभिजात राजकीय तत्त्वचिंतक आन पासून विसाव्या शतकातील विचारवंतापर्यंत 'सत्ता' या संकल्पनेचा अभ्यास राज्यशास्त्रात होत आलेला दिसतो. आंतरराष्ट्रीय संबंध या विशेष शाखेमध्ये मॉर्जेयोंने तर राजकीय सिद्धांत प्रक्रियेत मॅकीव्हलीने 'सत्ता' संकल्पनेस मध्यवर्ती स्थान मिळवून दिलेले दिसते, तरीही आधुनिक राज्य शास्त्रज्ञ व अभिजात राजकीय तत्त्वचिंतक यांच्या सत्ता या घटकाच्या दृष्टिकोनात मूलभूत स्वरुपाचा फरक आढळतो.

आधुनिक राजकीय तत्त्वचिंतकांनी सत्ता, प्रभाव, अधिसत्ता, अधिमान्यता, धुरीणत्व या संकल्पना वेगळ्या करून त्यातील अर्थ व आशयाची काटेकोरपणे मांडणी केली. त्याचबरोबर सत्ता संकल्पनेच्या दृष्टीने या दोन विचार प्रवाहा मधील महत्त्वाचा फरक म्हणजे प्राचीन काळातील राज्यशास्त्रात अभ्यासक सत्तेच्या परिणामांचा विचार राज्य व शासन या पातळीवरूनच करत असत. आधुनिक काळातील अभ्यासक मात्र व्यक्तींच्या पातळीवर सत्तेचा कोणता परिणाम होतो? याचे अध्ययन करण्यास अधिक प्राधान्य देतात. यादृष्टीने सत्ता या संकल्पनेचा स्वतंत्रपणे व सूक्ष्मपणे अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**सत्ता संकल्पनेचा अर्थ व व्याख्या:**

सत्ता ही संकल्पना 'मॅकीव्हली' या विचारवंताला पासून तरी किमान राज्यशास्त्राच्या चिंतनाचा मध्यवर्ती बिंदू राहिलेली आपणास दिसते. आधुनिक राज्य शास्त्रज्ञ तर सत्तेस राज्यशास्त्राच्या अभ्यासाची गुरुकिल्ली मानतात. आधुनिक राज्यशास्त्राचा अभ्यासाचा ' सत्ता लक्षी दृष्टीकोण' विकसित झालेला आहे. हेरॉल्ड लारवेल यांना या दृष्टीकोनाचे मुख्य प्रवर्तक मानले जाते. सत्ता ही संकल्पना पुढील काही विचारवंतांच्या व्याख्येवरून अधिक आकलन करून घेता येईल.

1. **बर्ट्रांड रसेल :-** " अपेक्षित परिणाम घडवून आणण्याची क्षमता म्हणजे सत्ता होय."
2. **डेव्हिड ईस्टन:-** "एक व्यक्ती वा गट स्वतःच्या इच्छेनुरूप इतरांच्या कृती निर्धारित करतो तेव्हा त्यांच्या प्रस्थापित होणारे संबंध म्हणजे सत्ता होय."
3. **मॅक आयव्हर:-** मॅक आयव्हर यांनी The web of Government या या ग्रंथात सत्ता संकल्पनेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, " कोणत्याही संबंधात विवक्षित निर्णय अमलात आणवून घेण्याची किंवा सेवा उपलब्ध करून देण्याची क्षमता म्हणजे सत्ता होय."
4. **एच. व्ही. वाइसमन (H. V. Wiseman):-** "एखाद्या व्यक्तीच्या विरोधात न जुमानता आपली इच्छा पूर्ण करण्याची क्षमता म्हणजे सत्ता होय."

5. **स्टीफन वॉस्वी:-** “सत्ता या संकल्पनेत एखाद्या व्यक्तीची दुसऱ्या व्यक्तीच्या इच्छेला न जुमानता कृती करण्याची क्षमता अभिप्रेत असते.”

6. **हेरॉल्ड लारवेल व अब्राहम काप्लान :-** “ सर्वोच्च सार्वभौम सत्तेने ठरविलेले धोरण आणि निर्णय प्रत्यक्षात आणण्यासाठी घेतलेला सहभाग म्हणजे राजकीय सत्ता होय.”

7. **आर. एच. टोनी :-** “ एक व्यक्ती किंवा व्यक्ती समूह आपल्या इच्छेनुसार इतर व्यक्तींचे किंवा व्यक्ती समूहांचे वर्तन बदलू शकते अशी क्षमता म्हणजे सत्ता होय.”

8. **चार्लस मेरियम :-** “ व्यक्तीच्या ठिकाणी असणारी इतरांच्या धोरणावर प्रभाव टाकण्याची क्षमता म्हणजे सत्ता होय.”

9. **मिचेल:-** “ राजकीय सत्ता म्हणजे विशिष्ट समूहात किंवा व्यवस्थेत प्रभुत्व व श्रेष्ठत्व निर्माण करण्यासाठी लागणारी क्षमता होय.”

**सत्ता संकल्पनेची वैशिष्ट्ये व स्वरूप:-**

सत्ता ही संकल्पना अमूर्त असली तरी ही एक अनुभवजन्य बाब आहे. त्याआधारे अनुभववादी दृष्टिकोनाचे प्रवर्तक समा या संकल्पनेचे स्वरूप व वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे मानतात.

1. **संबंधात्मक स्वरूप :-**

   सत्ता या संकल्पनेचे प्रथम वैशिष्ट्ये व स्वरूप मानले जाते. कारण सत्ता ही संकल्पना एकाच व्यक्ती जवळ कधीच नसते. दोन वा दोन पेक्षा अधिक व्यक्ती असल्याशिवाय सत्तासंबंध निर्माण होऊच शकत नाहीत.

2. **वर्तनात्मक स्वरूप:-**

   सत्ता संकल्पना वर्तनात्मक स्वरूपात ही व्यक्त होताना दिसते. त्यामुळे सत्ता जशी संबंधात्मक असते तशीच ती वर्तनात्मक हि असते असे मानले जाते.

3. **प्रसंग विशिष्ट स्वरूप:-**

   सत्ता संबंधाचे तिसरे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे सत्तासंबंध हे स्थायी वा साचेबद्ध स्वरूपाचे नसतात तर ते प्रसंग विशिष्ट स्वरूपाचे असतात. एकाच व्यक्तीची सत्ता दोन वेगळ्या प्रसंगात विभिन्न असू शकते.

4. **मर्यादित स्वरूप:-**

   सत्ता संकल्पनेच्या स्वरूपातील हा एक महत्त्वाचा घटक मानला जातो. सत्ता संबंधाचे स्वरूपच कायम मर्यादित राहिलेले दिसते. सत्ता धारक इतरांवर जी सत्ता गाजवतात त्यास कुठे ना कुठे मर्यादा आलेल्या असतात.

सत्तेचे आधार:- सत्तेचे प्रमुख आधार पुढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

1. **बलसाधने** :-

   बलसाधने हा सत्तेचा प्रमुख आधार मानला जातो. शस्त्र बळ, संपत्ती बळ, विद्या बळ, स्नायू बळ यासारख्या बल साधनांचा वापर करून प्रामुख्याने सत्ता अमलात आणली

जाते. बल साधनांच्या दृष्टीने सत्तेच्या पाठीशी सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही प्रकारची बलसाधने कार्यरत असलेली आढळतात. त्यामुळे साधारणता असे म्हणता येईल की, " सत्ता धारकाच्या हाताशी त्याची सत्ता निमुटपणे मान्य न करणाऱ्या व्यक्तींना वठणीवर आणण्यासाठी काही साधने असतात व त्या साधनांचा उपयोग करण्याची क्षमता व पात्रता देखील असते."

**2. प्रतीके :-**

प्रतीके हा घटक जनसामान्यांवर प्रभाव पाडण्याची व त्यांच्याकडून आज्ञापालन घडवून आणण्याचे महत्त्वाचे साधन मानले जाते. कारण सामान्य जनतेकडून प्रतीकांच्या दृष्टीने केलेल्या आवाहनांना त्वरित व तीव्र स्वरूपाचा प्रतिसाद कायम मिळताना दिसतो. त्यामुळे सत्ताधारी प्रतिकांचा आधार घेऊन आपल्या आज्ञांचे पालन संबंधित लोकांकडून म्हणजेच सत्ता ग्राहकांकडून करून घेताना दिसतात.

**3. विचार प्रणाली:-**

विचार प्रणाली हा घटक ही सत्ता संबंधांमधील एक महत्त्वाचा घटक म्हणून आधुनिक काळात पुढे आलेला दिसतो. या घटकाचा आधार घेऊन सोव्हिएट रशिया, अमेरिका यांच्यातील शीत युद्ध झाले. या या घटकाच्या आधारे हिटलर, मुसोलिनी यांनी आपली सत्ता स्थान अधिक बळकट केली होती असे दिसते.

**4. संमती:-**

संमती हा ही सत्तेचा एक महत्त्वाचा आधार आहे. लोकशाही शासन व्यवस्थेच्या विकास व विस्ताराबरोबर संमती हा सत्तेचा आधार म्हणून पुढे आलेला दिसतो. कारण लोकशाही राजवटीत बळाचा वापर अखेरचा उपाय म्हणून व तोही कमीत कमी वापरात आणावा अशी अपेक्षा असते.

**सत्तेचे प्रकार:-**

सत्तेच्या आधारावरून सत्तेचे विविध प्रकार निर्माण होताना दिसतात. विचारवंतांमध्ये ही सत्तेच्या प्रकारांबाबत एकवाक्यता आढळत नाही. साधारणतः सत्तेचे प्रकार पुढीलप्रमाणे मांडता येतील.

**1. पारंपरिक सत्ता:-**

सत्तेचा हा प्रथम प्रकार मानला जातो. या सत्तेचा आधार समाजामध्ये कार्यरत असलेल्या प्रथा व परंपरा ह्या असतात. प्रथा व परंपरा च्या आधारे सामान्य जनतेस वर्तन करण्याची एक सवय जडलेली असते. त्याचबरोबर सामाजिक वारसा म्हणूनही त्यास श्रद्धा व पावित्र्य प्राप्त झालेली असते. त्यामुळे ही सत्ता अधिक स्थिर पायावर उभारलेली आढळते.

**2. नग्न किंवा तलवारीची सत्ता :-**

लष्करी सामर्थ्य व शक्ती या आधारावर निर्माण झालेल्या सत्तेस नग्न वा तलवारीची सत्ता असे संबोधतात. या सत्तेचा प्रमुख आधार हा लष्करी सामर्थ्य वा बळ असते. परंतु अशा

पद्धतीच्या सत्तेस परंपरा व जनमताचा आधार नसतो. या पद्धतीची सत्ता अनियंत्रित व अमर्याद स्वरूपाच्या शक्तीचे प्रदर्शन करून आपली पकड समाजावर बसविण्याचा प्रामुख्याने प्रयत्न करताना दिसते.

**3. क्रांतिकारक सत्ता:-**

क्रांतीच्या वा उठावाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या सत्तेस क्रांतिकारक सत्ता असे संबोधन वापरले जाते. या क्रांतीचा आधार विचारधारा, मूलतत्त्ववाद, सत्तालोलुपता असा कोणताही असू शकतो. उदा. फ्रेंच व रशियन राज्यक्रांती मागे तात्विक व विचारप्रणालीचा आधार होता तर तालिबानी क्रांती मागे मूलतत्त्ववाद ही मुख्य प्रेरणा आढळते.

**4. विधिवत सत्ता:-**

संवैधानिकआधारावर निर्माण झालेल्या सत्तेस साधारणतः विधिवत सत्ता असे म्हणतात. या सत्तेमागे कायद्याचा आधार असतो. लोकशाही शासन पद्धतीत प्राप्त सत्ता हा विधीवत सत्तेचा प्रकार होय. या प्रकारच्या सत्तेमागे संविधान व कायदा बरोबरच जनतेच्या संमतीचा ही आधार असतो. त्यामुळे ही सत्ता अधिक स्थिर स्वरूपाची असल्याचे दिसते.

**5. भ्रामक सत्ता:-**

सत्ताही तत्वतः जरी अस्तित्वात असली तरी वास्तविक व्यवहारांमध्ये कार्यरत असलेली दिसत नाही त्या वेळी त्यास भ्रामक वा दिखाऊ स्वरूपाची सत्ता असे म्हणतात. उदा. संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये सर्व लहान मोठी राज्य समान दर्जा प्राप्त राज्य आहेत. त्यांना समान सत्ता आहे असे तत्वतः मानले जाते. परंतु वास्तवात बड्या राष्ट्रांची सत्ताच तिथे कार्यरत असते. अभ्यासकांच्या मते, सत्ता धारक हे नेहमी अल्पजन असतात. सत्तांतर हे अभिजन वा श्रेष्ठी वर्गात होत असते. सत्तांतरानंतर एका श्रेष्ठी ची जागा दुसरा श्रेष्ठी घेतो एवढेच. या दृष्टिकोनातून लारवेल यांनी वास्तविक सत्ता व भ्रामक सत्ता हा फरक स्पष्ट केलेला आढळतो.

या या सत्तेच्या प्रकारांशिवाय आधुनिक राजकीय विचारवंतांनी राजकीय सत्तेचे प्रकार मांडले आहेत. त्यातील काही प्रमुख विचारवंताने मांडलेल्या सत्तेच्या प्रकारांची स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

**1. हेरॉल्ड लारवेल:-**

हेरॉल्ड लारवेल यांनी राजकीय सत्तेचे पुढील तीन प्रकार स्पष्ट केले आहेत.

1. भ्रामक वा दिखाऊ स्वरूपाची राजकीय सत्ता
2. उघड वा स्पष्ट स्वरूपाची राजकीय सत्ता
3. कायदेशीर राजकीय सत्ता

**2. बर्ट्रांड रसेल :-**

रसेल यांनी राजकीय सत्तेचे पुढील तीन प्रकार सांगितले आहेत.

1. पारंपरिक राजकीय सत्ता
2. उघड व नग्न राजकीय सत्ता
3. क्रांतिकारक राजकीय सत्ता

3. **बर्स्टेड:-**

बर्स्टेड यांनी राजकीय सत्तेचे पुढील चार प्रकार वर्णन केलेले आहेत.

1. प्रकट वा प्रछन्न राजकीय सत्ता
2. सक्ती व सहयोगायावर आधारित राजकीय सत्ता
3. औपचारिक व अनौपचारीक राजकीय सत्ता
4. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सत्ता

4. क्रेस पायनी:-

क्रेस पायनी यांनी सत्तेचे सहा प्रकार स्पष्ट केलेले आढळतात.

1. बलसत्ता
2. आमिष सत्ता
3. प्रतिक्रियात्मक सत्ता
4. अडथळा सत्ता
5. आकर्षक सत्ता
6. अनुनयात्मक सत्ता

सत्ता संकल्पनेच्या मर्यादा वा परीक्षण:-

सत्ता संकल्पनेच्या मर्यादा व मूल्यमापन पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

**1) तर्क व वस्तुस्थितीचा अभाव:-**

वर्तन वादी दृष्टीकोनाच्या प्रवर्तकांनी सत्ता संकल्पनेस आधुनिक राज्यशास्त्राची गुरुकिल्ली म्हणून प्रस्तुत केले आहे. तरीही त्यांना या संकल्पनेच्या कक्षा स्पष्टपणे निर्धारित करता आलेल्या नाहीत. टीकाकारांच्या मते, “अर्थकारणात जे स्थान वित्ताला आहे ते राजकारणात सत्तेला असते हे त्यांची समीकरण तर्क आणि वस्तूस्थिती या दोहोंवर टिकू शकले नाही.” टीकाकारांच्या मते, भौतिक वस्तू भागांपैकी कोणतीही गोष्ट पैशाने विकत घेता येते. मात्र राजकीय क्षेत्राबाबत हे सरसकट लागू होऊ शकत नाही. टीकाकारांच्या मते, “ काही आघाड्यांवर सत्ता जरी प्रभावी ठरत असली तरी राजकारणाच्या अशा असंख्य आघाड्या असतात की जिथे सत्ता अगदीच कुचकामी ठरते.”

munotes.in

**2) सत्तेचे मोजमाप अशक्य:-**

वर्तनवादी अभ्यासकांनी सत्तेचे काटेकोर मोजमाप करता येत असल्याचा दावा प्रस्तुत केला असता तरी तो टीकाकारांना मान्य नाही. टीकाकारांच्या मते, सत्ता संबंध फक्त दोन व्यक्तींमध्ये व विशिष्ट प्रसंगापुरताच सीमित असतो. एका व्यक्तीवर जी सत्ता अपेक्षित परिणाम करते तीच दुसऱ्याही व्यक्तीवर तोच व तेवढाच परिणाम करेल हे संभवतच नाही. बत्रॉंडेल या अभ्यासकाने ही मर्यादा मान्य करताना म्हटले आहे, " अ ची सत्ता अचुकपणे मोजून ब च्या सत्तेशी तिची तुलना करता येईल अशी सार्वत्रिक मोजपट्टी शोधून काढणे केवळ अशक्य आहे. फार तर त्या दोहोंची क्ष या व्यक्ती बाबतची सत्ता तौलनिकदृष्ट्याअभ्यासता येईल. य बद्दल त्यांच्या सत्तेचे वेगळेच प्रमाण राहण्याची कायम शक्यता असणारच."

**3) नैराश्य व व्यक्तिवाद यास प्रोत्साहन:-**

टीकाकारांच्या मते," सत्ता संकल्पनेला मध्यवर्ती स्थान दिल्यास सामाजिक व राजकीय जीवनातील संघर्ष सुटूच शकणार नाही असा निराशावाद बळावतो." त्यामुळे परिवर्तनाच्या सर्व शक्यता मावळतात. वास्तवत: हा दृष्टिकोन मूलतःच अशास्त्रीय आहे. तो केवळ व्यक्तिगत संबंधांवर लक्ष केंद्रित करतो व सामाजिक शक्तीकडे अक्षम्य दुर्लक्ष करतो त्यामुळे तो टीकेस पात्र ठरतो.

**4) अपूर्ण विश्लेषण:-**

सत्तावादी दृष्टिकोनात अपूर्णत्वाचा दोष प्रकर्षाने आढळतो. मानव प्राण्यास केवळ सत्तापिपासू प्राणी मानणे व तो इतरांना स्वत:च्या मनाप्रमाणे वागावयास लावण्या करिताच केवळ धडपडत असतो हा दृष्टिकोन मुलत: अपूर्ण आहे. कारण वास्तवात सत्तेशिवाय इतरही अनेक प्रेरणा व निकडी व्यक्तीस सामाजिक क्षेत्रात कार्यप्रवण होणे करिता उद्युक्त करत असतात हे अनुभवास येते.

**5) सत्ता तत्त्वास साध्या चा दर्जा देणे चुकीचे:-**

साध्य- साधन हा निवडीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा घटक ठरतो. वास्तवात कोणत्याही काळात मानवी जीवनात सत्तेला साध्या चे मूल्य प्राप्त झालेले नाही. सत्ता हे केवळ साधन मात्र आहे. सत्तावादी दृष्टिकोन मात्र सत्तेस साध्या चा दर्जा बहाल करतो त्यामुळे तो टीकाकारांच्या टीकेस पात्र ठरतो.

6) आदर्शवादी दृष्टिकोनाची टीका:-

राजकारणास केवळ सत्ता संघर्ष समजणे आदर्शवादी दृष्टिकोनास मुळीच मान्य नाही. कारण तसे समजण्याचे गंभीर व भयावह परिणाम समाज जीवनात घडू शकतात. आदर्शवादी विचारवंत सत्तेपेक्षा अधिसत्ता या संकल्पनेस राज्यशास्त्राची गुरुकिल्ली म्हणून अधिक योग्य मानतात.

सारांश, सत्ता हा आधुनिक राज्यशास्त्रातील एक महत्त्वाचा अभ्यास घटक आहे. प्राचीन काळापासून 'सत्ता' हा राजकीय विचार विश्वाचा भाग राहिलेला असला तरी आधुनिक काळात त्यास राज्यशास्त्राच्या अभ्यासात मध्यवर्ती स्थान प्राप्त झालेले दिसते. असे असले तरी सत्ता संकल्पनेच्या मर्यादा ही टीकाकारांनी स्पष्ट करून दाखवलेल्या आपणास दिसतात.

## ३.३ अधिसत्ता

आधुनिक राज्यशास्त्रात अनुभववादी दृष्टीकोनाच्या प्रवर्तकांनी राजकारणातील सत्ता संबंधाचा अभ्यास करताना सत्ता व अधिसत्ता या घटकांमध्ये मूलभूत स्वरुपाचा फरक स्पष्ट केलेला दिसतो. त्यामुळे अधिसत्ता ही संकल्पना आधुनिक राज्यशास्त्रातील संकल्पना आहे असे मानले जाते. तरीही प्राचीन काळातही अति सत्तेचा स्वतंत्रपणे विचार काही विचारवंतांनी करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु आधुनिक राज्यशास्त्रा मध्ये 'अधिसत्ता' ही संकल्पना सत्तेपासून विभक्त करून तिचा स्वतंत्र अभ्यास केलेला आढळतो. यादृष्टीने या संकल्पनेचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

**अधिसत्ता संकल्पनेचा अर्थ:-**

इंग्रजी भाषेतील Authority या संज्ञेकरिता मराठी भाषेत पारिभाषिक शब्द म्हणून 'अधिसत्ता' हा शब्दप्रयोग केला जातो. मुलत: Authority हा इंग्रजी शब्द Auctor या रोमन शब्दापासून आलेला आहे. ऑक्टर किंवा ऑक्टोरिट्ज म्हणजे सल्ला वा मसलत होय. या शब्दा मागील प्रेरणा रोमन राज्यव्यवस्थेच्या प्रथा व संकेता मध्ये आढळते. रोमन राज्यव्यवस्थेत बुद्धिमान, अनुभवी व जेष्ठ अशा लोकांची वरिष्ठ सभा जास्त सिनेट असे म्हटले जात असे ती जन सभेने घेतलेल्या निर्णयांना मान्यता देण्याचे कार्य पार पाडत असे. धर्म, नीती, परंपरा, संकेत या निकषांद्वारे प्रत्येक निर्णयाचे परीक्षण करून त्याबाबत सल्लामसलत करून जेव्हा मान्यता मिळेल तेव्हा त्यास अधिसत्ता असे संबोधले जात असे. त्यामुळे अधिसत्ता ही संज्ञा साधारणतः ' बुद्धिमान लोकांची निर्णय घेण्याची क्षमता व आज्ञा देण्याचा अधिकार यांना जेव्हा लोकांची मान्यता असते, संमती असते' या प्रकारच्या भावनेशी, सत्तेशी निगडीत बाब आहे. त्यामुळे अधिसत्ता या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना साधारणतः असे म्हणता येईल की, "सत्ताधारकांमध्ये बुद्धी संगत सांगोपांग मांडणी करण्याची क्षमता असणे अभिप्रेत असते. या क्षमतेमुळे त्यांच्या आज्ञांचे आपोआप पालन होते. याउलट ही क्षमता नसल्यास बळाचा वापर करून त्यांना आज्ञापालन मिळवणे भाग पडते."

**अधिसत्ता व्याख्या:-**

आधी सत्ता ही संकल्पना पुढील काही व्याख्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

1. फ्रेडरिक :- " विवेकनिष्ठ प्रक्रियेद्वारे समर्थन करण्याची क्षमता म्हणजे अधिसत्ता होय."
2. प्रो. लास्की:- "अधिसत्ता हा एक कार्यात्मक संबंधित असून हे संबंध कशाप्रकारे संघटित झालेले आहेत यावर याआधी सत्तेची वैधता अवलंबून असते."

munotes.in

3. रॉबर्ट हॉल:- “अधिमान्यता असलेली राजकीय सत्ता म्हणजे अधिसत्ता होय; अधिमान्यता असलेल्या प्रभावाचा अधिक कार्यक्षम प्रकार म्हणजे अधिसत्ता होय.”
4. लेस्ली लिप्सन:- “अधिमान्यतेच्या वेष्टनात असलेली राजकीय सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.”
5. कर्ट राईट मिल्स:- “अधिसत्ता म्हणजे ऐच्छिकरित्या आदेशांचे, आज्ञांचे पालन ज्यामुळे होते अशी समर्थनीय राजकीय सत्ता होय.”
6. मॅक्स वेबर :- “एखादा आदेश किंवा आज्ञा देण्याची किमान राजकीय सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.”
7. डेव्हिड आणि लेव्हिस:- “ राजकीय अधिसत्ता म्हणजे शासनाच्या, राज्यकारभाराच्या हक्कांना मान्यता असणे होय.”
8. विस्र्टेड:- “कनिष्ठ व वरिष्ठ पदातील संबंध म्हणजे अधिसत्ता होय.”
9. युनेस्को अहवाल १९९५ :- “ जी सत्ता स्वीकारली जाते, सन्मानित होते व सर्वांना माहीत असते त्यास अधिसत्ता असे म्हणतात.”

एकंदरीत अधिसत्ता हा देखील एक संबंध असून त्याचे सामान्यतः स्वरूप कनिष्ठ व वरिष्ठ यांच्यातील संबंध असे असते. अधिसत्तेस व्यापक समर्थन प्राप्त झालेले असते व या समर्थनाचा आधार विवेक हा असतो.

**आधिसत्तेची वैशिष्ट्ये:-**

अधिसत्ता या संकल्पनेचे स्वरूप स्पष्ट करणारी काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

1. **संघटनात्मक स्वरूप:-**

हे आधिसत्तेचे प्रधान वैशिष्ट्य मानावे लागेल. कारण संघटनेशिवाय अधिसत्ता कार्यप्रवण होऊ शकत नाही. आधिसत्तेमधील कार्यकारी संबंध प्रस्थापित करण्यासाठी व त्यांच्या कार्य संबंधातील सुसंवाद साधण्यासाठी संघटना वा संस्था अनिवार्य असते. अधिसत्ता ही व्यक्ती व्यक्तीमधील सुसंवाद कायम व कार्यक्षम राखणारी यंत्रणा असते. त्यामुळे संघटनात्मक संरचनेशिवाय हा सुसंवाद राहता येणे शक्य नसते. ते साधारणतः हा श्रेष्ठ कनिष्ठ त्वाच्या तत्वास प्रमाणभूत मानणारी संरचना, व्यक्ती व समूहांवर सोपवलेली विशिष्ट कामे वा जबाबदाऱ्या, नियम व रुढींच्या स्वरूपात औपचारिकपणे झालेली श्रमविभागणी, विविध स्तरावर संपर्कासाठी असणारी नियमित माध्यमे, नियम कार्यपद्धती, यासारख्या घटकांच्या आधारे अधिसत्ता आपसुक कार्यरत असते. अर्थात राज्याचा आकार, लोकसंख्या, सामाजिक परंपरा, गरजा व अपेक्षा यानुसार अधिसत्तेच्या संरचनेत फरक असू शकतो. बदलत्या परिस्थितीला अनुसरून त्यात बदलही घडून येऊ शकतो. तरीही साधारणतः अधिसत्तेच्या दृष्टीने या संरचनेत किमान दोन तत्त्वे या संरचनेत

अपेक्षित धरली जातात. एक म्हणजे, तळापासून वरपर्यंत दुमार्गी संपर्काची कार्यक्षम व्यवस्था असणे व दुसरे म्हणजे संरचनेचे स्वरूप समाजातील बहुल तेचे प्रतिनिधित्व असणे.

**2. प्रतिकात्मक अधिसत्ता:-**

आधिसत्तेचे हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. अधिसत्ता ही व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा तिने धारण केलेल्या पदाशी वा प्रतिकांशी अधिक निगडित असते. चार्लस मेरियमने यादृष्टीने प्रतिकांकरिता 'मिरांडा' ही संज्ञा वापरली आहे. ज्याचा अर्थ मान सन्मान करण्यायोग्य वस्तू, प्रतीके असा होय. या दृष्टीने ब्रिटिश राज पदाविषयी चे एक प्रसिद्ध वचन महत्त्वाचे मानले जाते. King is dead, Long live the king म्हणजेच राज्यपदावर बसणारी व्यक्ती मृत असते मात्र राज्यपद कायमस्वरूपी असते. प्रतीक मानल्या गेलेल्या वस्तू, गोष्टीं संदर्भात आदर युक्त दराऱ्याचे एक अदृश्य वलय असते. बघणाऱ्याच्या दृष्टीस ते सतत जाणवत राहते. समाजातही अशा प्रतीकांविषयीचा आदर भाव जाणीवपूर्वक वृद्धिंगत केला जातो. प्रतीकांची हि अधिसत्ता केवळ राजेशाही पुरती सीमित नसून लोकशाही शासन व्यवस्थेतही प्रतीकांची अधिसत्ता मोठ्या प्रमाणात कार्यान्वित असलेली दिसते. राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज, राजमुद्रा, सभापतींच्या मेज वर ठेवलेली चांदीची गदा ही याची काही उदाहरणे होत.

**3. आज्ञार्थी स्वरूप:-**

अधिसत्ता ही एक प्रकारे औपचारिक सत्ता असते. त्यामुळे राजकीय व्यवस्थेत कोणतीही शासन पद्धती असो तेथे अधिसत्ता ही आज्ञार्थी स्वरूपातच कार्यान्वित झालेली दिसते. साधारणतः प्रभाव व सत्ता ज्यांच्यावर नियंत्रण करायचे आहे त्यांना उद्देशून जी भाषा वापरते ती बहुतांश वेळा सापेक्ष स्वरूपाची व अनिश्चित असलेली प्रत्ययास येते. परंतु अधिसत्तेची भाषा मात्र नेहमी ठाम व आज्ञार्थीच असते. यादृष्टीने राजा प्रजेशी युक्तिवाद करीत नाही तो केवळ आज्ञा करतो. लोकशाही शासन व्यवस्थेतही कायद्यांची भाषा ही आज्ञार्थीच असते. अधिसत्ता ही नेहमी आज्ञार्थी असते एवढेच नव्हे तर आज्ञा करण्याचा तसेच त्या आज्ञांचे पालन करून घेण्याचाही अधिकार आपणास असल्याचे सातत्याने दाखवून देत असते.

**4. अल्प खर्चिक व सोईस्कर पद्धती:-**

अल्प खर्चिक व सोईस्कर पद्धती हे एक अधिसत्तेचे खास वैशिष्ट्य मानले जाते. अधिसत्तेस लोक संपत्तीचा आधार असल्यामुळे त्या अधिसत्तेचे निर्णय, आदेश लोकांकडून सहज पालन करून घेतले जाऊ शकतात. त्यासाठी बल प्रयोग करण्याची आवश्यकता सहसा पडत नाही. साधारणत: सत्तेसाठी जी नकारात्मक व सकारात्मक अधिबलने लागतात ती खर्चाची असतात. अधिसत्तेस या पद्धतीची अधिबलने सहसा वापरावीच लागत नाहीत. त्यामुळे साधनसामुग्रीचा अपव्यय टळतो व त्यास कम खर्चिक स्वरूप प्राप्त होते.

**5. गतिमानता व परिवर्तनशीलता:-**

हेरॉल्ड लास्की यांनी यासंदर्भात असे म्हटले आहे की, " अधिसत्ता हि कार्यात्मक संबंधावर अवलंबून असते. समाजातील कार्यात्मक संबंधात परिवर्तन झाले की अधिसत्तेतही परिवर्तन घडून येते. अन्यथा अधिसत्ते चा लोकाधार, लोक स्वीकृती व अधिमान्यता नष्ट होते. एकंदरीत अधिसत्ता ही गतिमान असते. ती सामाजिक परिवर्तना बरोबरच बदलत जाऊन त्या परिवर्तनाशी एकरूप होते.

**6. स्वीकृती व अधिमान्यता:-**

अधिसत्तेचे स्वरूप हे आधी मान्यतेच्या द्वाराच व्यक्त होते. अधिमान्यता हा अधिसत्तेचा मुख्य आधार असतो. अधिसत्तेस लोक संमतीचाआधार असल्यामुळे तीस अधिमान्यता प्राप्त होते. साधारणतः व्यक्तिगत, पर निहित, अल्पसंख्यांक समूहांची, बहुसंख्यांक समूहांची अशा विविध स्वरूपात अधिसत्ता व्यक्त होताना दिसते. सत्ता, अनुनय, सहकार्य यासारखे आधार या अधिसत्ते मागे असतात. भीती, श्रद्धा, संमती, लाभ, हानी अशा विविध कारणांनी अधिसत्तेस स्वीकृती प्राप्त होऊ शकते. यादृष्टीने स्वीकृती व अधिमान्यता या दोहोत मूलभूत फरक आहे. प्रलोभन, भीती, शक्ती याद्वारे स्वीकृत झालेली अधिसत्ता फार काळ टिकू शकत नाही. जनतेची अधिमान्यता प्राप्त झालेली अधिसत्ता ही अधिक प्रभावी, कार्यक्षम व परिणामकारक ठरते.

**अधिसत्तेचे प्रकार:-**

अधिसत्तेचे चे प्रमुख प्रकार पुढील प्रमाणे मांडता येतील.

**1. पारंपरिक अधिसत्ता:-**

राजकीय सत्तेस ज्या वेळी समाजात प्रचलित असलेल्या रूढी, परंपरा, वारसा हक्काचे तत्व यासारख्या बाबींच्या आधारावर मान्यता प्राप्त झालेली असते त्यावेळी त्यास पारंपारिक स्वरुपाची अधिसत्ता असे म्हटले जाते. राजकीय सत्तेस ज्यावेळी लोकांकडून मिळणारी मान्यता ज्यावेळी प्रथा, परंपरा वा पिढ्यान-पिढ्यांच्या वहीवाटेवर आधारलेली असेल त्यावेळी पारंपरिक अधिसत्ता हा प्रकार निर्माण होतो अशी मॅक्स वेबर यांनी मांडणी केलेली दिसते. पितृसत्ताक कुटुंब पद्धतीतील कुटुंबप्रमुखाची अधिसत्ता, आदिवासी जमातींमधील टोळी प्रमुखाची सत्ता ही या प्रकारातील महत्त्वाची उदाहरणे होत. पारंपरिक अधिसत्ता ही प्रामुख्याने दीर्घकालीन रूढी व परंपरांच्या विश्वासावर आधारलेली असते. या अधिसत्तेवर ही काही मर्यादा पडलेल्या दिसतात. प्रामुख्याने ज्या संकेत, प्रथा, परंपरांच्या आधारे ही राज्यकर्त्यांना ही अधिसत्ता प्राप्त होते त्या प्रथा- परंपरांच्या मर्यादांमध्येच याआधी सत्तेचा वापर करता येऊ शकतो. प्रथे- परंपरेने ज्या बाबी निषिद्ध वा त्याज्य मानलेल्या आहेत त्या बाबी या अधिसत्ता बाळगणारा घटक वा करू शकत नाही. मॅक्स वेबर यांनी या संदर्भात असे म्हटले आहे की, " दिव्य वलयी अधिसत्तेपेक्षा पारंपरिक अधिसत्ता अधिक स्थिर असते. कारण या प्रकारात अधिसत्तेचा मूलस्त्रोत व

अभिकर्ता हे एकमेकांपासून वेगळे असतात. टोळी प्रमुख बदलू शकतो मात्र त्या पदाची अधिसत्ता मात्र कायमच असते. आधुनिक काळात मात्र पारंपरिक अधिसत्ता हा प्रकार बराच मर्यादित झालेला दिसतो. ही अधिसत्ता अलीकडच्या काळात लुप्त होत चाललेली दिसते.

**2. विवेकी किंवा विधीजन्य अधिसत्ता:**

वैधानिक विवेकसंपन्न अधिसत्तेचे अधिष्ठान विधिनियमात व लोकांच्या विवेक शक्तीत असते. राज्यकर्ते ज्यावेळी शौर्य, कार्यक्षमता, नेतृत्वगुण, जनसेवा यासारख्या बुद्धीला मानवणाऱ्या आधारांवर जन्नते द्वारे निवडलेले असतात त्यावेळी विवेकी वा विधिजन्य अधिसत्ता हा प्रकार निर्माण होतो. मॅक्स वेबर यासंदर्भात भाष्य करताना असे म्हणतो की, " वैधानिक व विवेकी अधिसत्ता या सामान्यतः एकत्रित असू शकतात. राज्यकर्त्यांची गुणवत्ता, शौर्य, कार्यक्षमता, लोकप्रियता, कर्तव्यदक्षता आणि प्रभाव अशा निकषांवर निवड होते. राजकीय सत्तेची योग्यता, विश्वासाहार्यता व परिणामकारकता विचारात घेऊन लोकांची स्वीकृती व मान्यता मिळते. वैज्ञानिकता व विवेक संपन्नता या परस्पर पूरक बाबी मानल्या जातात. जे विधिनियम व कायदे तयार केले जातात त्यास विवेकशक्ती चा आधार असतो. ती विधिनियम लोकांच्या सामान्य इच्छेचे प्रतिनिधित्व करत असतात. या विधी नियमांचे स्वरूप हे व्यक्ती निरपेक्ष असते. त्यामुळे अशा विधिनियमांचे पालनही स्वाभाविकपणे होते. त्यामुळे विधीजन्य व विवेकसंपन्न अधिसत्ता ही अधिक स्थिर स्वरूपाची मानली जाते.

विवेकी व विधी जन्य अधिसत्तेत अधिसत्ता धारकांवर काही मर्यादाही आलेल्या असतात. एकतर त्यास मन मानेल तशी आज्ञा देता येऊ शकत नाही. त्याच्या आज्ञा च्या कक्षा ही निश्चित करण्यात आलेल्या असतात. संविधानाने व कायद्याने त्यांच्या अधिकार कक्षा निश्चित केलेल्या असतात. त्या बाहेर जाणारा जाता येत नाही.

**3. दिव्य वलयी स्वरूपाची अधिसत्ता:-**

ज्यावेळेस सत्ताधारी व्यक्तीकडे अलौकिक गुण, दिव्यशक्ती वा आकर्षक प्रभावी व्यक्तिमत्त्व असते तेव्हा संमोहक किंवा दिव्य वलयी अधिसत्ता निर्माण होते. दिव्य वलयी अधिसत्तेचा प्रमुख आधार हा लोकांची श्रद्धा व विश्वास असतो. अशा सत्ताधारकापाशी अलौकिक अशा प्रकारचे गुण किंवा शक्ती आहे असा लोकांचा विश्वास असतो. त्यामुळेच त्याचे आदेश किंवा आज्ञांचे लोक पालन करतात. हा आधिसत्तेचा प्रकार व्यक्तिगत स्वरूपाचे असते. समाजातील काही नेते वा व्यक्ती सर्वसामान्यांपेक्षा वेगळ्या आहेत अशी अनेक लोकांची भावना असते. त्यामुळे अशा आज्ञांचे आपण होऊन पालन करण्यास लोक स्वमर्जीने तयार असतात. प्राचीन काळापासून विसाव्या शतकापर्यंतच्या प्रदीर्घ काळात अनेक ठिकाणी दिव्य वलयांकित नेत्याची अधिसत्ता निर्माण झाल्याची उदाहरणे आढळतात. हिटलर, चर्चिल, लेनिन, म. गांधी, माओ ही याची काही ठळक उदाहरणे होत. या स्वरूपाच्या अधिसत्तेचे मूळ लोकांच्या समूह व्यक्तिमत्त्वामध्ये वा व्यक्तिगत गुण वैशिष्ट्यांमध्ये आहे. अशा नेत्याच्या

अधिसत्तेवर तो नेता स्वतः ठरवील तेवढ्याच मर्यादा असतात. जोपर्यंत तो यशस्वी होत राहतो तोपर्यंत त्याच्या अलौकिक शक्तींवर चा लोकांचा विश्वास कायम असतो. त्या व्यक्तीच्या अपयशाबरोबरच त्याच्या अधिसत्तेचा डोलारा कोसळून पडतो. या स्वरूपाची अधिसत्ता ही अधिसत्तेच्या अन्यदोन प्रकारांशिवाय अधिसत्ता ही अधिक अस्थिर असते असे मॅक्स वेबर यांनी स्पष्ट केलेले दिसते. या अस्थैर्यावर मात करण्यासाठी दिव्यवलयाला संस्थात्मक स्वरूप देण्याचा प्रयत्न त्या नेत्या द्वारे केला जातो. त्या प्रयत्नांचाच एक भाग म्हणजे संबंधित नेता आपला ' वारसदार' नेमण्याचा प्रयत्न करतो. आपल्यानंतर आपण ठरविलेल्या वारसदाराच्या आज्ञांचे लोकांनी पालन करावे अशी ही ते जाहीर आवाहन करताना आढळतात. बहुतांश वेळा नेत्याचा मुलगा हाच त्याचा वारसदार ठरतो. अलौकिक शक्ती वा गुण वंशपरंपरागत असतात अशी सर्वसाधारण समजूत असते. दिव्य वलयाला संस्थात्मक संरचनेची कुष्टी देण्याच्या या प्रक्रियेला मॅक्स वेबर ' दिव्यवलयाचे परिपाठीकरण' असे संबोधतात. तरीही या स्वरूपाची अधिसत्ता ही अस्थिर स्वरूपाचीच अधिक असते असे सर्वसाधारणत: प्रत्ययास येते.

अधिसत्तेचे वरील तीन प्रकार मॅक्स वेबर यांनी मांडलेले आहेत. या तीन प्रारूपांना अधिसत्तेचे आदर्श प्रारूपे मानले जातात. वास्तवात यापैकी कोणताही प्रकार या प्रत्यक्षातल्या अधिसत्तेशी तंतोतंत जुळत नाही. याची काहीशी जाणीव मॅक्स वेबरला ही होती. प्रत्यक्षात असलेल्याअधिसत्ते मध्ये या तीनही प्रारूपाची लक्षणे मिश्र स्वरूपात आढळतील हे वेबर ने त्याकरिताच स्पष्ट केलेले दिसते. अभ्यासकांच्या मतेअधिसत्ते च्या या तीन प्रकारांच्या माध्यमातून मॅक्स वेबरअधिसत्तेची ' दैवी- पारंपरिक- विधी जन्य' या क्रमाने होणारी उत्क्रांती स्पष्ट करू इच्छित होता.

**सत्ता व अधिसत्ता यातील फरक**

आधुनिक राज्यशास्त्रात सत्ता व अधिसत्ता यातील फरक अतिशय काटेकोरपणे स्पष्ट केलेला दिसतो. त्यातील काही प्रमुख बाबींची मांडणी पुढीलप्रमाणे करता येईल.

1. **सामाजिक वर्तन नियंत्रित करण्यातील फरक:-**

   सत्ता व अधिसत्ता हे व्यक्तीचे सामाजिक वर्तन नियंत्रित करण्याचे दोन भिन्न मार्ग आहेत. जेव्हा सत्ता धारकाच्या आज्ञांचे पालन दंड शक्तीच्या प्रभावातून करवून घेतले जाते त्यावेळी आज्ञा पालनाचे कारण सत्ता हे असते. परंतु ज्यावेळी सत्ता धारकाच्या आज्ञांचे पालन त्या न्याय्य व उचित आहेत असे मानून जनसामान्यांकडून आज्ञापालन होते तेव्हा अधिसत्ता ही संकल्पना कार्यान्वित झालेली असते.

2. **अधिबलांमधील फरक:**

   सत्ता व अधिसत्ता या दोहोंत अधिबलां च्या उपयोजना संदर्भातही मूलभूत स्वरुपाचा फरक आढळतो. जसे की सत्ता संकल्पनेच्या पाठीशी अधिबले असणे अनिवार्य ठरते. या

अधिबलांचे स्वरूप प्रसंग परत्वे सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही स्वरूपाची असू शकते. याउलट अधिसत्ता मात्र विवेकनिष्ठता, न्याय्य तत्व, लोकांचा विश्वास व श्रद्धा यावर आधारलेली असते.

3. **संघटन तत्वा संदर्भातील फरक:-**

सत्ता व अधिसत्ता यांना वेगळे करणारा एक घटक म्हणून दोन्ही संकल्पनांच्या संदर्भात त् संघटन तत्वाचे असणारे स्थान याकडे पाहिले जाते. साधारणतः हा सत्ता या घटकास संघटनेची जोड नसली तरी चालू शकते. मात्र अधिसत्ते च्या तत्वात मात्र संघटन तत्व हे अनिवार्य घटक मानला जातो. या तत्त्वाची आधुनिक काळात तर अधिकच गरज निर्माण झालेली प्रत्ययास येते.

4. **अधिकृततेच्या स्वरुपातील फरक:-**

अधिकृतता व अनाधिकृतता हा सत्ता व अधिसत्ता यात फरक दर्शवणारा महत्त्वाचा घटक होय. सत्ता ही साधारणतः अधिकृत वा अनाधिकृत अशा दोन्ही स्वरूपात कार्यरत असलेली आढळते. अधिसत्ता मात्र कोणत्याही परिस्थितीत अनाधिकृत राहू शकत नाही. अधिकृतता हा अधिसत्तेचा मूलाधार आहे. कारण जनसामान्यांनी स्वीकृती व अधिमान्यता दिल्यानंतरच अधिसत्ता प्रत्यक्षात अस्तित्वात येते.

5. **स्पष्टतेच्या स्वरूपातील भेद:-**

स्पष्ट तिच्या स्वरूपावरून ही सत्ता व अधिसत्ता या दोन संकल्पना मधील भेद स्पष्टपणे प्रत्ययास येतात. उदा. सत्तेचे स्वरूप अस्पष्ट व अनिश्चित देखील असू शकतात. परंतु अधिसत्ता मात्र नेहमीच निश्चित व स्पष्ट स्वरूपात अस्तित्वात असते.

एकंदरीत अधिसत्ता ही आधुनिक राज्यशास्त्रातील एक महत्त्वाची संकल्पना आहे. आधुनिक राज्य शास्त्रज्ञांनी सत्ता संबंधाची जी काटेकोर विभागणी करून सत्ता संबंधांमध्ये गुंफल्या गेलेल्या सत्ता, प्रभाव, धुरीणत्व, अधिमान्यता, अधिसत्ता या संकल्पनांना वेगळे केले. या संकल्पना मधून वेगळी झालेली व आधुनिक राज्यशास्त्राचा एक महत्त्वाचा अभ्यास घटक ठरलेली अधिसत्ता ही एक महत्त्वाची संकल्पना मानावी लागेल.

**अधिमान्यता**

अधिमान्यता ही एक आधुनिक राज्यशास्त्रातील महत्त्वाची संकल्पना मानली जाते. मॅक्स वेबर या विचारवंतास त्या संकल्पनेचा जनक मानले जाते. रॉबर्ट हॉल व लिप्सेट यांचे योगदानही या संकल्पनेच्या विकासात आधुनिक अर्थाने महत्त्वाचे मानले जाते. लिप्सेट यांनी ' पॉलिटिकल सायन्स रिव्ह्यू' या मासिकामध्ये १९५९ मध्ये ही संकल्पना विस्ताराने मांडली. 'Political Man' या ग्रंथात लिप्सेट यांनी अधिमान्यता या संकल्पनेस अभ्यास घटक म्हणून प्रस्तुत केले. असे असले तरी प्राचीन राजकीय तत्त्वचिंतकांच्या विचारांमध्ये ही ' अधिमान्यता' या संकल्पनेचा विचार आढळतो. प्लेटो ची न्यायाची कल्पना, ॲरिस्टॉटल ची विधीनियकाची सार्वभौमता, मध्ययुगातील

munotes.in

दैवी इच्छा (Divine Will) कराराचे तत्व, सामूहिक ईहा (General Will) व उपयुक्ततेचे तत्व व ही याची काही उदाहरणे म्हणून सांगता येते. आधुनिक राज्यशास्त्रात शक्ती, प्रभाव व सत्ता यांच्या संदर्भात अधिमान्यतेचा प्रश्न विचारात घेतला जातो व त्याचा अभ्यासही अनुभवाकित पद्धतीने केला जातो. एकूणच अधिमान्यता ही संकल्पना आधुनिक राज्यशास्त्र चा अभ्यासाचा महत्त्वाचा घटक आहे.

**अधिमान्यता संकल्पनेचा अर्थ:-**

इंग्रजी भाषेतील Legitimacy या शब्दा करिता मराठी भाषेत ‘ अधिमान्यता’ हा पारिभाषिक शब्द योजला जातो. Legitimacy हा शब्द लॅटिन भाषेतील Legitimace या शब्दापासून तयार झालेला असून त्याचा मूळ अर्थ ‘ सत्तेचा आधार’ असा होतो. तो या अर्थाने अधिमान्यता हा राजकीय सत्तेचा आधार ठरतो. एकंदरीत अधिवलनांपेक्षा जनमानसातील राज्यसत्तेबद्दलची औचित्याची भावना अधिक महत्त्वाची असते. या भावनेतून सत्ता धारकाच्या सत्तेला जे भक्कम अधिष्ठान प्राप्त होते त्यालाच अधिमान्यता असे म्हटले जाते.

**अधिमान्यता संकल्पनेची व्याख्या:-**

अधिमान्यता ही संकल्पना पुढील काही व्याख्यांच्या या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

1. **रॉबर्ट हॉल:-**

   “शासनाच्या संरचना, कार्यपद्धती, कृती, निर्णय, धोरण, शासनाधिकारी किंवा नेते यांच्या ठिकाणी अचूकता, औचित्य पूर्णता, नैतिकता, चांगुलपणा हे गुण असून त्यांचा स्वीकार केला पाहिजे असा लोकांना वाटणारा विश्वास म्हणजे अधिमान्यता होय.”

2. **लिप्सेट :-**

   “ अधिमान्यता म्हणजे आता निर्माण झालेल्या राजकीय व्यवस्थेत किंवा संस्थेत विश्वास निर्माण करणे तो विश्वास कायम राखणे होय.”

3. **जी. के. रॉबर्ट:-**

   “ जेव्हा जनता एखाद्या राजकीय सत्तेला स्वीकारते त्यावेळी त्या तत्त्वास अधिमान्यता असे म्हणतात.”

4. **जेन ब्लॉडेंड:-**

   “ जेव्हा लोक हा एखाद्या संघटनेतील सत्तेला बिनतक्रार स्वीकारतात तेव्हा त्यास अधिमान्यता असे म्हणतात.”

5. **स्टर्न बर्गर:-**

   “ अधिमान्यता राजकीय सत्तेचा आधार असते. आपल्याला शासन करण्याचा अधिकार आहे असे शासनकर्ते मानतात आणि शासित त्याला काही प्रमाणात मंजुरी देतात तेव्हा अधिमान्यता अस्तित्वात येते.”

### अधिमान्यतेची वैशिष्ट्ये:-

अधिमान्यता संकल्पनेच्या वरील व्याख्यांवरून अगदी मान्यतेचे स्वरूप स्पष्ट करणारी वैशिष्ट्ये पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

**1. परंपराजन्य स्वरूप: -**

अधिसत्तेला आधारभूत मानून तिच्या या इच्छेनुरूप वागणे हे मानवी स्वभावाशी सुसंगत ठरते. मात्र याचा अर्थ अधिमान्यता ही स्वाभाविक वा नैसर्गिक आहे असा घेता कामा नये. कारण वास्तवात राज्याच्या आणि शासन कर्त्याच्या सत्तेस अधिमान्यता देण्याची जी वैचारिक अधिष्ठाने आहेत ती परंपराजन्य स्वरूपाची दिसतात. परंपरेत विशिष्ट परिस्थितीतून ती निर्माण होतात व सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून माणूस ते आत्मसात करतो. उदा. जन्माला येते वेळी मुल वडीलधाऱ्यांचा मान सन्मान करावा अशी धारणा घेऊन जन्माला आलेले नसते तर प्रत्येक लहान मूल त्याच्या वाढत्या वयानुसार यासारख्या गोष्टी शिकत जाते. त्यामुळेच अधिमान्यता ही बाब स्वाभाविक वा नैसर्गिक नसून ती परंपराजन्य ठरते.

**2. सारलक्षी व कार्यपद्धतीलक्षी अधिमान्यता:-**

राज्यकर्त्यांच्या अधिमान्यतेचे स्वरूप सारलक्षी व कार्यपद्धतीलक्षी असे दोन्ही प्रकारचे किंवा संमिश्र स्वरूपाचे असू शकते. साधारणतः राज्यकर्त्यांची निवड कशी करण्यात आली आहे, वा तो आपली निर्णय प्रक्रिया कशी राबवतो यापेक्षा त्याच्या कृतींच्या व निर्णयांच्या गुणवत्तेच्या आधारे जेव्हा हा त्याच्या सत्तेची अधिमान्यता निर्धारित झालेली असते तेव्हा त्या अधिमान्यतेस सारलक्षी अधिमान्यता आता असे म्हटले जाते. प्लेटो, ऑक्विनॉश ,मॅकीव्हली यांच्या विचारांमधून सारलक्षी अधिमान्यतेचा विचार व्यक्त होताना दिसतो. पुढे हॉब्ज, लॉक यांनी सामाजिक करार सिद्धांतांमधून सारलक्षी अधिमान्यतेचाच स्वीकार केलेला दिसतो.

राज्यकर्त्यांची निवडणूक पद्धती आणि निर्णय पद्धती ही ज्यावेळी संविधान व वैधानिक नियमांना धरून असणे यासारख्या बाबींवर अधिमान्यता आधारित असेल त्या वेळी त्यास कार्यपद्धतीलक्षी अधिमान्यता असे म्हणतात. रुसोच्या सामूहिक ईहा या संकल्पनेतून या पद्धतीच्या अधिमान्यतेचा पुरस्कार झालेला दिसतो. यासंदर्भात विश्लेषण करताना भा. ल. भोळे असे म्हणतात की, " राज्यकर्त्यांच्या या विशिष्ट कृतीचा निर्णय कोणत्या पद्धतीने घेण्यात आला होता यावर त्याची अधिमान्यता अवलंबून असते. लोक आपल्या प्रतिनिधींच्या हाती सत्ता सोपवीत असले तरी तेवढ्यामुळे ते प्रतिनिधी मूळ सार्वभौम शक्तीचे धारक होत नाहीत. सार्वभौमत्व सर्वसाधारण ईहेच्याच ठिकाणी अबाधित राहते. सर्वसाधारण ईहेने प्रमाणित केलेल्या पद्धतीनुसार ज्या कृती घडतील तेवढ्याच अधिमान्य करण्यास लोकांनी संमती दिलेली असते." कार्यपद्धतीलक्षी

अधिमान्यतेचे आणखी एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे इंग्लंडमध्ये राजाकडून पार्लमेंट कडे झालेले सत्तेचे हस्तांतरण हे होय.

अमेरिकन राज्यक्रांती हे सारलक्षी व कार्यपद्धतीलक्षी अधिमान्यतेच्या संमिश्र स्वरूपाचे उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. जसे की, ब्रिटिश पार्लमेंटने केलेले कायदे गुलामगिरी लादणारे आहेत म्हणून अमेरिकन वसाहती त्यांची सारलक्षी अधिमान्यतांना आव्हान देत होत्या तर दुसऱ्या बाजूने अमेरिकन वसाहतींनी ' ना प्रतिनिधित्व ना कर' ही घोषणा मात्र कार्यपद्धतीलक्षी अधिमान्यतेचे प्रतिनिधित्व करताना दिसते. अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात ही त्याचे प्रतिबिंब पडलेले आढळते. तो एक प्रकारे रुसो व लॉक यांच्या विचारांचा समन्वय होय.

**3. अधिमान्यतेची दिशा:-**

अधिमान्यतेचा स्त्रोत काय आहे यावरून अधिमान्यते ची दिशा निश्चित होताना आढळते. जसे की प्राचीन काळात राज्याचा ईश्वरी सिद्धांत प्रचलित होता. त्याप्रमाणे राजास ईश्वराचा अंश मानले जात असे. त्यामुळे राजाज्ञांचे पालन न करणे पाप मानले जात असे. या स्वरूपात अधिमान्यते ची दिशा ' वरून खाली' या स्वरूपाची होती असे म्हणता येईल. राज्याचा ईश्वरीय सिद्धांत ज्या प्रमाणात मागे पडला त्या प्रमाणात शासितांकडून शासकाकडे म्हणजे ' खालून वर' अधिमान्यता जाते हा विचार सर्वमान्य होत गेलेला दिसतो. यामध्ये राज्यकर्त्यांकडे अधिसत्ता ही काही अटींच्या अधीन राहून दिलेली असते. त्यामुळे त्या अटींची पालन करणे अधिसत्ता धारकास अनिवार्य आहे. या अटींची पूर्तता केली तरच त्यांच्या सत्तेची अधिमान्यता टिकून राहील असे गृहीत धरले जाते.

**4. अधिमान्यता व सामाजीकरण :-**

अधिसत्तेला संमती देण्याची प्रक्रिया अगदीच नैसर्गिक नाही. व्यक्तीस ती जन्मसिद्ध प्राप्त होत नसून ती सामाजिकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग असते. परंतु सामाजिकरण्याची प्रक्रिया ही विविध मार्गानी घडून येते. जसे की दिव्य वलयी स्वरूपाच्या अधिसत्तेस मिळणारी अधिमान्यता ही व्यक्तिगणिक वेगळ्या कारणातून असल्याकारणाने त्याविषयी सर्वसाधारण विधान करणे चुकीचे ठरते. पारंपरिक अधिसत्तेची अधिमान्यता ही पिढ्यान पिढ्या हस्तांतरीत होत असते. तर विवेकी विधी जन्य अधिसत्ते विषयीची अधिमान्यता ही बव्हंशी राजकीय सामाजीकरणातून शिकवली जाते.

**अधिमान्यता मिळवण्याचे मार्ग :-**

सत्ता धारक अधिमान्यता प्राप्त करून घेण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब करतात. त्यातील काही प्रमुख मार्गांची मांडणी पुढीलप्रमाणे करता येईल.

1. **विचारप्रणाली:-**

विचार प्रणाली हा घटक अधिमान्यता मिळविण्याचा सर्वात विश्वासू घटक मानला जातो. विचार

प्रणाली या घटकाच्या अंगी एक विलक्षण प्रभावी भावनिक क्षमता असते. विचार प्रणाली या तत्त्वाच्या आधारे केले जाणारे आवाहन एवढे प्रभावी ठरते की जनसामान्य आपले तात्कालिक स्वार्थ बाजूला ठेवून सत्ता धारकाच्या आज्ञांचे पालन करण्यास प्राधान्य देतात. सत्ता धारक काही विचारांच्या आधारावर मूल्यांची एक आदर्श लक्षी संदर्भ चौकट जनते समोर उभी करतात व जेव्हा या विचारांना हा स्पष्ट, सुसंगत व अभिव्यक्त असे स्वरूप प्राप्त होते त्यावेळेस त्यास साधारणतः विचार प्रणाली असे संबोधले जाते. विचार प्रणाली हा विचारांचा एक संच असतो. ज्यामध्ये परस्पर संबंधित सिद्धांताना एकिकृत केले जाते. अशा विचार प्रणालीस निर्मित व प्रस्तुत करून त्या माध्यमातून सत्ताधारी आपल्या नेतृत्वाचे समर्थन करीत असतात. त्या विचारप्रणालीचे औचित्य व महत्त्व लोकांना प्रभावीपणे सांगून त्या विचार तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी आपण कसा त्याग करतो आहोत,प्रयत्न करतो आहोत याचे शिस्तबद्ध वर्णन केले जाते. विचार प्रणालीला एकदा का जन संमती प्राप्त झाली की नेतृत्वास ही अधिमान्यता प्राप्त होते. अस्थिर राजकीय परिस्थितीमध्ये तर विचार प्रणाली चे तंत्र अधिमान्यता प्राप्त करण्यासाठी अधिक फायदेशीर ठरते. कारण अशा पद्धतीची अस्थिरता वा अराजक हे भावनिक आवाहनांकरिता अधिक पोषक असते.

विचार प्रणाली या अधिमान्यता मिळवून देणाऱ्या घटकाचा जसा फायदा आहे तसेच या घटका द्वारे अधिसत्ता धारकांवर काही मर्यादा ही पडताना दिसतात. त्यामुळे त्यास दुधारी शस्त्राची उपमा दिली जाते. कारण सत्ता ग्राहक विचार प्रणाली या घटकाच्या प्रभावाखाली येऊन आज्ञापालन करण्याची जशी शक्यता असते त्याप्रमाणेच विचार प्रणालीची मूल्यात्मक चौकट सत्ता धारकांचे स्वातंत्र्यही मर्यादित करीत असते. त्याचबरोबर या दृष्टीने आणखी एक धोका कायमस्वरूपी कार्यरत असतो की, सत्ता धारकाच्या विचार प्रणालीस शह देऊ शकणारी नवीन विचार प्रणाली समाजात उदयास येण्याची ही नेहमीच शक्यता असते. त्याचबरोबर विचार प्रणालीच्या संघर्ष मधून अराजक निर्माण होऊन अधिसत्ता लयास जाण्याचाही धोका उद्भवू शकतो. तरीही अधिमान्यता प्राप्त करण्याचा विचार प्रणाली हा सर्वात विश्वासू घटक मानला जातो.

**2. विश्वास साधने:-**

अधिसत्ते वर लोकांचा विश्वास व श्रद्धा असते. हा विश्वास व श्रद्धा कार्यान्वित झाल्यानंतर अधिसत्ते च्या कृतींना व निर्णयांना एक प्रकारे अधिमान्यता प्राप्त होत असते. मेरियम या विचारवंताने या प्रकारच्या विश्वास व श्रद्धांच्या मुळाशी असणाऱ्या साधनांना क्रेडेन्डा (Credenda)असे संबोधले आहे. त्याचा मूलतः अर्थ केवळ विश्वासातून स्वीकारलेल्या गोष्टी असा होतो. मॅक्स वेबर यांनी अधिसत्तेचे वर्गीकरण करताना अधिसत्ता धारकास प्रामुख्याने तीन विश्वास साधने अधिमान्यता प्राप्त करुन देतात असे स्पष्ट केले आहे. त्यात अधिसत्ता धारकाजवळ असणारी दिव्य वलयी व्यक्तित्वाचे गुण, परंपरा व विवेक आणि विधी व्यवस्था या घटकांचा अंतर्भाव केला होता.

### 3. राजकीय सामाजिकरण:-

आधुनिक काळात अधिमान्यता प्राप्त करून घेण्याकरिता राजकीय सामाजीकरण या घटकाचा सर्वाधिक वापर केला जातो. या विचाराच्या मुळाशी अशी धारणा आहे आहे की, अधिसत्ते विषयीचा आदर वा अधिमान्यता ही जन्मतः प्राप्त होणारी नैसर्गिक व स्वाभाविक प्रवृत्ती नसून ती वाढत्या वयाबरोबर शिकण्याची एक खास बाब आहे. व्यक्तीचे आधी सत्तेच्या प्रती असणाऱ्या बांधिलकीचे कळत नकळत औपचारिक अनौपचारिक पद्धतीने राजकीय सामाजीकरण घडवून आणले जाते. कुटुंब, मित्र व सवंगडी, शास्त्र, राजकीय पक्ष, संसूचन साधने यासारख्या घटकांचा यासाठी प्रभावी वापर केला जातो. एकंदरीत राजकीय सामाजीकरण हे अधिमान्यता मिळवण्याचे एक साधन आहे. विशेषतः सर्वंकष स्वरुपाच्या राजकीय व्यवस्थेत अशा प्रकारचे राजकीय सामाजीकरण जाणीवपूर्वक केले जाते व व व्यवस्थेशी अनुकूल असे राजकीय संस्कार करून आपल्या सत्तेस अधिमान्यता प्राप्त केली जाते.

### 4. संसूचन साधने:-

कोणत्याही राजकीय व्यवस्थेत सत्ता धारक व जनता यांच्यामध्ये योग्य प्रकारचे संसूचन प्रस्थापित करून राजकीय व्यवस्थेस अधिमान्यता मिळवण्याचा प्रयत्न केला जातो त्यालाच संसूचन साधनांद्वारा प्राप्त अधिमान्यता असे म्हटले जाते. साधारणतः सत्ता धारकांचे विचार, त्यांनी दिलेल्या आज्ञा सत्ता धारकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक ठरते. त्याप्रमाणेच सत्ता ग्राहकांच्या अपेक्षा, मागण्या, अडीअडचणी सत्ता धारकांना पर्यंत पोहोचवणे ही आवश्यक असते. त्यामुळे संसूचनाची प्रक्रिया ही एक प्रकारे दुहेरी तारेने जोडलेली असते असे म्हटले जाते. जनता व सत्ताधारक यातील सत्ता संबंधाची रचना कशी अधिसत्ते जवळ जाईल व त्यास अधिमान्यता प्राप्त होईल हे प्रामुख्याने संसूचनाची प्रक्रिया किती योग्य प्रकारे होते यावरच अवलंबून असते. संसूचन साधनांच्या दृष्टीने वृत्तपत्र, रेडिओ, दूरदर्शन, सभा-संमेलने यासारख्या संसूचन साधनांद्वारा सत्ता धारक आपली मते, निर्णय व धोरणे यांचे औचित्य व महत्त्व जनसामान्यांसमोर ठेवत असतात. राज्यकर्त्यांच्या या निर्णयाचे औचित्य सर्वसामान्य जनतेपर्यंत प्रभावी पद्धतीने पोहोचले तर राज्यकर्त्यांना अधिमान्यता मिळते अन्यथा त्यांच्याविषयी असंतोष निर्माण होतो हे सर्रास प्रत्ययास येते.

### 5. हितसंबंधाचा समन्वय:-

आधुनिक समाजामध्ये हितसंबंधी समूह मोठ्या प्रमाणात कार्यरत झालेले दिसतात. हे हितसंबंधी समूह पारंपरिक समाज रचनेतील समूहगटांपेक्षा वेगळे आहेत. आधुनिक काळामध्ये समाजात व्यक्तीच्या वाट्याला जी भूमिका येते ती भूमिका व्यवसाय, नोकरी वा तत्सम कारणानी त्याच्या हितसंबंधाच्या पुर्तते करीता त्यास बाध्य करते. औद्योगिक समाजात या प्रकारच्या हितसंबंधी गटांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आढळते. प्रत्येक हितसंबंधी गटांचे हितसंबंध हे भिन्न असल्या कारणाने आधुनिक समाजात हितसंबंधांचा संघर्ष हा

सार्वत्रिक स्वरूपात व्यक्त होताना आढळतो. अशा परिस्थितीत सत्ता धारक या या हितसंबंधाच्या संघर्षात समन्वय साधण्यात यशस्वी झाले तर त्यांना एक प्रकारे अधिमान्यताप्राप्त होते.

**6. सामाजिक मूल्यांची जोपासना:-**

अधिमान्यता मिळवण्याचा हाही एक मार्ग मानला जातो. सर्वसामान्य जनतेने मान्य केलेल्या सामाजिक मूल्यांची, विचारधारांची जोपासना करणे, त्या विरोधी निर्णय वा धोरणे ना राबवणे, कोणतीही योजना बळाचा वापर न करता जनप्रबोधन करूनच कार्यान्वित करणे, जनसामान्यांना योजना अंमलबजावणीत सामील करून घेणे यासारख्या मार्गाने ही सत्ता धारकास अधिमान्यता मिळवता येते.

**7. अन्य घटक:-**

अधिमान्यता मिळविण्याच्या या प्रमुख साधनांशिवाय ही अन्यही काही घटकांचा वापर हा अधिमान्यता प्राप्त करून घेण्यासाठी राज्यकर्ते वापरताना दिसतात. जसे की आश्वासने देणे, आर्थिक सुबत्ता निर्माण करणे, राजकीय व्यवस्थेविषयी चा आदर निर्माण करणे, प्रतीकांचा वापर करणे, प्रसंगी शक्तीच्या साधनांचा उपयोग करणे यासारखे घटक ही राज्यकर्त्यांकडून अधिमान्यता मिळविण्यासाठी वापरले जातात.

अधिमान्यता मिळवणे जेवढे महत्वाचे आहे तेवढेच अधिमान्यता टिकवणे ही गरजेचे आहे. तरच त्या अधिसत्तेस स्थिरता प्राप्त होऊ शकते. त्यातील काही प्रमुख घटक पुढीलप्रमाणे मांडता येतील.

**1. आर्थिक विकास:-**

जनसामान्यांचे आर्थिक प्रश्न सहज सुटत असतील तर अधिसत्ते विषयी असंतोष सहसा निर्माण होत नाही हा सार्वत्रिक अनुभव आहे. राज्यातील लोकांची आर्थिक सुरक्षितता टिकवण्यासाठी सत्ता धारक हे कटिबद्ध आहेत हा विश्वास लोकांना वाटावयास हवा. तो प्रत्यक्षात त्या दृष्टीने काम होत असेल तरच वाटू शकतो. केवळ ' गरीबी हटाव' वा 'सबका साथ सबका विकास' अशा घोषणा देऊन अधिमान्यता टिकवता येऊ शकत नाही. त्यास त्या दृष्टीने आवश्यक कृतींची जोडही असावयास हवी.

**2. आश्वासनांची पूर्तता:-**

आश्वासनांची पूर्तता हा घटक अधिमान्यतेस स्थिरता देणारा एक महत्त्वाचा आधार मानला जातो. राज्यकर्त्यांकडून अनेकदा भावनिक व लोकानुनयासाठी भरमसाठ आश्वासने दिली जातात. मात्र व्यवहारात अशा आश्वासनाची पूर्तता करणे शक्य झाले नाही तर सत्ताधारकांविषयी जनसामान्यांच्या मनात अविश्वास व असंतोष निर्माण होतो. हा असंतोष सत्ता धारकास असलेली अधिमान्यता मावळण्यास एक प्रमुख कारण ठरू शकतो.

**3. विचारधारेची जोपासना:-**

सामाजिक मूल्यांना अनुसरून जनतेने मान्य केलेली विचार प्रणाली सत्ताधाऱ्यांनी त्यास दिलेली स्वीकृती यावर अधिमान्यतेची शक्ती प्रामुख्याने आधारलेली असते. तत्वप्रणाली च्या मागे पाशवी बळ कितीही उभे केले तरी त्या सत्तेची अधिमान्यता स्थिर राहू शकत नाही हा इतिहासाचा अनुभव आहे. त्यामुळे राज्यातील तत्वप्रणाली ची जोपासना करणे हाच अधिमान्यता टिकविण्याचा एक चांगला मार्ग आहे असे मानले जाते.

**4. राष्ट्रीयत्वाच्या भावनेची जोपासना:-**

राष्ट्रीयत्व राष्ट्रवाद या भावना जनसामान्यांना कार्यप्रवण व कार्यप्रवृत्त करणारे महत्त्वाचे घटक मानले जातात. साधारणतः लोकांमधील राष्ट्राभिमानाची भावना प्रज्वलित करून ज्या राज्यातील लोकांमध्ये दृढ स्वरूपात रुजलेला उच्च दर्जाचा राष्ट्राभिमान पहावयास मिळतो तो त्या राज्याच्या अधिमान्यतेस अधिक स्थिरता प्राप्त करून देतो असे दिसते. आधुनिक राष्ट्र राज्य व्यवस्थेस राष्ट्रीयत्वाची भावना प्रखर करूनच सत्ता धारकांना आपल्या अधिमान्यतेस टिकवता येणे सोपे आहे हे सार्वत्रिकरीत्या प्रत्ययास येते.

**अधिमान्यता महत्व:-**

अधिमान्यता या संकल्पनेचे महत्त्व पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

**1. प्रभाव निर्माण करण्याचे साधन:-**

अधिमान्यता या घटकाच्या सहाय्याने अधिसत्ता धारक आपला प्रभाव सर्वत्र व दीर्घकाळ निर्माण करू शकतात. यादृष्टीने अधिमान्यता या घटकाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**2. सत्तेस स्थिरता:-**

सत्तेस स्थिरता प्राप्त होणे हे कोणत्याही राज्यव्यवस्थेत महत्त्वाचे मानले जाते. स्थिर ते अभावी सर्व प्रकारचा विकास ठप्प होतो हा सार्वत्रिक अनुभव आहे. केवळ शक्ती साधनांचा व पाशवी बळाचा वापर करून सत्ता टिकवता येत नाही तर त्यास जन संमती हा घटकच सर्वाधिक आवश्यक ठरतो. यादृष्टीने सत्तेस स्थिरता प्रदान करण्याचे महत्वाचे कार्य अधिमान्यता या संकल्पनेच्या माध्यमातून पार पाडले जाते.

**3. सत्ता अवलंबातील सहजता:-**

अधिमान्यता प्राप्त सत्तेची अंमलबजावणी सहज पद्धतीने घडून येते. त्यास वेगळे प्रयास करण्याची गरज भासत नाही. त्यामुळे हा अधिमान्यता या तत्त्वाचा महत्त्वाचा गुण मानला जातो.

**4. राजकीय सत्तेचा आधार:-**

अधिमान्यता या संकल्पनेस राजकीय सत्तेचा आधार मानले जाते. कारण जन संमती ही प्रामुख्याने अधिमान्यता या तत्वाच्या माध्यमातूनच प्राप्त होत असते.

**5. लोकशाही शासन व्यवस्थेचे प्रधान मूल्य:-**

अधिमान्यता हे लोकशाही शासन व्यवस्थेचे प्रधान मूल्य मानले जाते. जनतेची संमती हाच लोकशाही शासन व्यवस्थेचा मूलभूत आधार असतो. हा आधार अधिमान्यता या संकल्पनेच्या माध्यमातून अधिक वृद्धिंगत होताना दिसतो.

**6. ताण तणाव व संघर्षाचे व्यवस्थापन:-**

राज्यात हितसंबंधांचा संघर्ष, ताण तणाव, संघर्ष या सर्व घटकांचे सहज व सुलभ व्यवस्थापन अधिमान्यता प्राप्त सत्तेस करणे शक्य होते. अधिमान्यता या घटकामुळे या पद्धतीचे अपघटक राज्यव्यवस्थेत फार अल्प प्रमाणात पहावयास मिळतात.

**7. कार्यक्षम व्यवस्था:-**

अधिमान्यता या तत्वाच्या सहाय्याने राज्यव्यवस्थेस कार्यक्षम स्वरूप देणे शक्य होते. जनतेची अधिमान्यता प्राप्त झालेली राजकीय सत्ता ही अधिक कार्यक्षम असते हे सातत्याने प्रत्ययास येते.

सारांश, अधिमान्यता ही आधुनिक राज्यशास्त्रातील एक महत्त्वाची संकल्पना असून सत्तेस अधिक स्थिरता, कार्यक्षमता, सहजता, प्रदान करण्याच्या दृष्टीने या तत्त्वाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हे लोकशाही शासन व्यवस्थेचा मूलाधार म्हणून म्हणून या संकल्पनेकडे पाहिले जाते. त्यामुळे अधिमान्यता प्राप्त करण्याचा प्रयत्न हा सर्व प्रकारच्या राजकीय व्यवस्थांमध्ये होत असलेला आपणास दिसतो.

## ३.५ धुरीणत्व:-

धुरीणत्व ही आधुनिक राजकीय सिद्धांतामधील एक महत्त्वाची संकल्पना असून ही संकल्पना सत्ता, अधिसत्ता, अधिमान्यता या पुढील संकल्पना मानावी लागेल. एखादी व्यक्ती, संस्था, समूह, राष्ट्र आपल्या या सांस्कृतिक मूल्यांची भुरळ घालून संमती च्या आधारावर प्रभुत्व निर्माण करते त्यातून धुरीणत्वाची प्रवृत्ती विकसित होते असे सर्वसाधारणपणे दिसते. धुरीणत्व ही संकल्पना प्राचीन काळातील राज्यकर्त्यांमध्ये ही काही प्रमाणात कार्यरत असल्याचे दिसते. सनातन अन राजकीय तत्त्ववेत्त्यांच्या विचारांमध्ये ही धुरीणत्वा संबंधीचे काही विचार आढळतात. ही मात्र ही संकल्पना खऱ्या अर्थाने प्रसिद्धीस आणली ती इटालियन नव मार्क्सवादी अँन्तेनिओ ग्रामसी यांनी. ग्रामसी यांनी भांडवलशाही व्यवस्थेचे असणारे प्रभुत्व विश्लेषित करताना धुरीणत्वाच्या संकल्पनेस आधारभूत मानले. त्यापुढील काळात धुरीणत्व ही संकल्पना राजकीय व्यवहार व राजकीय सिद्धांत यांच्या अभ्यासाचा महत्वाचा घटक राहिलेली दिसते.

### धुरीणत्व संकल्पनेचा अर्थ:-

Hegemony हा शब्द मूळ लॅटिन भाषेतील hegemonia या शब्दापासून तयार झालेला असून त्याचा अर्थ अधिकार, नियम, राजकीय वर्चस्व, नेता असा होतो. याचा अर्थ धुरीणत्व ही संकल्पना वर्चस्व, नेतृत्व याच्याशी संबंधित आहे असे म्हणता येऊ शकते. इ. स. पूर्व आठव्या शतकापर्यंत ग्रीक

गणराज्यांमध्ये या पद्धतीच्या धुरीणत्व राखणाऱ्या अनेक राज्यसत्ता व राजे निर्माण झाले. ज्यांच्या सत्तेचा आधार लोक संमती होता. त्या त्यामुळे सतत या hegemony या संकल्पनेस धरून होत्या असे म्हटले जाते.

**धुरीणत्व व्याख्या:-**

धुरीणत्व ही संकल्पना ग्रामसी आणि पुढील व्याख्येच्या आधारे अधिक स्पष्ट केली आहे "Hegemony means rule by one class on another but not by force, It is by consent. Cultural hegemony was used as a means of of maintain and legitimising the capitalist state" म्हणजे एका वर्गाचे दुसऱ्या वर्गावर जबरदस्ती नाहीतर; संमती च्या आधारावर प्रभुत्व असणे म्हणजे धुरीणत्व होय.

ग्रामसी यांची धुरीणत्वाची संकल्पना:-

ग्रामसी हा २० व्या शतकातील सर्वश्रेष्ठ मार्क्सवादी विचारवंत मानला जातो. मार्क्सवादावर टीका करून मार्क्सवादी तत्वज्ञानात नवीन संकल्पनांची भर घालण्याचे महत्त्वाचे कार्य ग्रामसी यांनी पार पाडलेली दिसते. रशिया मध्ये झालेली बोल्शेव्हिक क्रांती ही आर्थिक घटकांना प्राधान्य देत यशस्वी झालेली असली तरी प्रगतिशील भांडवलदारांच्या संदर्भात मात्र मार्क्सवादाने नवीन काही बाबींचा शिकार करणे गरजेचे आहे यासाठी ग्रामसी आग्रह होता. आधुनिक भांडवलशाहीत केवळ आर्थिक घटकांच्या आधारे क्रांती घडवून आणणे शक्य नाही याचे आकलन ग्रामसी कडे होते. त्यामुळेच ग्रामसीने मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिक वादास धुरीणत्वाच्या सिद्धांताची जोड दिलेली दिसते. ग्रामसीच्या मते, संस्कृती, विचारसरणी, भाषा, बौद्धिक क्रांती यांचं एकमेकांवर प्रभाव पडतो. शासक वर्ग हा त्यांच्या ही त्याची मुल्ये, दृष्टिकोन, विश्वास यांची रुजवात शिक्षण, माध्यमे यासारख्या समाजी करण्याच्या साधनांच्या सहाय्याने करत असतात. त्यास ज्यावेळी लोकांची संमती व समर्थन मिळते व त्यातून शासक वर्गाचे वर्चस्व खऱ्या अर्थाने निर्माण होते व ती दीर्घकाळ टिकूनही राहते.

ग्रामसीच्या मते, भांडवलशाही राज्याचा आधार हा धुरीणत्व आहे. त्याच्या मते, धुरीणत्व म्हणजे केवळ वर्गामध्ये असलेली जागृकता नसून ती त्या पलीकडे जाणारी बाब आहे. त्यासाठी वर्णव्यवस्था केवळ आर्थिक दृष्टिकोनातून अवलोकन न करता त्याचे सांस्कृतिक, नैतिक व बौद्धिक पैलू ही अभ्यासणे आवश्यक ठरते. त्यादृष्टीने समाजाचे समाजीकरण घडवून आणणे अत्यंत आवश्यक असते. धुरीणत्वा च्या संकल्पनेचा आढावा घेताना भांडवलदार वर्ग सत्तेवर कसे नियंत्रण प्रस्थापित करतो याचे विश्लेषण करताना ग्रामसी म्हणतात," राजकीय आणि आर्थिक बळ याच बरोबर विचारसरणी द्वारे ते आपले धुरीणत्व प्रस्थापित करतात. धुरीणत्व सत्ताधाऱ्यांच्या ताकदीचे मुख्य उगम स्थान असते. भांडवलशाही राज्य ऐच्छिक संघटना, पक्ष, सांस्कृतिक संघटना इत्यादींचा वापर धुरीणत्वाची साधने म्हणून करतात. या साधनांच्या सहाय्याने वर्चस्ववादी विचारसरणी व मूल्ये लोकांच्या मनावर बिंबवतात. नागरी समाज ही त्याकरिता राज्यास मदत करतो. त्यातून

राज्यास राज्य करण्याचा अधिकृत अधिकार प्राप्त होतो." हा अधिकृत अधिकार म्हणजेच धुरीणत्व होय.

भांडवल शाही तील धुरीणत्वाची घडण ग्रामसी पुढील पद्धतीने स्पष्ट करताना दिसतो.

- भांडवलशाही राज्य
- आधार अधिरचना
- उत्पादनाची भांडवलशाही पद्धती
- कायदे, राजकीय रचना, धर्म,
- सामाजिक प्रथा, नैतिकता, आदर्श
- प्रभुत्व किंवा धुरीणत्वाची रचना
- नागरी समाज राजकीय समाज
- कुटुंब, शाळा, धार्मिक संस्था सरकार
- वैधता देणारी रचना बलात्मक साधने

अशा पद्धतीने भांडवलशाही पद्धतीस धुरीणत्वाच्या आधारे लोक संमती मिळवून प्रभुत्व प्राप्त होते. नागरी समाजाने निषेध केला तर राजकीय समाज हा विरोध दंड शक्तीच्या आधारे मोडीत काढतो. यासाठी ग्रामसी प्रतिधुरीणत्वाची संकल्पना मांडून कामगार वर्गाने धुरीणत्व निर्माण करावे यासाठी आग्रही होता. ग्रामसी च्या मते आज साम्यवादी क्रांती तेव्हा शक्य आहे ज्यावेळेस जेव्हा लोकांची आणि समाजाची मूल्ये, विश्वास, दृष्टिकोन भांडवलशाहीच्या वर्चस्व झुगारून देतील.

एकंदरीत धुरीणत्व ही संकल्पना आधुनिक राज्यशास्त्रातील एक महत्त्वाची संकल्पना असून या संकल्पनेच्या अभ्यासाशिवाय सत्ता, अधिसत्ता, अधिमान्यता या संकल्पनांच्या अभ्यासास पूर्णत्व येऊ शकत नाही.

## सारांश:-

एकंदरीत, सत्ता, अधिसत्ता, अधिमान्यता व धुरीणत्व या संकल्पना खऱ्या अर्थाने आधुनिक राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या गुरु किल्ल्या आहेत. या संकल्पनांनी आधुनिक राज्यशास्त्राची व्याप्ती विस्तारित केलीच शिवाय त्यास वास्तविकता ही प्रदान केली. या संकल्पनांमुळे राज्यशास्त्र हे अधिकाधिक वस्तुनिष्ठ होण्यास मदत तर झालीच शिवाय व्यक्ती व समाज, व्यक्ती व राज्य यांच्यातील सहसंबंधाचा दृष्टिकोन ही अधिक प्रगल्भ झालेला दिसतो. पारंपरिक राज्यशास्त्रात या संकल्पनांचा एकत्रितच विचार केला जात असे. आधुनिक राज्य शास्त्रज्ञांनी मात्र या संकल्पनांमधील सूक्ष्म फरक स्पष्ट करून प्रत्येक संकल्पना ही वेगळी अभ्यासण्यास धान्य दिले त्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासात अधिक वस्तुनिष्ठता येण्यास मदत झालेली दिसते.

munotes.in

## आपण काय शिकलो?

प्र. १ ला सत्ता म्हणजे काय? सत्तेचे प्रकार लिहा.

प्र. २ रा अधिसत्ता ही संकल्पना स्पष्ट करून अधिसत्तेच्या प्रकारांचे परिक्षण करा.

प्र. ३ रा अधिमान्यता म्हणजे काय? मान्यता मिळवण्याचे मार्ग सविस्तर लिहा.

प्र. ४ था धुरीणत्व या संकल्पनेवर निबंध लिहा.

टिपा लिहा

1. सत्ता
2. अधिसत्ता
3. अधिमान्यता
4. धुरीणत्व

## संदर्भ सूची :-


1. फड एस. बी. " उच्च तर आधुनिक राजकीय सिद्धांत", विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद,२०१४
2. फाडिया बइ. एल " आधुनिक राजनीतिक सिद्धांत", फाडिया प्रकाशन, दिल्ली,२०१६
3. भोळे भा. ल. " राजकीय सिद्धांत", पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २००८
4. तिजारे रा. अ., पेशवे व. भा,"आधुनिक राजकीय सिद्धांत", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर,१९७९
5. पाटील महेंद्र," विसाव्या शतकातील राजकीय विचार प्रवाह", डायमंड पब्लिकेशन्स, पुणे,२०१८
6. तारकुंडे व्हि. एम. कर्णिक द्वा. म. "मूलगामी मानवता वाद", श्रीविद्या प्रकाशन पुणे, १९८५
7. पाटील वा. भा. " राजकीय सिद्धांत", प्रशांत पब्लिकेशन्स, कोल्हापूर २०१६


❄❄❄❄❄❄❄

munotes.in